१८७८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
वा. नं. २८

सरकारी विद्या... मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें

पद्यरत्नावली.

किंमत आठ आणे.

न. ८७ म. ग्रं. सं. ठाणें

विषय	लेखक कृष्णशास्त्री चिपळूणकर	सन
काव्य		
संग्रहालय क्रमांक	पुस्तकाचें नांव पद्यरत्नावली	

१८७८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
वा. नं. २५

सरकारी विद्या... मराठी ग्रंथ संग्रहालय खातें ठाणें

पद्यरत्नावली.

किंमत आठ आणे.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
काव्य
संग्रहालय क्रमांक
लेखक कृष्णशास्त्री चिपळूणकर
सन
पुस्तकाचें नांव पद्यरत्नावली

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्यालयांसाठीं.

पद्यरत्नावली.

कृष्ण शास्त्री चिपळुणकर,

यांनीं

रचिली.

नवीन शोधिलेली आवृत्ति.

२००० प्रती.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली असे.

मुंबई:

गवर्नमेंत सेंत्रल बुकदिपो.

सन् १८७८ इ०.

पुस्तकासंबंधी सर्व अधिकार सरकारानें आपणाकडे ठेविले आहेत.

किंमत आठ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

मुंबईमध्यें,
निर्णयसागर छापखान्यांत छापिलें.

TO

EDWARD IRVINE HOWARD ESQUIRE

THE LATE DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTION.

BOMBAY

WHO HAS DONE A GREAT DEAL FOR THE

cultivation and extension of vernacular literature

THIS HUMBLE LITTLE WORK

Is respectfully dedicated by the

AUTHOR.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

मेहेरबान एद्वर्द अर्विन हावर्द साहेब,

मुंबई इलाख्यांतील माजी डैरेक्टर आव्

पब्लिक इन्स्त्रकशन्,

ज्यांनीं एतद्देशीय भाषांत नवीन ग्रंथांच्या उत्पत्तीविषयीं

व प्रसाराविषयीं बहुत मदत केली,

त्यांस हा ग्रंथ

ग्रंथकर्त्यानें परम आदरानें

नजर केला असे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे

मेहेरबान एड्वर्ड अर्विन हावर्ड साहेब,

मुंबई इलाख्यांतील माजी डैरेक्टर आव्

पब्लिक इन्स्ट्रकशन्,

ज्यांनीं एतद्देशीय भाषांत नवीन ग्रंथांच्या उत्पत्तीविषयीं

व प्रसाराविषयीं बहुत मदत केली,

त्यांस हा ग्रंथ

ग्रंथकर्त्यानें परम आदरानें

नजर केला असे.

PREFACE.

This is not the first time that I appear before the Public. I have already enjoyed their kindness for which I am sincerely thankful. In fact the indulgent and generous reception that my previous attempts to amuse them have received at their hands has encouraged me to try a new kind of composition and to come forward, with this little work containing some short pieces of Maráthí Poetry. I do not pretend to originality. My verses are for the most part reproductions from some of the best Sanskrit Poets Kálidás, Bhavabhuti, Bilhan, Jagannáth, &c. some of whom have a world-wide fame, while the others, though appreciated by the learned are not as extensively known as they deserve to be. These pieces are not however a strict and exact rendering but a free adaptation, my principal object being not so much to assist the student to understand the construction of the original as to provide for the general Maráthí reader as neat and elegant a poetical production as I could prepare. It is exceedingly difficult, nay, it is impossible to encompass both the objects at once successfully, and therefore I have not attempted the task. In fact I wish that my work should be regarded as an independent Maráthí production, the ideas and usages being chiefly drawn from Sanskrit sources. I have taken pains to render the work as acceptable as I could to the general Maráthí reader and to the Maráthí student. I have given good many foot-notes, explaining the classical allusions and difficulties of construction which occur in the text. I have also appended a vocabulary of difficult words, and a paper on the peculiarities of orthography and grammar to be met with in Maráthí poetry.

CONTENTS.

	PAGE.
The Cloud-messenger	1
A Collection of allegories	34
Glories of knowledge	59
Questions and Answers.	63
A berieved lover's lament.	64
Vocabulary.	69
Grammatical peculiarities of Maráthi Poetry	80

प्रस्तावना.

कालिदासादि ज्या आपल्या प्राचीन कवींची उज्ज्वल व विशाल कीर्ति आज सर्व भूमंडळावर गाजत आहे, त्यांच्या काव्यांतील अद्भुत रसाची व अगाध चातुर्याची गोडी आपणास समजावी असें कोणा स्वदेशाभिमानी व सुज्ञ हिंदूस वाटणार नाहीं? परंतु त्या कवींचे ग्रंथ संस्कृत असल्यामुळें ती भाषा ज्यांस येत नाहीं, त्यांस त्यांतील रसामृताचा व ज्ञानधनाचा अनुभव घडत नाही. त्यांच्या सोयीकरतां आलीकडे बऱ्याच संस्कृत ग्रंथांचीं प्राकृत भाषांतरें होऊं लागलीं आहेत. व त्याच हेतूनें हा प्राकृत ग्रंथही तयार केला आहे. या ग्रंथांत लहान मोठे पांच भाग आहेत व त्या भागांच्या आरंभीं तो कोणत्या प्राचीन ग्रंथाच्या आधारानें रचिला आहे हें टिपेंत सुचविलें आहे.

प्रकृत ग्रंथकर्त्यानें संस्कृताचें शब्दशः भाषांतर केलें नाहीं, कारण संस्कृत शिकणारास त्या भाषेची रचना कळण्यास व त्या भाषेचें ज्ञान होण्यास सहाय करण्याच्या हेतूनें हा ग्रंथ केला नाहीं; तर मूळ ग्रंथांतील मुख्य अर्थ घेऊन तो प्राकृत भाषेच्या सरणीनें जितका सुरस रीतीनें व्यक्त करतां आला, तसा व्यक्त केला आहे. तसें करतांना प्रसंगविशेषीं मुळांतल्यापेक्षां कोठें [illegible]त, कोठें कमी अर्थ झाला आहे; तरी मूळ ग्रंथांतील मार्मिक अर्थ प्र[illegible]ः जाऊं दिला नाहीं व जो ज्यास्त घातला आहे तो मूळांतल्या अर्थास शोभेल असाच घातला आहे. सारांश, संस्कृत कवींच्या ग्रंथांतील अर्थ घेऊन मोरोपंत, वामन पंडित, मुकुंदराज, रघुनाथ कवि यांच्या ग्रंथाप्रमाणें हें स्वतंत्र प्राकृत काव्य केलें आहे, असें वाचणारांनीं समजावें. आतां या काव्यांत अर्थगांभीर्य, शब्दसौष्ठव, रसपरिपाक वगैरे गुण कसे उतर[illegible]

आहेत, किंवा ते मुळींच नाहींत, याचा निकाल करणें ग्रंथकर्त्या-चें काम नाहीं; तो अधिकार सुज्ञ वाचणारांचा आहे.

या ग्रंथांत जेथें प्राचीन चालींचा संबंध आला आहे, किंवा पुराणप्रसिद्ध गोष्टींचा संबंध आला आहे तेथें व ज्या दुसऱ्या कोठें मूळांत कठिणपणा वाटला, तेथें खालीं टिपा घालून त्यांत त्या गोष्टींचें थोडथोडें विवरण केलें आहे. तसेंच वाचणारांच्या सो-यीकरतां ग्रंथाच्या शेवटीं कठिणशब्दांचा कोश घातला आहे व मराठी कवितेंत गद्य ग्रंथांतल्यापेक्षां व्याकरणरीत्या जे विशेष आढळतात, त्यांविषयीं एक निबंध घातला आहे.

पुणें १८६९. कृ. शा. चि.

अनुक्रमणिका.

पृष्ठ.

मेघदूत. १
अन्योक्तिकलाप. ३४
विद्याप्रशंसा. ५९
प्रश्नोत्तरावली. ६३
विरहिविलाप. ६४
कठीण शब्दांचा अर्थ.................................... ६९
कवितेंतील व्याकरणविशेष.................................... ८०



वा. काव्य ५
२
काव्य

मेघदूतनामक काव्य.

साक्या.

कोणा एका यक्षें केलें अलक्ष अपुल्या कामीं,
तेणें कोपुनि शापी त्यातें धनद तयाचा स्वामी. १
म्हणे जयेशीं लंपट होउनि मत्त असा झालास,
त्या दयितेचा घडो विरह तुज पूर्ण द्वादश मास. २

---

१. मेघदूत या नांवाचें परम प्रख्यात जो कालिदास कवि यानें रचलेलें एक लहानसें काव्य संस्कृत भाषेंत आहे. हें काव्य लहान असून यांत शब्दसौष्ठव, अर्थगांभीर्य, सरसपणा, प्रसाद, शब्दालंकार, अर्थालंकार इत्यादि अनेक उत्तम गुण असल्यामुळें हें सहृदय जनांस फार मान्य आहे. यांतील गोष्ट अशी आहे कीं, यक्षराज जो कुबेर त्याची आज्ञा एका यक्षानें उल्लंघिल्यावरून कुबेरानें त्यास शाप दिला कीं "एक वर्षपर्यंत तुला प्रवास घडेल व कुटुंबाचा वियोग होईल." नंतर शाप पावलेला तो यक्ष जनस्थानीं प्रवास भोगीत राहिला. त्याचें व त्याच्या स्त्रीचें फारच प्रेम होतें व तिच्या वियोगानें तो व्याकुळ होत्साता त्यानें एके दिवशीं एक मेघ पाहून त्यास सचेतन कल्पून त्याबरोबर आपल्या बायकोस निरोप पाठविला. याप्रमाणें मेघास दूत म्हणजे निरोप सांगणारा कल्पिल्यावरून या काव्यास "मेघदूत" असें नांव पडलें. या काव्याचे दोन भाग आहेत. पूर्वार्ध व उत्तरार्ध. पूर्वार्धात जनस्थान, ज्यास सांप्रत नाशीक म्हणतात, त्यापासून कुबेराची राजधानी जी अलकापुरी तीप्रत जाणाऱ्या मार्गांतील पुराणप्रसिद्ध स्थलांचें काव्यरीतीनें सुरस वर्णन केलें आहे, व उत्तरार्धांत अलकावतीचें व यक्षानें आपल्या मंदिराचें व स्त्रीचें अतिरमणीय रीतीनें वर्णन करून शेवटीं निरोप सांगितला आहे.

कालिदासाच्या ग्रंथाच्या आधारानें त्याच नांवाची ही कविता मराठींत केली आहे. हींत मूळ ग्रंथाचे गुण किती उतरले आहेत हें सांगणें ग्रंथकर्त्याचें काम नाहीं; त्याचा निर्णय सुज्ञ व सहृदय वाचणारे करतील. हा ग्रंथ मूळ ग्रंथाचें शब्दशः भाषांतर नाहीं. तथापि मूळांतील मार्मिक व सरस अर्थ सर्व यांत आणण्याविषयी यत्न केला आहे, व कोठें कोठें वृत्ताच्या किंवा यमकाच्या अनुरोधानें वगैरे मुळापेक्षां कमी अथवा ज्यास्त अर्थ झाला तरी तसें करण्यांत रसहानि न होण्याविषयीं राखवली तितकी तजवीज राखली आहे.

या काव्यांत साकीवृत्त योजलें आहे. हें वृत्त वास्तविक प्राकृत जीं वृत्तें आहेत त्यांपैकीं आहे. प्राचीन कविसंप्रदायाप्रमाणें सर्व काव्यभर एकच वृत्त आहे खरें; तथापि साकी हें वृत्त निरनिराळ्या पांच सहा चालींनीं म्हणतां येत असल्यामुळें वृत्तवैचित्र्याच्या योगानें होणारा चमत्कारही सहज प्राप्त होण्यासारखा आहे.

मग तो येउनि राम[१]गिरीवर आश्रम बांधुन राहे,
सीता[२]स्नानें पवित्रनिर्झरवारी जेथें वाहे. ३
तो कामी त्या गिरिवरि काढी कष्टें कांहीं मास,
विरहें झुरतां झडुनि जयाचें गेलें सर्वहि मास. ४
आला पांडुर वर्ण मुखावरि, गेले गालहि खोल,
जाउं लागलें गळुनि करांतुनि रत्नवलय बहुमोल. ५
आषाढांतील एके दिवशीं वनीं फिरत तो यक्ष
असतां, जाई सहज तयाचें, गिरिशिखरावरि लक्ष. ६
तेथें पाही सजल नील घन, रविकिरणीं जो रक्त,
जणो जाहला मत्त मतंगज व[३]प्रक्रीडा सक्त. ७
पुढें तयाच्या उभा राहुनी, होई विपन्न फार,
अश्रुजळ गळे खळखळ त्याच्या डोळ्यांतुनि अनिवार. ८
सुखिताचेंही व्याकुळ होतें मन दे[४]खुनि मेघास;
काय नवल मग दुःख झालिया तेणें विरहिजनास ? ९
ये[५]तो वर्षाकाळ कंठितां यावा निज दयितेला,
म्हणुनि तिजकडे सांगुनि अपुल्या कुशलमयी वार्तेला, १०

---

१. हा डोंगर नाशिकाजवळ आहे.

२. पंचवटींत रामचंद्र वनवास करीत असतां त्याची स्त्री सीता हिनें स्नान केल्यानें पवित्र झालेले जे झरे त्यांचें पाणी.

३. वप्र म्हणजे डोंगराचे तट, त्यांशीं जें खेळणें त्यांत सक्त म्हणजे गुंतलेला. हत्ती रानांत डोंगरांच्या तटाशीं टकरा खेळत असतां लाल माती अंगावर उडून जसा तांबूस दिसतो, तसा आंत पाणी असल्यामुळें हत्तीसारखा काळा दिसणाऱ्या मेघावर सूर्याचे लाल किरण पडून तांबूस दिसत होता.

४. सजल मेघ पाहिला असतां प्रीतिपात्र जी स्त्री तीस भेटण्याविषयीं पुरुषाचें व तशा पुरुषास भेटण्याविषयीं स्त्रीचें मन फार उत्कंठित होतें, अशी प्राचीन कवींची समजूत आहे. त्या समजुतीप्रमाणें कवि या ठिकाणीं म्हणतो कीं मेघ पाहून सुखी मनुष्याच्या मनास सुद्धां उचल होते; मग वियोगी माणसास तसें झाल्यास काय आश्चर्य आहे ?

५. येणारा. (हें वर्षाकाळाचें विशेषण) या साकींतही वरील साकीवरच्या टिपेंतील कविप्रसिद्धिकडे संबंध आहे.

प्रेषावा हा दूत करूनी मेघ, अशा भावानें;
स्वागतपूर्वक[1] तया वदे तो यक्ष अतिप्रणयानें. ११

वारी, वायू, वीज, धूम हीं एकवटुनि जो झाला,
अचेतनें त्या मेघें कैसें न्यावें संदेशाला ? १२

विचार ऐसा न सुचे अत्युत्कंठित त्या यक्षातें;
तुल्य भासती सजीव निर्जिव विरहग्रस्त[2] जनातें. १३

जन्म पुष्करावर्तक[3] यांच्या अति विख्यात कुळांत,
कामरूप[4] तूं असशी श्रेष्ठहि इंद्राच्या दूतांत. १४

कुलीन आणी थोर असा तूं तुजला शरण रिघोनी,
प्रार्थितसें मी वियोगदुःखें दीन बहुत होवोनी. १५

गुणवंतांच्या जवळ याचना विफळहि बरवी वाटे,
नको नको ती नीचापाशीं, होतांही फळ मोठें. १६

संतप्ताचा[5] ताप निववशी, हरशी ग्लानि जनाची,
देशी जीवन सकल जगा तूं, कीर्ती तव ही साची. १७

परोपकारी असा, घना, तूं, शरण तुला मी आलों,
पहा, कसा अति दुःसह विरहानलें[6] पोळुनी गेलों. १८

बाह्य उपवनीं वसे उमापति, त्याच्या मुकुटशशीचे[7],
किरण पडूनी बहुत चमकती विशाळ सौध जयेचे. १९

---

१. कुशल प्रश्न पूर्वी करून (हें क्रियाविशेषण वदे या क्रियापदाचें).

२. विरहानें पिडलेला (हें जनाचें विशेषण).

३. पुष्करावर्तक नामाचे विशेष श्रेष्ठ मेघ पुराणांत वर्णिले आहेत.

४. कामरूप म्हणजे पाहिजे तें रूप धरणारा असा तूं इंद्राच्या चाकरांत श्रेष्ठ आहेस. पुराणांत इंद्राला मेघस्वामी कल्पिलें आहे.

५. या साकींत संतप्त व जीवन हे शब्द श्लिष्ट आहेत. संतप्त म्हणजे तापलेला व दुःखित; जीवन म्हणजे पाणी व वांचणें.

६. विरह हा कोणी अनल म्हणजे अग्नि.

७. मुकुटावरचा चंद्र. शिवाच्या शिरावर चंद्र आहे हें पुराणप्रसिद्ध आहे.

मग तो येउनि रामगिरीवर[1] आश्रम बांधुन राहे,
सीतास्नानें[2] पवित्रनिर्झरवारी जेथें वाहे. ३
तो कामी त्या गिरिवरि काढी कष्टें कांहीं मास,
विरहें झुरतां झडुनि जयाचें गेलें सर्वहि मास. ४
आला पांडुर वर्ण मुखावरि, गेले गालहि खोल,
जाउं लागलें गळुनि करांतुनि रत्नवलय बहुमोल. ५
आषाढांतील एके दिवशीं वनीं फिरत तो यक्ष
असतां, जाई सहज तयाचें, गिरिशिखरावरि लक्ष. ६
तेथें पाही सजल नील घन, रविकिरणीं जो रक्त,
जणों जाहला मत्त मतंगज वप्रक्रीडा[3] सक्त. ७
पुढें तयाच्या उभा राहुनी, होई विपन्न फार,
अश्रुजळ गळे खळखळ त्याच्या डोळ्यांतुनि अनिवार. ८
सुखिताचेंही व्याकुळ होतें मन देखुनि[4] मेघास;
काय नवल मग दुःख झालिया तेणें विरहिजनास ? ९
येतां[5] वर्षाकाळ कंठितां यावा निज दयितेला,
म्हणुनि तिजकडे सांगुनि अपुल्या कुशलमयी वार्तेला, १०

---

१. हा डोंगर नाशिकाजवळ आहे.

२. पंचवटींत रामचंद्र वनवास करीत असतां त्याची स्त्री सीता हिनें स्नान केल्यानें पवित्र झालेले जे झरे त्यांचें पाणी.

३. वप्र म्हणजे डोंगराचे तट, त्यांशीं जें खेळणें त्यांत सक्त म्हणजे गुंतलेला. हत्ती रानांत डोंगरांच्या तटाशीं टकरा खेळत असतां लाल माती अंगावर उडून जसा तांबूस दिसतो, तसा आंत पाणी असल्यामुळें हत्तीसारखा काळा दिसणाऱ्या मेघावर सूर्याचे लाल किरण पडून तांबूस दिसत होता.

४. सजल मेघ पाहिला असतां प्रीतिपात्र जी स्त्री तीस भेटण्याविषयीं पुरुषाचें व तशा पुरुषास भेटण्याविषयीं स्त्रीचें मन फार उत्कंठित होतें, अशी प्राचीन कवींची समजूत आहे. त्या समजुतीप्रमाणें कवि या ठिकाणीं म्हणतो कीं मेघ पाहून सुखी मनुष्याच्या मनास सुद्धां उचल होते; मग वियोगी माणसास तसें झाल्यास काय आश्चर्य आहे ?

५. येणारा. (हें वर्षाकाळाचें विशेषण) या साकींतही वरील साकीवरच्या टिपेंतील कविप्रसिद्धिकडे संबंध आहे.

प्रेषावा ह्या दूत करूनी मेघ, अशा भावानें;
[१]स्वागतपूर्वक तया वदे तो यक्ष अतिप्रणयानें. ११

वारी, वायू, वीज, धूम हीं एकवटुनि जो झाला,
अचेतनें त्या मेघें कैसें न्यावें संदेशाला ? १२

विचार ऐसा न सुचे अत्युत्कंठित त्या यक्षातें;
तुल्य भासती सजीव निर्जिव विरह[२]ग्रस्त जनातें. १३

जन्म पुष्क[३]रावर्तक यांच्या अति विख्यात कुळांत,
का[४]मरूप तूं असशी श्रेष्ठहि इंद्राच्या दूतांत. १४

कुलीन आणी थोर असा तूं तुजला शरण रिघोनी,
प्रार्थितसें मी वियोगदुःखें दीन बहुत होवोनी. १५

गुणवंतांच्या जवळ याचना विफळहि बरवी वाटे,
नको नको ती नीचापाशीं, होतांही फळ मोठें. १६

सं[५]तप्ताचा ताप निववशी, हरशी ग्लानि जनाची,
देशी जीवन सकल जगा तूं, कीर्ती तव ही साची. १७

परोपकारी असा, घना, तूं, शरण तुला मी आलों,
पहा, कसा अति दुःसह विरहा[६]नलें पोळुनी गेलों. १८

बाह्य उपवनीं वसे उमापति, त्याच्या मुकुटश[७]शीचे,
किरण पडूनी बहुत चमकती विशाळ सौध जयेचे. १९

---

१. कुशल प्रश्न पूर्वी करून (हें क्रियाविशेषण वदे या क्रियापदाचें).

२. विरहानें पिडलेला (हें जनाचें विशेषण).

३. पुष्करावर्तक नामाचे विशेष श्रेष्ठ मेघ पुराणांत वर्णिले आहेत.

४. कामरूप म्हणजे पाहिजे तें रूप धरणारा असा तूं इंद्राच्या चाकरांत श्रेष्ठ आहेस. पुराणांत इंद्राला मेघस्वामी कल्पिलें आहे.

५. या साकींत संतप्त व जीवन हे शब्द श्लिष्ट आहेत. संतप्त म्हणजे तापलेला व दुःखित; जीवन म्हणजे पाणी व वांचणें.

६. विरह हा कोणी अनल म्हणजे अग्नि.

७. मुकुटावरचा चंद्र. शिवाच्या शिरावर चंद्र आहे हें पुराणप्रसिद्ध आहे

अलका[1] नामक त्या यक्षपुरी वरुनि मार्ग तव जाई,
वसे प्रिया मम तेथें तिजला निरोप माझा नेई. २०
पांडुरवदनो[2] वरुनि सारुनी मागें केस करोनें[3],
पथिक[4]कामिनी गगनीं तुजला देखतिल प्रेमानें[5]. २१
आतां वर्षाकाल पातला, पति येतील गृहातें,
ऐशा आश्वासतील पूर्वानुभवें[6] त्या स्वमनातें. २२
कोण सोडुनी समयीं ऐशा दयिता दूर वसेल,
मत्सम परवश दुजा अभागी जर भुवनांत नसेल ? २३
मंद मंद, अनुकूल पवन तुज नेइल कीं वाहोनी,
चातक मधुरस्वरें स्तविल तुज मनीं बहुत हर्षोनी. २४
उडुनि अंबरीं उंच बलाका[7] तुज येतिल भेटाया,
गर्भधारणासमय पातला पाहुनि तो साधाया. २५
देखशील ती अपुली वहिनी[8] दीन बहुत विरहानें,
बसतां मोजित एक एक दिन अति उत्सुकहृदयानें; २६
नश्वर[9], कोमल, फुलाहुनीहि हृदय होय वनितांचें,
वियोगकाळीं केवळ आशा रक्षण करी तयांचें. २७

---

१. कुबेराची राजधानी. ही उत्तरेस हिमालय पर्वतावर आहे असें पुराणांत लिहिलें आहे.

२. विरहदु:खानें पांडरंफटक झालेल्या तोंडावरून.

३. पतिव्रता स्त्रिया नवरा प्रवासास गेला असतां वेणीफणी करून नटत नाहींत. या प्राचीन चालीकडे या स्थलीं लक्ष्य आहे.

४. ज्यांचे नवरे प्रवासास गेले आहेत अशा तरुण स्त्रिया.

५. प्रेमाचें कारण पुढल्या साकींत वर्णिलें आहे.

६. पूर्वीच्या अनुभवावरून.

७. बलाका म्हणजे बगळ्या. या पावसाळ्यांत मेघ आले म्हणजे आकाशांत उंच उडतात व त्या समयीं त्या गर्भिणी होतात अशी प्राचीन कविप्रसिद्धि आहे.

८. यक्षानें मेघास आपला बंधु मानून आपल्या बायकोस त्याची वहिनी असें सलगीनें म्हटलें आहे.

९. नश्वर आणि कोमल हीं हृदयाचीं विशेषणें.

छत्रांछादित करी मही, तें गर्जित तव परिसोनी,
मृणालखंडें खाया मार्गीं चंचुपुटांत धरोनी, २८
जाया मानस सरोवराप्रति उत्कंठित जे झाले,
हंस तुला ते सहाय्य होतिल, बहुत मिळूनि निघाले, २९
तुझा प्रियसखा हा गिरि यातें, आधीं आलिंगोनी,
ज्याचे तट बहु पवित्र झाले रामचरण लागोनी, ३०
निरोप घेई; कारण तुमचा दिसतो स्नेह अपार;
जेव्हां भेटशि यातें, तेव्हां अश्रु गाळिशी फार. ३१
कथिन सविस्तर निरोप मागुनि सांगाया दयितेला,
आधीं सांगतों, घना, चांगला मार्ग तुला जायाला. ३२
भ्रमतां जेथें उंच गिरिशिरें सांपडतिल टेंकाया,
तसेंच जलही विपुल चांगलें मिळेल पानकराया. ३३
सरस निचुल तरु ज्यावरि शोभति, त्या या गिरीवरूनी,
वळुनी उत्तरेकडे अंबरीं चढतां तुज देखूनी, ३४
"काय नवल हें, बाइ ! उडतसे, पहा, शिखर वाऱ्यानें!"
मुग्ध सुरवधू असें पतींप्रति म्हणतिल आश्चर्यानें. ३५

---

१. छत्रें म्हणजे पावसाळ्यांत छत्रीसारखीं जीं एका प्रकारचीं झाडें उगवतात तीं. यांस पानें वगैरे कांहीं नसतात. मधें एक देंठ असून वर पालथ्या वाटीसारखी मऊ कवची असती. त्या छत्रांनीं आछादित म्हणजे झांकलेली. (हें महीचें विशेषण.) या ठिकाणीं जें या संबंधी सर्वनामाचा अध्याहार होतो. जें मही छत्राछादित करी तें गर्जित असा अन्वय.

२. या क्रियापदाचा जे हा अध्याहृत कर्ता होय.

३. तुझा व या गिरीचा.

४. मेघापासून पडणाऱ्या जलबिंदूंवर येथें प्रेमाश्रूंची उत्प्रेक्षा केली आहे.

५. ज्या मार्गांत.

६. प्यावयास.

पाहुनि विशाल तव देहातें, प्रचंडही वेगातें
निश्चित मनिं दिङ्[1]नाग लाजुनी सांडतील गर्वातें. ३६
नानापरिचे रंग चमकती जयांत, तें इंद्राचें
धनु तव नील शरीरावरती विलसे सुंदर साचें; ३७
शिखिपिच्छांचा मुकुट शिरावरि घालुनि यदु[2]पति जैसा,
वृंदावनपरिसरीं शोभला, घना, शोभशिल तैसा. ३८
भृकुटिविलासां नेणति किमपिहि, परि जीं प्रेमें पूर्ण,
क्षेत्रें[3] पालिका नयनें तुजला करितिल खचित निगीर्ण. ३९
तच्छ्रम होणें सफल सकल हें, घना, तुजवरी आहे,
यास्तव क[4]र्षणसुगंधयुक्तीं मालीं[5] क्षणभर राहे. ४०
ज्यां[6]च्या वृष्टी करुनि शमविला त्वां दावानल रानीं
आम्रकूट[7] तो तुजला धारण करील निजशिखरांनीं. ४१

---

१. दिङ्नाग म्हणजे दिग्गज. पृथ्वी स्थिर राहावी म्हणून दिशांच्या शेवटीं मोठमोठे हत्ती उभे केले आहेत, असें पुराणांत लिहिलें आहे. त्यांस दिग्गज म्हणतात. ते हत्ती तुझा प्रचंड आकार पाहून लाजतील व आपण मोठे हा गर्व टाकतील.

२. यदुपति म्हणजे कृष्ण हा काळा असून बालपणीं त्याच्या मस्तकीं मोरांच्या पिसाचा मुकुट असे. यास्तव त्याची उपमा मेघास साजण्याकरितां त्याचा नीलवर्ण व त्यावर पडलेलें इंद्रधनुष्य यांचें उल्लेखन केलें आहे. व कृष्णाची कालदशा दर्शविण्याकरतां वृंदावनपरिसरीं हा शब्द घातला आहे.

३. शेतें राखणाऱ्या बायका. त्यांचे डोळे तुला निगीर्ण करतील म्हणजे पाहतील. निगीर्ण शब्दाचा मुख्य अर्थ गिळलेला असा आहे व तो शब्द लाक्षणिक अर्थीं योजिला आहे.

४. नांगरल्यानें ज्यास सुवास येत आहे असा. हें माल याचें विशेष०. अगोटीच्या दिवसांत नांगरलेल्या जमिनीस वास सुटतो हें प्रसिद्ध आहे.

५. माल म्हणजे उंचवट्याची जागा; यावरून प्राकृत माळ हा शब्द निघाला आहे.

६. याचा रानांकडे संबंध.

७. सांप्रत ज्यास अमरकंटक असें म्हणतात. त्याच पर्वताचें आम्रकूट हें प्राचीन काळचें नांव असावें. आम्रकूट शब्दाचा यौगिक अर्थ ज्यावर आंब्यांचीं झाडें पुष्कळ आहेत असा होतो.

साधारण ही नर स्मरतसे केलेले उपकार,
तुजविषयीं तो कैसा होइल कृतघ्न जो अतिथोर[1] ? ४२
पक्कफल[2] अशा आम्रतरूंनीं आच्छादुनि तट गेलें,
ज्याचें तव संबंधें शिर ही नीलवर्ण बहु झालें; ४३
तेणें गिरि तो सुरमिथुनां[3] प्रति गगनांतुनि भासेल,
पीन गौर जणु कुच वसुधेचा मध्याग्रीं जो नील. ४४
भिल्लकामिनी सुखें क्रीडती जेथें तरुकुंजांत,
मंद वृष्टि त्या क्षणभरि गिरिवरि करी ठरुनियां शांत. ४५
विंध्याद्रीच्या कठिण कड्यांहुनि पडतां मग रेवेला[4]
पुढें देखशिल गजशरिरावरि जेविं वर्णरचनेला[5]. ४६
मधुर जळ तिचें यथेच्छ, पिउनी कर मार्गक्रमणातें,
मत्तमतंगजमज्जनयोगें सुगंध येत जयातें. ४७
येतां गुरुत्व[6] तुजला वायू शकेल नच तोलाया,
जो[7] गुरु त्यासच मान लाधतो, हलका[8] तुच्छ कराया. ४८
काळया, पिवळया कळया उमलल्या नीपांवर[9] देखोनी,
जळमय[10] देशीं कोमल केळी फुटलेल्या खावोनी, ४९

---

१. अतिथोर या शब्दावर श्लेष आहे. आकारानें उंच असा एक अर्थ, व प्रतिष्ठित अथवा संभावित असा दुसरा अर्थ.

२. ज्यांचीं फळें पिकलीं आहेत असे. आम्रतरूंचें विशेषण.

३. सुर म्हणजे देव त्यांचीं मिथुनें म्हणजे स्त्री आणि पुरुष अशीं जोडपीं.

४. नर्मदानदीचें दुसरें नांव.

५. हत्तीच्या शरीरावर जशी वर्णरचना म्हणजे रंगाचे पट्टे काढतात, तशी आम्रकूट पर्वतावरून पडतांना नर्मदा दिसेल, अशी उत्प्रेक्षा कवि करतो.

६. जडपणा. पाणी शोषून घेतल्याकारणानें.

७. गुरु म्हणजे वजनदार. गुरुशब्दाचेही वजनदार या शब्दासारखे दोन अर्थ आहेत. जड हा एक अर्थ व अब्रूदार हा दुसरा अर्थ; व हे दोन्ही अर्थ येथें विवक्षित आहेत.

८. याही शब्दाचे दोन अर्थ समजावे. व या वाक्यांत "होतो" या क्रियापदाचा अध्याहार आहे.

९. एका प्रकारचे वृक्ष आहेत. हे पावसाळ्यांत फुलतात.

१०. पानथळ जमिनींत.

प्रथम वृष्टिनें तुष्ट भूमिचा हुंगुनि मधुर सुगंध,
तव मार्गातें मनीं तर्कतिल[1] हर्षित वनीं कुरंग. ५०
चातक चातुर्यें जलबिंदू झेलिति, ते बघेतांना[2],
उडती उंच बलाका गगनीं, त्यांतें ही गणितांना, ५१
एकाएकीं तुझी गर्जना परिसुनि बा बहु मोठी,
गळां पतींच्या मिठ्या मारितिल डचकुनि सिद्धवधूटी[3].५२
सत्वर[4] असशी जरि मत्कार्यी तथापि तुजला वाटे
विलंब व्हाया बहुत कारणें घडतिल, मजला वाटे. ५३
अद्रिअद्रिनीं कुटज विकसुनी परिमळ सुटेल फार,
करितिल केकास्वनें मोर ही तेथें तव सत्कार; ५४
गुंतुनि ऐशा आतिथ्याच्या तया सोहळ्यामाजी
घना, विनवितों पडूं न द्यावी मनांत विस्मृति माझी.५५
होतां, जलदा, तुझें गमन, बा, दशार्ण[6] नामक देशीं,
फुलुनि केतकी सुटेल परिमल तेथें वनप्रदेशीं; ५६
बांधुं लागतिल नगरतरूंवरि काकादिक कोठ्यांतें,
पिकुनि जांभळें नील कांति ही येइल सकळ वनातें.५७
अल्प काळची राजहंस ही राहतील त्या स्थानीं,
पाहुनी तुजला फार च होतिल उत्सुक ते प्रस्थानीं[7].५८

---

१. नीप फुलले, रानकेळी उगवल्या, व जमिनी भिजल्याचा वास सुटला हें पाहून तूं इकडून गेलास अशी अटकळ हरिण करतील.

२. पहात असतां.

३. सिद्ध म्हणून देवांतील अवांतर भेद आहे. त्यांच्या तरुण स्त्रिया.

४. ज्यास त्वरा आहे असा. मेघाचें विशेषण.

५. मार्गांत.

६. हा देश विंध्य पर्वताच्या लगत असून हल्लीं ज्यास माळवा म्हणतात, त्याचा एक भाग असावा.

७. जाण्याविषयीं.

विदिशा[1]नामक सुराजधानी तेथिल प्रसिद्ध फार
तीतें जाउन कामुकतेचें[2] लाधशील फल थोर. ५९

वेत्रवतीजल[3] कमलसुगंधी तरंगमंडित, गोड
वनितावदनापरि चुंबुनियां फेड मनीचें कोड. ६०

त्या नगरीच्या जवळ सखलसा क्रीडापर्वत आहे,
मार्गपरिश्रम हरावयास्तव घडिभरि त्यावरि राहे. ६१

सुंदर वेश्यां सवें जयाच्या[4] विहरति रम्य गुहांत
तरुण नागरिक आनंदानें स्थळ पाहुन एकांत. ६२

आगमनें तव एकाएकीं कदंब मुकुलित[5] होती,
मित्र भेटतां जणु त्या गिरिला रोमांच[6] चि बहु येती. ६३

असति नदीच्या तटीं ताटवे मार्गीं जाइजुईचे,
जातां जीवन वर्षुनि त्यांतें करी टवटवित सांचे. ६४

वनीं माळिणी फुलें वेचितां, मुखें तयांचीं लाल
होती, सुकती कर्णाब्जें[7] ही पुसतां ओले[8] गाल. ६५

करुनि सावली क्षणभर त्यांतें सुखदायक, बा, व्हावें.
परोपकारा करावयातें तुज नलगे सांगावें. ६६

जातां उत्तरपथें वाकडी उज्जयिनी[9] जरि आहे,
तरी तयेचीं रम्यमंदिरें न पाहिल्याविण राहे. ६७

---

१. हल्लीं ज्यास भेलसा म्हणतात त्याच गांवाचें विदिशा हें नांव असावें.

२. कामिपणाचें. या साकीचा अर्थ पुढील साकीवरून स्पष्ट मनांत येईल.

३. वेत्रवती नांवाची एक नदी आहे. तिला हल्लीं बिटवा म्हणतात, तिचें पाणी.

४. ज्या क्रीडापर्वताच्या.

५. कळ्या आलेले.

६. कदंबाच्या कळ्यांवर रोमांच यांची उत्प्रेक्षा केली आहे.

७. कर्णाब्जें म्हणजे कानांवरील कमळें. प्राचीन काळीं कानांवर शोभेकरतां कोवळे पल्लव किंवा देंठासकट फुलें ठेवण्याची रीत होती.

८. उन्हानें घाम येऊन ओले झालेले.

९. उज्जनी.

विजा चमकतां त्या नगरींतिल युवति चकित होवोनी
तुला पहातिल विशाल, चंचल, काळ्या निज डोळ्यांनीं. ६८

जरी न रिझशी, घना, तयांच्या मधुर कटाक्षविलासें,
खचित वाटतें, मला तुझा, बा, जन्म विफल[1] झालासें. ६९

चंचल लहरी लागुनि कलकल करि जी मरालमाला[2],
ती च हिऱ्यांच्या सशब्दकांचीपरि भासते जयेला, ७०

मत्तेपरि[3] जी स्खलन[4] चालतां पावे, प्रकट जयेचा
आवर्तात्मक[5] नाभी होई मधुनिमधूनी सांचा, ७१

निर्विंध्येला[6] त्या त्वां सरसें[7] जातां पथि[8] भेटावें,
विलास हेंची स्त्रीप्रेमाचें स्पष्ट चिन्ह समजावें. ७२

तटीं वाढल्या तरुचीं जीर्णें पर्णें गळूनि खालीं
पडती, त्यांच्या योगें पांडुर कांति जयेला आली. ७३

गांठ पडूनी तुझी लोटले बहुत दिवस त्या योगें
वाळुनि झाली फार च कृश ती जैशी का क्षयरोगें. ७४
घना, धन्य तूं, अशा सुंदरी झुरती तव विरहानें;
करी तयेला तुष्ट लवकरी देउनि जीवनदानें[9]. ७५

---

१. व्यर्थ.

२. हंसपंक्ति.

३. बेफाम झालेल्या स्त्रीप्रमाणें.

४. अडखळणें.

५. आवर्त म्हणजे भोंवरे तोच नाभी. नाभीस पाण्यांतील भोंवऱ्याची उपमा देणें काव्यांत प्रसिद्ध आहे. त्यामुळेंच येथें भोंवऱ्यावर नाभीची उत्प्रेक्षा केली आहे.

६. एका नदीचें नांव.

७. रसिक. त्वां या सर्वनामाचें विशेषण.

८. मार्गी.

९. जीवनशब्दीं श्लेष आहे व दानशब्द यमकाकरतां बहुवचनीं घातला आहे.

काव्य ११२८ वा. काव्य

पुढें अवंती देशीं जाउनि पाहें पुरी विशाला
स्मरती जेथिल वृद्ध नागरिक उदयनभूपकथांला. ७६
सुकृति जनांनीं भूवरि येतां उरलेल्या सुकृतानें
स्वर्गभाग जणु अणिला खालीं त्या नगरीरूपानें. ७७
सारस पक्ष्यांचे जो मंजुल मधुर स्वन विस्तारी,
नवीन फुलल्या कमलां लागुनि त्यांचा सुगंध हारी. ७८
ऐसा शिप्रावात पहाटे श्रमल्या युवतिजनाला
आलिंगुनियां कांतापरि दे जेथें बहुत सुखाला. ७९
धुऱ्या सुगंधी करिती जेथें सुकवाया केसांतें,
धूर तयांचा गवाक्षमार्गें येउनि पोशिल तूंतें. ८०
उभारुनीयां थोर पिसारे प्रासादावरि मोर
हर्षें नाचावया लागतिल देखुनि तुला समोर. ८१
तरुण सुंदरी फिरतां त्यांच्या रंगित जीं चरणांहीं
त्या सौधाग्रांवरी विसावा घ्यावा, जलदा, कांहीं. ८२

---

१. उज्जनी भोंतालच्या देशास पूर्वी अवंती देश म्हणत.

२. उज्जनीलाच विशाला असेंही म्हणत.

३. उज्जनीस प्रद्योत म्हणून एक राजा होता. त्यास वासवदत्ता नांवाची एक सुंदर कन्या होती. ती उपवर झाली असतां पित्यानें तिला संजयनामक एका राजास देऊं केलें. परंतु वासवदत्तेनें स्वमांत कौशांबीनगरीचा राजा उदयन यास पाहिल्यावरून तिनें मन त्यावर पराकाष्ठेचें जडलें व तिनें गुप्त निरोप पाठविल्यावरून उदयन राजानें तिला बलात्कारानें हिरावून नेलें. ही उदयनाची एक कथा आहे. तसेंच सोमदेव कवीच्या सरित्सागर नामक ग्रंथांत या राजाच्या विवाहाची कथा निराळ्या रीतीनें वर्णिली आहे.

४. उज्जनी ज्या नदीवर आहे तिचें नांव शिप्रा. तिच्यावरचा वात म्हणजे वारा. नदीच्या संबंधानें वाऱ्याचा गारपणा व्यक्त होतो.

५. धूर हा मेघांचा एक घटक अवयव असतो या समजुतीनें हें लिहिलें आहे व मागें वाराव्या साकींतही हीच समजूत घेतली आहे.

महाकाल[1] जो त्रिभुवनपति त्या वंदाया मग जावें,
प्रभुकंठाची[2] प्रभा मानुनी गण तुज वर्वतिल भावें. ८३
तया स्थलींचीं आलोद्यानें हलवी मारुत मंद,
विलसित पद्मां डोलवूनि जो हरी तयांचा गंध. ८४
जेथें जवळ चि गंधवतीचा[3] प्रवाह सुंदर वाहे,
विलासिनीच्या स्नानें परिमल जयास बहु येताहे. ८५
दुसऱ्या समयीं पोंचलास तरि जों सूर्योदय होई,
तोंवरि थांबे, पुढें जावया न करी कांहीं घाई. ८६
प्रभातपूजासमयीं प्रभुच्या दुंदुभि[4]कार्य करोनी,
मंद गर्जना सफल घडो तव शिवसेवे लागोनी. ८७
चरणीं वाजति मंजुळ पैंजण ज्या करितां नृत्यातें,
करीं धरूनी चातुर्यें ज्या डोलविती चवऱ्यांतें. ८८
नानापरिचीं रत्नभूषणें झळकति बहुत जयांचीं,
श्रमें होउनी लाल शोभती सुंदर वदनें सांचीं. ८९
त्या गणिकां[5]वरि तेथें शीतल जलबिंदू तव कांहीं
पडतां त्या तुजकडे पहातिल हर्षभरित नयनांहीं. ९०

---

१. उज्जनीजवळ शिवाचें एक प्रख्यात स्थान आहे. त्यास महाकाळेश्वर म्हणतात. तो हा.

२. प्रभु म्हणजे शिव. त्यानें समुद्रमंथनकाळीं कालकूट नामक विषप्राशन केल्यामुळें त्याचा गळा काळा झाला आहे, हें पुराणप्रसिद्ध आहे, व मेघाचाही रंग काळा असतो, यास्तव मेघावर शिवाच्या प्रमथादि गणांस म्हणजे दूतांस आपल्या स्वामीच्या कंठप्रभेची भ्रांति होईल, असें कवीनें येथें वर्णिलें आहे.

३. एका नदीचें नांव.

४. दुंदुभि म्हणजे नगारा. त्याचा व मेघाचा शब्द सारखा असल्यावरून मेघास त्याचें काम करण्याविषयीं प्रार्थना केली आहे.

५. मोठमोठ्या देवस्थानीं वतनदार नाचणाऱ्या कलावंतिणी असतात हें प्रसिद्ध आहे व त्या चालीला लक्षून या मात्र्या लिहिल्या आहेत.

उमलुनि कमलें निघति तयांतुनि भृंगसंघ कीं जैसे,
घना, तयांचे काळे चंचळ कटाक्ष दिसतिल तैसे. ९१

तांडव करितां शंभु तयाचें भुज निज पटलें व्यापी,
संध्यातेजें रक्त होय जें मुळचें कृष्ण तथापी. ९२

ऐशा सौम्योपायें येतां ओल्या गजचर्मांची
शोभा पाहुनि तुजवरि गिरिजा प्रसन्न होइल साची.९३

अंधार पडतां दाट त्यामध्यें चोरुनि दयितगृहातें
जाया निघती तरुण कामिनी रात्रीं, घना, तयांतें ९४

न भेडवी, बा, करुनि गर्जना अबला त्या जाणोनी;
तरी दाखवी मार्ग तयांप्रति दिवटी वीज करोनी. ९५

भ्रमतां विद्युल्लता प्रिया तव घेउनि तीस निवांत
मंदिरशिखरीं कोठें तरि मग व्हावें त्वां विश्रांत. ९६

रवी उगवतां पुन्हा क्रमाया लागावें मार्गास;
कधीं न गणिती सज्जन करितां मित्रकार्य आयास.९७

मानखंडणा केली ज्यांची टाळुनि संकेतातें
त्या योगें ज्या रुसुनि बैसती गाळित अश्रुजलातें. ९८

त्या दुःखित कामिनींस वल्लभ समजावया सकाळीं
येती, यास्तव न लांबवावें काळोखा त्या काळीं. ९९

---

१. शिव गजचर्म म्हणजे हत्तीचें कातडें पांघरतो, हें पुराणप्रसिद्ध आहे, व तें कातडें ओलें असतें असेंही कोठें कोठें वर्णन असतें. त्यावरून कवि मेघास म्हणतो कीं तूं शिव प्रदोषकाळीं पार्वतीपुढें नृत्य करीत असतां त्याचे शरीरास लपेटून रहा म्हणजे तूं काळा असल्यामुळें व तुजवर संध्याकाळचें लाल किरण पडल्यामुळें ओलें, म्हणजे ज्यास रक्त लागलें आहे, असें गजचर्म पांघरल्याप्रमाणें शिव दिसेल, व वास्तविक ओल्या गजचर्माचा हिडिसपणा नसून त्याची शोभा मात्र येईल, आणि तसें झाल्यानें पार्वती तुजवर संतुष्ट होईल.

नीहाराश्रु कमलमुखींचें नलिनीच्या[1] स्वकरानें,
पुसावयास्तव रवि परदेशाहुनि येतां वेगानें, १००
मार्गी येशिल अडवा तर तो तुजवर बहु कोपेल.
प्रियतमजनसंगमास ऐसें विघ्न कोण साहेल ? १०१

गंभीरेच्या[2] प्रसन्न अभ्यंतरांत[3] सुंदर रूप
तुझें बिंबुनी[4], घना, तयेला होइल हर्ष अमूप. १०२

मत्स्य उसळतां उदरें त्यांचीं चमकति वारंवार,
त्याच मिषें ती नदी तुजवरी फेंकिल कटाक्ष फार. १०३

व्यर्थ मनोरथ न करी तीचा धैर्य धरुनियां खोटें
अनुरक्तस्त्रीप्रेम खंडुनी असे न भूषण मोठें. १०४

विलासरंगीं तिच्या गुंततां विलंब सहज घडेल,
अशा प्रसंगीं प्रिया सोडुनी जाया कोण शकेल ? १०५

तव वृष्टीनें तृप्त वसुमती आनंदोद्गारांतें
टाकी, त्यांच्या संपर्कानें येत सुगंध जयातें[5], १०६

दिनमणिकिरणीं तप्तमतंगज उचलुनि शुंडादंड
स्वस्थ जयांचें प्राशन करुनी पावति सौख्य उदंड, १०७

---

१. नलिनी म्हणजे कमलिनी. तीवर स्त्रीची कल्पना करून कमलावर मुखाची व त्यावरील दवावर अश्रूची कल्पना केली आहे, व सूर्य कमलिनीचा पति कल्पून तो आपल्या करांनीं म्हणजे किरणांनी तिचें तें अश्रु पुसून तिला समजावीत आहे असें वर्णिलें आहे. या ठिकाणीं कर व परदेश या शब्दांवर श्लेष असून तो मुख्य उत्प्रेक्षालंकारास उपयोगीं पडतो.

२. एका नदीचें नांव.

३. या शब्दांत श्लेष आहे. अभ्यंतर म्हणजे आंतला भाग व दुसरा अर्थ हृदय.

४. तसाच बिंबुनि या शब्दावरही श्लेष आहे.

५. या व पुढील साकींतल्या जया या संबंधी सर्वनामाचा वात या नामाकडे संबंध आहे.

निजसंयोगें उदुंबरफलां[1] जो पिकवीत वनांत,
देव[2]गिरीप्रति सुखें [illegible]ती येइल तुज [illegible]त. १०८
त्या गिरिशिखरीं सतत वसतसे स्कंद[3] तयास पुजाया
वर्षे तेथें, घना, करूनी कुसुममयी[4] निजकाया. १०९
सुरसेनेचा[5] नायक व्हाया निर्मी शंकर ज्यातें,
लाजे रवि ही पाहुनि त्याच्या अत्युज्ज्वल तेजातें. ११०
दणाणवी गिरिगुहा, घना, मग करुनि गर्जना थोर,
जेणें हर्षुनिया स्कंदाचा नर्तन करील मोर[6]. १११
रत्नांपरि झळकती जयाचीं सुंदर पिसें, तयांतें
पुत्रप्रेमें गिरिजा[7] कर्णीं धरि टाकुनि कमलांतें. ११२
यापरि सेवुनि परम भक्तिनें ब्राह्मण्यद[8] देवातें,
पुढें उत्तरेकडेस जातां लंघुनियां मार्गातें. ११३

---

१. उंबराचीं झाडें.

२. देवगिरि हें उज्जनी व चंबळ नांवाची नदी यांच्यामधील एकाद्या डोंगराचें प्राचीन नांव असावें. या डोंगरावर पूर्वी कार्तिकस्वामीचें देऊळ असावें, व ही कविता लिहिली त्या वेळेस तें देवस्थान फार प्रसिद्ध असावें, असें पुढील वाक्यांवरून स्पष्ट दिसतें. हल्लीं त्या नांवाचा डोंगर व तें कार्तिकस्वामीचें देऊळ वर सांगितलेल्या प्रदेशांत कोठें प्रसिद्ध नाहीं. पूर्वी ज्यास देवगड म्हणत व हल्लीं ज्यास दौलताबाद म्हणतात, तोच देवगिरि असावा असें कोणी म्हणतात; परंतु तें स्थान उज्जनीच्या दक्षिणेस दूर असल्यामुळें व मेघाचा मार्ग त्या नगराच्या उत्तरेकडे असल्यामुळें तें या ठिकाणीं धरतां येत नाहीं.

३. कार्तिकस्वामी.

४. पुष्पमय. मेघास इच्छित रूप धरण्याचें सामर्थ्य वर कल्पिल्यामुळें त्यास येथें पुष्पमय शरीर धारण करण्याची सूचना केली आहे.

५. कार्तिकस्वामी हा शिवपार्वतींचा पुत्र होय व शिवानें देवांचा सेनापति करण्याकरतां यास उत्पन्न केलें ही कथा पुराणप्रसिद्ध आहे.

६. स्कंदाचें वाहन मोर आहे, व मोर मेघगर्जना ऐकून हर्षानें नाचूं लागतात, हें प्रसिद्धच आहे.

७. पर्वतकन्या, पार्वती.

८. ब्राह्मण्यद म्हणजे ब्राह्मणपणा देणारा. पुरुषानें कार्तिकस्वामीचें दर्शन घेतल्यानें त्यास सात वेळ ब्राह्मणकुलांत जन्म प्राप्त होतो अशी समजूत आहे.

होतिल दूर तुला देखूनी गगनतलीं गंधर्व,
धरूनि भीती कीं निज वाद्यें जातिल भिजूनि सर्व. ११४
पावशील मग पुढें चालतां एका नदीतटाकीं,
मूर्तिमती जी रंतिदेवनृपकीर्तिच विलसे लोकीं, ११५
तो राजर्षी बहु [1]धेनूंतें यज्ञीं वधिता झाला,
सरक्तचर्मांपासुनि त्यांच्या जीचा उगम निघाला, ११६
म्हणुनि चर्मण्वती[2] पुराणीं म्हणती कैवी[3] जयेला.
उतरुनि खालीं सादर चित्तें भेटे, वना, तयेला, ११७
तिच्या प्रवाहीं पांडुरवर्णीं कृष्णवर्ण तव देह
देखुनि गगनांतुनि सिद्ध मनीं पावतील संदेह ११८
भूदेवीनें[4] जणु धरियेला कंठीं मुक्ताहार
मध्यें ज्याच्या इंद्रनील मणि सुंदर चमके फार. ११९
दशपुरनगरावरूनि जातां तेथिल सुंदर नारी
तुला देखतां प्रकट करूनी भ्रुकुटिविलासां भारी, १२०
कृष्ण बहु परी शुभ्ररक्त ही मधुर कटाक्ष तयांचे,
दिसतिल चंचल कुंदमुकुलगत[5] भृंगसंघ जणु साचे. १२१
ब्रह्मावर्ताभिध[6] देशांतुनि जाउनि पुढती पाहे

---

१. सांप्रतकाळीं यज्ञांत जशीं बकरीं मारतात, तसा पूर्वकाळीं गाईचा यज्ञांत वध करीत याविषयी वेदांत व पुराणांत पुष्कळ प्रमाणें आहेत.

२. या नदीस सांप्रत चंबल म्हणतात.

३. विद्वान्, ज्ञाते.

४. पृथ्वीरूप जी देवी तिनें.

५. कुंदाच्या कळींत पांढरा व तांबडा रंग असतो. व भ्रमरांचा रंग काळा आहे. यास्तव कुंदकळ्यांवर बसलेल्या भ्रमरांची उपमा नेत्रकटाक्षांस दिली आहे.

६. सांप्रत ब्रह्मावर्त हें नांव ज्या गांवास देतात, तें येथें घ्यावयाचें नाहीं. प्राचीनकाळीं ब्रह्मावर्त हें नांव एका प्रांतास देत असत. सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांच्या मध्यें हा प्रांत आहे. व हा प्रांत विकानेरच्या पूर्वेस आहे.

अतिविख्यात [illegible]; नाम जया कुरुक्षेत्र[१] हें आहे. १२२
जेथें पूर्वी धनंजये[२] [illegible], राजपक्षातें
नासियलें; तूं करिशी जसें जलें वर्षुनि कमलांतें. १२३
कौरव पांडव यांचा देखुनि उद्भवला संग्राम
चित्तीं द्रवला बंधुजनांचा[३] कनवाळू बळराम; १२४
पक्षपात मग टाळाया तो यात्रामिषा करोनी,
जींत रेवतीनेत्र[४] बिंबले ती हि सुरा[५] सोडोनी, १२५
सरस्वतीच्या तटीं पातला; तीच्या सेवि जलाला,
शुभ्र[६] अंतरीं होउनि दिसशिल वरुनिमात्र मग काळा. १२६
तेथुनि पुढती कनखलनामक[७] तीर्थावरुनि जातां,
देखशील मग जन्हुकन्यका[८] हिमगिरिखालीं येतां, १२७

---

१. कुरुक्षेत्र हें मोठें सपाट मैदान असून या ठिकाणीं भारतांत वर्णिलेलें कौरवपांडवांचें महाप्रख्यात युद्ध झालें होतें. सोनपतपानपत हीं गांवें ज्यांजवळ सुमारें शंभर वर्षांपूर्वी मराठ्यांची व अफगान लोकांची मोठी लढाई झाली तीं गांवें याच मैदानांत आहेत.

२. अर्जुनानें.

३. कौरव पांडव हे परस्परांचे चुलतभाऊ होते व यादवांचें व कौरवपांडवांचें साधारण नातें असून कृष्ण व बलराम हे पांडवांचे आतेभाऊ होते.

४. बळरामाच्या स्त्रीचें नांव रेवती.

५. बळरामास सुरा फार आवडत असे. विलासी जनाची मद्यपान करण्याची रीत अशी प्राचीन काव्यांत वर्णिली आहे की मद्याचा प्याला प्रथम आवडत्या स्त्रीस देऊन तिचें उष्टें आपण प्यावें. त्या संबंधानें रेवतीचे नयन सुरेंत बिंबले असें येथें वर्णिलें आहे.

६. पुण्याचा रंग पांढरा व पापाचा काळा अशी कवींची परिभाषा आहे, तीस अनुसरून या साकींतलें वर्णन आहे.

७. हिमालयावरून उतरून गंगानदी जेथें सपाट मैदानांत वाहूं लागते, त्या ठिकाणास गंगाद्वार किंवा कनखल तीर्थ म्हणतात.

८. जन्हुनामक कोणी राजा होता. त्याविषयीं पुराणांत अशी कथा आहे कीं पूर्वी भगीरथानें गंगेस स्वर्गाहून खालीं भूमंडलावर आणिलें असतां, तिचा ओघ जन्हु राजा यज्ञ करीत होता, तेथें जाऊन त्या यज्ञास विघ्न झालें. तेणेंकरून त्या राजास राग येऊन त्यानें ती सगळी नदी पिऊन टाकली. पुढें भगीरथानें प्रार्थना केल्यावरून प्रसन्न होऊन त्यानें ती कानावाटे सोडली. यामुळें गंगेस जान्हवी म्हणजे जन्हूची कन्या असें नाम प्राप्त झालें.

कपिल[1]शापहत सगरसुतांची जी मनिं उपजुनि माया
सोपानांची पंक्ति च झाली स्वर्गीं त्यां चढवाया. १२८
वसुनि शंभुच्या शिरीं जटांशीं खेळे लहरिकरांनीं
गिरि[2]जा भ्रूकुटी मोडी परि तें जी किमपि ही न मानी. १२९
तीचें जल सु[3]रगजापरी तूं गगनांतुनी लवोनी
पितां सांवली तुझी प्रवाहीं पडतांना देखोनी, १३०
जणु अस्थानीं गंगायमुनासंगम काय जहाला!
ऐसें वाटुनि खचित च मोटें होइल नवल जनाला. १३१

---

१. ही कथा अशी आहे कीं पूर्वी सगर नामें मोठा पराक्रमी सार्वभौम राजा होता त्यास साठ हजार पुत्र होते. त्या राजानें शंभर अश्वमेध करण्याचा संकल्प करून नव्याणव यज्ञ केले व शंभराव्या यज्ञास आरंभ करून घोडा सोडला असतां इंद्रास धाक पडला कीं शंभर यज्ञ सांग शेवटास गेल्यास सगर राजास माझें पद मिळेल व त्या धाकानें त्यानें तो यज्ञांतला अश्व चोरून नेऊन पाताळलोकीं कपिल नामक ऋषीच्या आश्रमांत बांधून ठेविला. इकडे सगराचे साठ हजार पुत्र अश्वरक्षणास होते. त्यांस तो नाहींसा झालासें पाहून क्रोध आला व त्याकरतां त्यांनीं सर्व पृथ्वी सोधली. परंतु तीवर तो नाहींसें पाहून पृथ्वी खणून ते पाताळलोकीं गेले. त्यांनीं जी मोठी खांच खणली तो समुद्र झाला व सगरपुत्रांनीं तो खणून केल्यावरून त्यास सागर असें नांव पडलें. असो. पाताळी ते गेल्यावर तेथें त्या ऋषीच्या आश्रमीं तो अश्व त्यांनीं पाहिला, व कपिल मुनि तेथें समाधिस्थ वसला होता, तोच चोर असून त्यानें आपला अश्व चोरून आणला व तो ढोंग करून डोळे मिटून बसला आहे असें त्यांस वाटून त्यांनीं त्यास छळावयास आरंभ केला. तेव्हां त्या ऋषीनें डोळे उघडून रागानें पाहतांच जळून त्यांची राख झाली. पुढें सगर राजास ती दुःखवार्ता कळून त्यानें फार शोक केला. मग त्यास असें समजलें कीं गंगेच्या उदकाचा स्पर्श जर त्यांच्या राखेस होईल तर हे आपले पुत्र शापमुक्त होऊन उद्धरतील. त्या वेळेपर्यंत गंगा स्वर्गीं होती. तीस तेथून भूमंडळीं आणावयाकरतां त्या राजानें व त्याच्या पुत्रानें बहुत तपश्चर्या केली; परंतु कार्यसिद्धि न होतां ते मरण पावले. पुढें त्याचा पणतू भगीरथ नामें राजा झाला त्यानें अति कठिण तप करून गंगेस आणून पूर्वजांचा उद्धार केला. त्यावरून गंगेस भागीरथी हें नांव पडलें.

२. गंगा शिवाच्या मस्तकीं असते त्यावरून तिला शिवाची स्त्री कल्पिली आहे व त्यामुळें पार्वतीचा व तिचा सवतीचा संबंध येथें कल्पिला आहे.

३. देवांचा हत्ती ज्यास ऐरावत म्हणतात.

कस्तूरीमृग बैसुनि जेथें शिला सुगंधित होती,
कर्पूराच्या राशींपरि जीं हिम वर्षुनि दिसतातीं, १३२
हिमगिरिच्या त्या शिखरांवरि तुज बघुनि घेत विश्रांती,
लोकां होइल सपंक[1]शृंग[2]त्र्यंबकवृषभभ्रांती. १३३
सुटूनि वायू देवदारुतरु घांसुनि परस्परांतें,
पेटुनि वणवा चमरीपुच्छें जाळुनि गिरिराजांतें,. १३४
पीडा देतां सत्वर वर्षे जळ त्यातें शमवाया,
सज्जन संचय[3] करिती केवळ दुःखितदुःख[4] हराया. १३५
शिलातलावरि असतिल तेथें उठलीं पदें[5] शिवाचीं,
भक्तिपुरःसर पूजा करिती मुनिजन नित्य जयांची, १३६
ज्यांच्या दर्शनमात्रें भावुक जन जाळुनि पापांतें,
मरणानंतर सुखें पावती स्थिर सायुज्यपदांतें[6]. १३७
वंदुनि त्यांतें प्रदक्षिणा ही करुनी अनन्य भावें
सुकृत यापरी जोडुनि पुढती मार्गा त्वां लागावें. १३८
मिळुनि गिरिवरी किन्नरनारी त्रिपुरविजय[7] गातांना,
सुटूनि वायू वेळूंतुनि ही मधुर स्वर निघतांना, १३९
गुहांत तव गर्जना घुमोनी मृदंगकार्य[8] करील,
गिरिशयशाचें गायन तरि मग यथासांग होईल. १४०

---

१. ज्याच्या शिंगांस चिखल लागला आहे असा. हें त्र्यंबकवृष याचें विशेषण.

२. त्र्यंबक म्हणजे ज्यास तीन नेत्रें आहेत असा जो शिव, त्याचा वृष म्हणजे बैल. शिवाचें वाहन जो वृषभ त्याचा रंग पांढरा कल्पिला आहे. म्हणून त्याची उपमा हिमालयास दिली व त्याच्या शिखरावर काळा मेघ असल्यामुळें त्या वृषभास "सपंकशृंग" हें विशेषण दिलें आहे.

३. संचय म्हणजे सांठा. प्रकृत ठिकाणीं मेघाजवळचा पाण्याचा सांठा घ्यावयाचा.

४. दुःखिताचें दुःख.

५. हिमालयावर शिव पार्वतीसहवर्तमान संचार करतो अशी प्रसिद्धि आहे.

६. सायुज्य म्हणून एक मुक्तीचा प्रकार आहे.

७. त्रिपुरनामक कोणी दैत्य होता त्यास शिवानें जिंकिलें ती गोष्ट.

८. मुरदुंगाचें काम.

ते ते पाहुनि चमत्कार मग जावें क्रौंचे[1] गिरीतें,
भार्गवरामें[2] तीक्ष्ण शरांहीं करितां विवर जयातें, १४१
झाला हंसां मार्ग यावया इकडे सहज सुखानें,
दिसशिल जातां त्या विवरांतुनि उत्तरेस वेगानें, १४२
जणू बळीच्या[3] निग्रहकाळीं वर्धमान विष्णूचा
विशाल अडवा चरण उचलिला कृष्ण वर्ण कीं सांचा. १४३
तेथुनि वरतीं चढूनि जातां लागे गिरि कैलास,
वीर्यमदानें मत्त दशाननें[4] पूर्वी उचली ज्यास; १४४
गगनमंडळीं शुभ्र जयाचीं शृंगें बहु देखोनी
गमे शिवाचा अट्टहास[5] ची झळके एकवटोनी; १४५
सुरांगनांचा विशाल निर्मळ आदर्शचि[6] जो आहे,
थोर असा जो गिरी त्यावरी, वना, सुखानें राहे. १४६
कृष्णवर्ण तूं तटीं बैसतां गौरवर्ण तो शैल
दिसेल हलधर[7] जणु पांघरला निळें आपुलें चैल. १४७

१. हिमालयाच्या अनेक शिखरांपैकीं एका शिखरास क्रौंच हें नांव असावें.

२. भार्गवराम म्हणजे परशुराम, हा कैलासपर्वतीं शिवापाशीं धनुर्विद्या शिकत असतां त्यानें क्रौंचपर्वतावर बाणांचीं निशाणें मारून मारून त्यास आरपार भोक पाडलें अशी पुराणांत कथा आहे. व त्या वाटेनें उत्तरेकडून हंसपक्षी इकडे येतात असें म्हणतात.

३. वामनावतारीं विष्णूनें वाढून तीन पावलांत सर्व त्रिभुवन व्यापलें आणि बलीनामक दैत्यास पाताळीं घातलें, त्या वेळच्या विष्णूच्या पायाची उपमा मेघास काळ्या रंगावरून व महत्त्वावरून येथें दिली आहे.

४. रावणास बळाचा गर्व होऊन त्यानें कैलासपर्वत उचलला होता अशी कथा आहे.

५. अट्टहास म्हणजे मोठ्यानें हसणें. हसण्याचा रंग कवि पांढरा कल्पितात त्यावरून एकवटलेल्या शिवाच्या हास्याची उत्प्रेक्षा कैलासावर केली आहे. फार बर्फ असल्यामुळें कैलासपर्वतही पांढराच आहे.

६. आदर्श म्हणजे अरसा. बर्फाच्या योगानें चकाकी असल्यानें कैलासास आरशाची उपमा दिली आहे.

७. हलधर म्हणजे बळराम. त्याचें आयुध हल म्हणजे नांगर असल्यामुळें त्यास हलधर हें नांव पडलें. बलराम गोरा होता व त्यास निळा पोषाक आवडत असे असें पुराणांत वर्णन आहे.

तेथें काढुनि भुजंग[1]कंकण हस्तीं धरुनि उमेतें.
निघेल शंकर मणिशिखरीं जरि करावया क्रीडेतें, १४८
[2]जलस्तंभ, वा, करुनि अंतरीं सोपानापरि व्हावें,
[3]जगज्जनक दंपतींस सेवुनि सार्थक जन्म करावें. १४९
तेथें सांपडतां तूं ग्रीष्मीं खचीत ची सुरनारी
क्रीडारंगीं मत्त होउनी छळतिल तुजला भारी. १५०
ज्यापरि कारंज्यांतुनि त्यापरि उडावया जलधारा
भूषणरत्नीं टोंचितील त्या देह तुझा, वा, सारा. १५१
मार्ग एक ची दिसतो त्यांच्या हातुनि सुटावयातें
करुनि गर्जना मोठी जरि तूं भेवविशील तयांतें. १५२
होतीं हेमा[4]ब्जें ज्यांत अशा मानस सरोवरांचें
प्राशी जल, मुखवस्त्र हि होई क्षणभर श[5]क्रगजाचें; १५३
कल्पतरूचे कोमळ पल्लव हलवी मंजुलवातें;
करूनि ऐशा लीला रिझवी तेथें निज चित्तातें. १५४
जशी प्रिया स्त्री प्रिय दयिताच्या तैशी उत्संगीं जी
कैलासाच्या बसे, न जीला तुलना भुवना माजी; १५५
जिचीं मंदिरें गगनीं गेलीं, त्यांवरि वर्षाकाळीं
दिसती घन जणु केशकलाप चि शोभे ललनाभालीं; १५६
धवळदुकूळापरि गंगेचा प्रवाह सरकुनि गेला
जीपासुनियां दूर अशा तूं देखशील [6]अलकेला. १५७

---

१. शिव सर्पाचीं भूषणें घालतो. पार्वतीस भीति न वाटावी म्हणून ज्यानें सर्परूप कंकण हातांतून काढून टाकलें आहे.

२. जलस्तंभ म्हणजे पाणी स्थिर करणें.

३. जगास उत्पन्न करणारीं स्त्रीपुरुषें म्हणजे शिवपार्वती.

४. सोन्याचीं कमलें.

५. शक्र म्हणजे इंद्र, त्याचा हत्ती, ऐरावत, त्याचें मुखवस्त्र हो, म्हणजे त्याच्या तोंडावरचा पडदा हो.

६. कुबेराच्या राजधानीचें नांव.

उत्तर मेघ.

वीज वसे तुज जवळ, त्यांमधीं सुंदर वनिता फिरती
इंद्रधनू तुज शोभवितें, ते रंगें विचित्र दिसती; १५८
करिशी गंभीर ध्वनि तूं, ते घुमती मृदंगनादें;
जळमय असशी तूं, त्यांतें ही मणिरचना कांती दे;१५९
उंच फार तूं, तच्छिखरवरें ही गगनमंडलीं गेलीं;
अलकाप्रासादांहीं यापरि बरावरी तव केली. १६०
विलासिनींच्या हस्तीं तेथें कमलें, कुंदकळ्या ही
शिरीं शोभती, मुखीं पांडुता येई लोध्ररजांहीं, १६१
कर्णी विलसे शिरीष सुंदर, केशीं कुरबक साजे,
नीपपुष्प ही दिसतें भांगीं, सुचवी घनागमा जें. १६२
जेथें नित्य फुलूनि तरु त्यांवरी गुंगती भुंगे;
नित्य डोलती विकसुनि नलिनी कलहंसांच्या संगें;१६३
नित्य नाचती मोर उभारुनि सुंदर थोर पिसारे;
प्रकाशुनीयां नित्य चंद्रही उजळी प्रदेश सारे. १६४
अन्य हेतुनीं न अश्रु जेथें, तें केवळ आनंदें;
दुजा न जेथें, कामज्वर ची निवार्य जो स्वच्छंदें; १६५
प्रेमकलह ची, दुजें न भांडण जेथें विदित जनांला;
तारुण्याविण अन्य वय नसे ठावें कधिहि तयांला;१६६

---

१. या षष्ठीचा संबंध शिर, मुख, कर्ण, केश व भांग या सर्वांकडे लावायाचा. सहाही ऋतु त्या नगरींत एककाळीं वास करतात हें दाखविण्याकरतां येथें प्रत्येक ऋतूंत होणाऱ्या एकेक पुष्पाचें वर्णन केलें आहे. कमलें शरदृतु सुचवितात; कुंद पुष्पें शिशिर दाखवितात; लोध्र नामक फुलें हेमंत सुचवितात; कुरबक (कोरांटी) व शिरीष (जवस) या झाडांस यथानुक्रम वसंत व ग्रीष्म या ऋतूंत फुलें येतात; आणि नीप (कळंब) हा वृक्ष पावसाळ्यांत फुलतो हें तर कवीनेंच उघड लिहिलें आहे.

२. घनागम म्हणजे मेघांचें येणं, पावसाळा.

३. वरील वाक्यांतीलच व्यंग्यार्थ येथें दुसऱ्या रीतीनें वर्णिला आहे.

मधुर मृदंगादिक वाद्यांचे ध्वनी ज्यांत उठताती,
तळीं जयांच्या बिंबुनि[1] तारा फुलांपरी दिसताती, १६७

अशा मंदिरीं रत्ननिर्मितीं यक्ष बसुनि आनंदें
सर्वे प्राशिती विलासिनींच्या मधुर मधु स्वच्छंदें. १६८

गंगातीरीं कल्पतरुतळीं सुटतां मंजुळ वारें
क्रीडति धन्या किन्नरकन्या जेथें बहु प्रकारें; १६९

कोणी कोणी कनकवाळुकेमाजीं लपविति रत्नें;
सोधुनि काढावया लागती कोणी तीं अति यत्नें. १७०

कांतासह एकांतीं करितां विनोद सहज सुटोनी
गांठ निरीची, सईल शालू होतांना देखोनी, १७१

प्रियें ओढितां लाजुनि युवती रत्नदीप, विझवाया
मुठी भरूनी गुलाल टाकी, परि जाती त्या वायां. १७२

तुझ्या सारखे, किती एक घन घेउनि वायु सहाय,
उच्च मंदिरीं शिरुनि तेथच्या चित्रां करिति अपाय, १७३

मग ते पावुनि भीति अंतरीं धूपाच्या रूपानें
पडती बाहेरी खिडक्यांतुनि चोरां परि वेगानें. १७४

क्रीडारंगीं दंग सुंदरी होतां कांतासंगें
दृढालिंगनादिकें करूनी उबलीं अपुलीं अंगें १७५

शीतळ व्हाया गळां घालिती चंद्रकांतमणिहार,
पडुनि चांदणें वरी जयांतें सुटती पाझर गार. १७६

अखंड लक्ष्मी नित्य करितसे वास जया नगरींत,
किन्नर सुस्वर गाती जेथें धनदस्तुतिपर गीत; १७७

---

१. गच्या रत्नांच्या असल्यामुळें त्यांत नक्षत्रें बिंबून फुलें पसरल्यासारखीं शोभतात.

जेथिल उद्यानीं कामी जन तरुण अप्सरां संगें
परोपरीचे विलास करिती होउनि दंग अनंगें. १७८

ठायीं ठायीं फुलें सुटोनी वेण्यांतुनि पडलेलीं,
कोठें कोठें सुवर्णकमलें कर्णींचीं गळलेलीं, १७९

तशीं विखरलेलीं मोतीं ही तुटुनि गळ्यांतिल हार,
दाविति जेथें रात्रीं झाला तरुणींचा संचार. १८०

कुबेरमित्रत्वास्तव जेथें करितो शंकर वास,
[1]भयें तयाच्या चाप धराया धैर्य नसे मदनास; १८१

तथापि करिती विलासिनींचे कटाक्ष काम [2]तयाचें
अचुक टाकिती हृदय वेधुनी जे कीं कामिजनाचें. १८२

वस्त्रें उत्तम, सुगंध सुमनें, मदिरा मधुर हि फार,
परोपरीचीं रत्नकंकणें, तसे च मौक्तिकहार, १८३

[3]लाल कराया पाय रंग ही, उटी तशी अंगास,
सर्व हि देई कल्प[4]वृक्ष ची एक जिथें वनितांस. १८४

त्या नगरींत धनेशगृहाच्या उत्तरेस दिसतें जें
दुरुनि सुंदर मंदिर मोठें, तें च जाण घर माझें. १८५

नानारत्नीं खचित जयाचें द्वार उंच बहु साजे,
अपूर्व शोभा पाहुनि ज्याची इंद्रचाप ही लाजे. १८६

---

१. मदनास शिवानें जाळलें होतें. यास्तव शिवास मदन भितो अशा प्रकारची कल्पना प्राचीन काव्यांत बहुत ठिकाणीं आहे.

२. मदनाचें; मदनानें धनुष्य धारण करून जें करावयाचें तें काम स्त्रियांचे कटाक्षच करतात.

३. तळपायाला अळिता लावून ते लाल करण्याची पूर्वी स्त्रियांत चाल असे.

४. कल्पवृक्ष या शब्दाचा अर्थ असा आहे कीं त्याखालीं बसून जें जें कल्पावें म्हणजे इच्छावें तें तें तत्काल प्राप्त होतें.

असे जवळ [1]त्या एक नवीन चि कल्पवृक्ष सुकुमार,
थोर फुलांचे गुच्छ येउनी जो लवलासे फार; १८७
प्रिया करांनीं नित्य घालुनी पाणी सायंकाळीं
अति कनवाळूपणें जयाला मुलासारिखा पाळी. १८८
आहे सुंदर तळें हि तेथें लहानसें, ज्या माजीं
नित्य शोभती बहुत फुलोनी सुवर्णकमळें ताजीं, १८९
पांचेच्या पायऱ्या सभोंतीं असति ज्यांत उतराया,
जयांत नेमस्त चि जल असतें क्रीडा खीस कराया, १९०
वर्षाकाळहि येतां [2]तेथें हंस सुखें वसताती,
जवळ हि असतां [3]मानस तिकडे कधीं हि ते न च जाती १९१
त्या च तळ्याच्या कांठीं आहे क्रीडापर्वत, ज्याचें
नीळमण्यांचें चमके सुंदर उंच शिखर तें सांचें, १९२
ज्याच्या भोंतीं सुवर्णकदली झळकती चित्रविचित्रा,
विजेस[4]हित तुज देखुनि मजला आठवतो तो, मित्रा. १९३
मध्यें मंडप मधुमालतिचा, गुलाब शोभति भोंतीं.
काय वर्णुं तीं सुखें, त्या स्थलीं जीं अनुभविलीं होतीं. १९४
त्या कुंजांच्या जवळ बकुळिचा एक सुबक तरु आहे,
तसा तांबडा अशोक तेथें चंचलपल्लव पाहे, १९५
पहिला[5] मज परि तुझ्या सखीच्या वदनांतील मदिरेतें

---

१. त्या घराच्या.

२. त्या तळ्यांत.

३. मानस नामक सरोवर.

४. विजेचें व सुवर्णकेळीचें साम्य, व मेघाचें व नीळमणिखचित क्रीडा-पर्वताचें साम्य.

५. पहिला म्हणजे बकुलवृक्ष. या झाडाविषयीं प्राचीनकाळीं अशी समजूत होती कीं स्त्रियांनीं मद्याच्या गुळण्या याच्या मुळांशीं टाकल्या असतां त्यास पुष्कळ फुलें येतात.

वांछी, दुसरा[1] तिच्या इच्छितो वामचरणघातातें. १९६
असे मांडला पांचमण्यांचा पिंजरा तेथें थोर,
वसे त्या मधें कनकयष्टिवर रात्रीं अमुचा मोर. १९७
प्राणांची मम धनीन शिकवी नाचायास जयातें
रक्तकंकणीं युक्त करांनीं धरूनियां तालातें. १९८
जेथें ऐशीं सकल लक्षणें मित्रा तुज दिसतील;
ज्याच्या द्वारीं शंखे[2] पद्महि, लिहिलेले असतील, १९९
तें च आमुचें गृह, नसल्यानें मी जें उदास भासे,
सहस्ररश्मी[3] गगनीं नसतां कैसें कमल विकासे ? २००
मग लवलाहीं बालगजाचें सुंदर रूप धरोनी,
सांगितलेल्या क्रीडागिरिच्या शिखरावरि बैसोनी, २०१
तेथुनि अपुली चंचल विद्युद्दृष्टी[4] लांब करोनी,
पाहे, मित्रा, जलदा, अमुच्या मंदिरांत निरखोनी. २०२
अंग जयेचें पातळ, रंग हि चंपक फुलासमान,
दंतपंक्ति कीं कुंदकळ्यापरि दिसते विराजमान, २०३
जेविं तोंडलें पिकलें तेवीं ओंठ खालचा लाल,
विरहें असती शुभ्र जाहले जीचे नाजुक गाल, २०४
विशाळ, चंचळ काळे डोळे जे कां विलासखाणी,
मनांत झुरती हरिणबाळकें बघुनि जयांचें पाणी, २०५

---

१. दुसरा म्हणजे तांबडा अशोक. त्यास फुलें येण्याचा असा तोडगा असे कीं स्त्रियांनीं त्याच्या खोडावर लात मारावी. या वरील तोडग्यांच्या समजुतीस अनुसरून संस्कृतांत पुष्कळ श्लोक आहेत.

२. कुबेराच्या घरीं नऊ निधि म्हणजे द्रव्याचे खजिने आहेत. त्यांपैकीं शंख आणि पद्म अशीं दोहोंचीं नांवें आहेत. त्यांचीं चित्रें यक्षाच्या दारावर काढलीं होतीं.

३. सूर्य.

४. विद्युत् म्हणजे वीज तीच मेघाची दृष्टि कल्पिली आहे.

कंबर बारिक असे, उरावरि कुच ही लकुचाकार,[1]
जेंवि शोभती कनकलतेला पुष्पगुच्छ सुकुमार, २०६
मत्त गजापरि मंद चालणें, उणें न कोठें कांहीं;
विधिच्या हातुनि दुसरें ऐसें रूप उतरलें नाहीं. २०७
घना, या खुणांवरूनि ओळखी अपुल्या, बा वहिनीला,
मुख्य साहवा प्राण चि आहे जी या मम शरिराला. २०८
भाषण जीचें परिमित, मंजुल, सरस आणि हितकारी,
मी नसल्यानें जवळ एकटी पडुनि झुरे जी भारी. २०९
वर्षाकाळीं मज आठवुनी क्षणोक्षणीं दुःखानें
वाळुनि गेली असेल जी बहु, नलिनी जेंवि हिमानें. २१०
रडुनि रडुनियां सुजले डोळे असतिल खचित तियेचे,
उष्ण श्वासें कोमल ओंठ हि सुकले असतिल सांचे. २११
गाल टेंकुनी हस्ततलावरि जी चिंतातुर बैसे,
अलक लोंबती मुखावरी तैं, कमलीं मधुकर जैसे; २१२
किंवा तूंची, घना, झाकिशी जेंवी शशिबिंबाला,
ती च साजते बरवी उपमा म्लान तिच्या वदनाला. २१३
पहाशिल तूं तिला कदाचित् देवांतें पुजितांना,
किंवा ध्याउनि माझी मूर्ती चित्रपटीं लिहितांना, २१४
असेल अथवा पिंजऱ्या पाशीं उभी पुसत मैनेला,
"कां गे, आठवतो तुजला तो प्राणसखा रंगेला." २१५
घेउनि हातीं सारंगी वा काळक्रमण कराया
स्वयें रचियलीं मजविषयींचीं लागे गीतें गाया, २१६
तैं डोळ्यांतुनि गळुनि अश्रुजळ जाई भिजूनि तार,
स्वयें घेतला मधें च विसरे अलाफ वारंवार; २१७

---

१. लिंबासारखा आहे आकार ज्यांचा.

किती लोटले विरहदिवस हें कळावया करितां जीं
ठेवियलेलीं फुलें प्रतिदिनीं पुनः पुनः ती मोजी; २१८
किंवा ध्यानीं मजला आणुनि माझा मानससंग
अनुभवुनी त्या परमानंदीं झाली असेल दंग; २१९
बहुत करूनी, घना, सुंदरी, काळ कंठितां यावा
म्हणुनि या परी करिती जवळी नसतां प्राणविसावा. २२०
गृहकृत्याच्या योगें लोटिल कशी तरी दिवसास,
परि रात्रीं मम विरह तयेला करिल बहुत आयास. २२१
यास्तव त्या साध्वीला सुख बहु निरोप परिसुनि व्हावें,
म्हणुनि तिला तो कळवाया तूं निशीथ[1]समयीं जावें. २२२
देखशील तूं तिला तेधवां भुईवरी निजलीला,
करीत तळमळ, गाळित अश्रु आठवुनी मम लीला. २२३
सन्निध असतां मीं पूर्वीं जी क्षणाप्रमाणें गेली
आनंदाच्या भरांत करुनी परोपरीच्या केली, २२४
युगाहुनी ही मोठी आतां ती च रात्र होईल;
कशी बापुडी दुःख असें हें नकळे मज साहील? २२५
गवाक्षमार्गें स्वच्छ चंद्रिका येतां पूर्ण शशीची
वळेल तिकडे दृष्टि सुखाच्या पूर्वानुभवें तीची; २२६
परि परतेल क्षणांत मागें पावुनियां संताप,
उचकावें जणुं जसें स्पर्शतां हारबुद्धीनें साप. २२७
अश्रुभरित मग नयन झांकितां दुःखें दिसेल तैशी,
[2]साभ्र दिनीं धड न मिटे, अथवा नुमले नलिनी जैशी. २२८

---

१. मध्यानरात्रीं.

२. अभळ आलेलें. दिनाचें विशेषण. दिवस असल्यामुळें कमलिनी किंचित् फुलते खरी, पण सूर्यप्रकाश स्वच्छ नसल्यानें तिचा पूर्ण विकास होत नाहीं.

माझी स्वप्नीं तरि भेट घडो धरुनि अशा आशेतें
असेल इच्छित उत्सुक होउनि पुनः पुनः निद्रेतें. २२९

विरहप्रथमदिनीं जी विणिली फुलां वांचुनी, साधी,
सोडायाची म्यां आनंदें शाप संपतां आधीं, २३०

घना, विरहिणीची ती वेणी मळली असेल फार,
रूक्ष हि झाली असेल नसतां तैलादिक उपचार. २३१

नाहीं न्हाण हि जेथें, तेथें भूषण गोष्ट कशास ?
सुखकर विषय हि विरस वाटती होतां चित्त उदास. २३२

ऐसें पाहुनि दुःख सतीचें वाहतील जलधारा
निश्चित तुझिया नयनांतुनि, बा, जलदा जगदाधारा,[1] २३३

तुझ्या सारखें हृदय जयांचें असतें आर्द्र तयांतें
नवनीतापरि पाझर सुटती देखुनि परतापातें. २३४

जाणतसें मी प्रेम सखीचें आहे मज वरि कैसें;
म्हणुनि तयेच्या विरहदशेचें केलें वर्णन ऐसें. २३५

स्त्रैणत्वास्तव उगिच बोलतो हा ऐसें न म्हणावें;
प्रकार वास्तव[2] दिसतो कैसा हें प्रत्यक्ष पहावें. २३६

आड येउनी दृष्टि रोधिती ज्याची कुरळे केश,
नसे लागला कितीक महिने जयास कज्जललेश, २३७

भ्रूकुटि विलासां विसरुनि गेलें जें कीं मदिरात्यागें
वाम नयन तें स्फुरेल तीचें त्वद्गमनाच्या योगें. २३८

घना, तेधवां दीन बापडी असेल जरि निद्रिस्थ,
प्रहर एक भर निमुट बसावें धीर धरुनियां स्वस्थ. २३९

---

१. हे जगाच्या आधारा. जगाचें उपजीवन पर्जन्यावर असल्यामुळें मेघास हें विशेषण दिलें आहे.

२. वास्तविक, खरा.

बहु दिवसांनीं स्वप्नीं माझी पडुनी अवचित गांठ
न घडो विघ्न, मला ती देतां आलिंगन घनदाट. २४०

काळ लोटल्या नंतर कांहीं करी तिला मग जागी,
जातीकुसुमांनीं[1] युक्त असे जलकण शिंपुनि आंगीं. २४१

खिडकिंत पाहुनि तुला चकित ती होतां विस्मयभावें
या परी मधुर स्वरें तिला तूं अश्वासुनि बोलावें. २४२

"पतिव्रते मी, तुझ्या पतीचा जिवलग मित्र असोनी
आलों आहें येथें त्याचा निरोप तुज घेवोनी. २४३

प्रवासिकांतें स्वगृहीं जाया त्वरा करुनियां नित्य
तज्जायांतें सुखित करावें आहे हें मम कृत्य." २४४

यापरि भाषण तुझें परिसुनी आनंदुनी ती फार
सीता जेवीं वायुसुताचा[2] करिल तुझा सत्कार. २४५

आयकेल ही तुझ्या मुखांतुनि कुशलमयी मम वार्ता,
निरोप पतिचा आणि गांठ हीं सम गणिती विरहार्ता[3]. २४६

सांगावें मग तिला "तुझा पति रामगिरीवर राहे.
खुशाल अससी कीं ऐसें तुज त्यानें पुसलें आहे. २४७

तुम्हा सारखे बहुत गांजले जन जे दुर्दैवानें,
त्यानीं कुशल प्रश्न चि करिजे परस्परां पहिल्यानें. २४८

वाळुन गेला असे फार तो, तूं ही कृश झालीस,
विरहज्वर भाजितो तयातें, तूं हि तशी जळतीस. २४९

जसें तयाच्या तसें तुझ्या ही न खळे जळ डोळ्यांचें,
तुम्हां उभयतां उत्कंठेचें दुःख हि समान सांचें. २५०

---

१. जाईच्या फुलांनीं.

२. हनुमंताचा.

३. वियोगानें पिडलेल्या स्त्रिया.

अशी सर्वथा समदुःखा तूं प्राणसखी, तुज, गे तो
दूरस्थ हिं मम सखा मनें ची दृढालिंगना देतो. २५१
सख्यांसमक्ष हि उघडपणें जें वचन कथाया जोगें
तें सांगाया चुंबनलोभें जो तव कानीं लागे. २५२
दुर्दैवें तो प्रियकर आजी फार दूर पडल्यानें
प्रेमभरित हें भाषण तुजला बोलत मद्वदनानें. २५३
'कोमल वेलीं मधें भासतें अंग तुझें सुकुमार;
तसा पिसाऱ्यामध्यें शिखींच्या दिसे तुझा कचभार;२५४
हरिणबालकां जवळ उमगती चंचल डोळे काळे;
मंद नदीच्या लहरीं माजी तव भृकुटींचे चाळे; २५५
लावण्य तसें तुझ्या मुखाचें अढळे पूर्ण शशांकीं;
मत्त मतंगीं मंद गती ही तूझी दिसते लोकीं. २५६
या परि, सखये, दृष्टीं पडतें कोठें कोठें कांहीं;
परंतु तुलना पूर्ण तुझी ज्या, ऐसें एक हि नाहीं. २५७
सखे, प्रीतिच्या कलहें जणु तूं मजवरि फार रुसोनी
बसलिस ऐसें चित्र शिळेवर रंगांनीं काढोनी, २५८
समजावाया ठेवुं लागतों जों पायांवर डोई,
अश्रुजळें तों नयन भरूनि दिसेंच नासें होई ! २५९
किती दुष्ट तरि दैव असावें न शकें वदावया हें !
या हि परीची, सखे, आपुली भेट जयास न साहे.२६०
स्वप्नीं पाहुनि तुजला, सखये, प्रेमें कवळायास
वट्ट उरीं मी लांबवितांना आकाशांत करांस २६१
देखुनि वनदेवता दयेनें द्रवती चित्तीं फार,
लतापल्लवीं अश्रु तयांचे गळती वारंवार. २६२

---

१. झाडांच्या पानांवर जमलेल्या दवावर वनदेवतांच्या अश्रूंचीं कल्पना केली आहे.

हिमाचलींच्या वनस्पतींचा घेउनि मधुर सुगंध
तेथुनि वायू दक्षिणेस जो वाहे निष्प्रतिबंध, २६३
तयास आलिंगितों, प्रिये, मी नित्य बहु प्रीतीनें
कीं तो तुजला स्पर्शुनि आला असेल या बुद्धीनें. २६४
लांब रात्र ही क्षणासारखी लहान होइल केवी ?
तीव्र उष्णता दिवसाची ही लयास जाइल तेवी ? २६५
ऐशी चिंता उगिच करूनी त्यांत नसे फळ कांहीं
जरी जाणतों असें, तथापी ती मज सोडित नाहीं. २६६
जरी होतसे तुझ्या वियोगें मजला दुःख अपार,
धीर धरितसें, पुढिल सुखाचा चित्तीं करुनि विचार. २६७
सखे शाहणी असती, यास्तव विवेक करुनी तूं ही
अपुल्या आश्वासशील हृदया नानाविध हेतूंहीं. २६८
सदा कोण, गे दुःखी अथवा कोण सुखी या लोकीं,
सुखदुःखें हीं चक्रन्यायें[1] येती हें अवलोकीं. २६९
कार्तिकमासीं शाप संपतो माझा तुज हें ठावें.
चार मास हे मिटूनि डोळे कैसे तरि कंठावे. २७०
नंतर, सखये, यथेच्छ पुरवूं मनिंचें सर्वेही कोडें[2]
करुनि विलासां, पूर्ववियोगें होतिल जे अतिगोड. २७१
मिठी एकदां गळां माझिया मारुनि तूं निजलीस,
मधें च अवचित मोठ्यानें तूं रडत, सखे, उठलीस २७२
पुनः पुनः मी कारण पुसतां हसुनि बोललिस गालीं,
ठका, पाहिलें स्वप्नीं मजला गुप्त सवत त्वां केली. २७३

---

१. चाकाचा प्रत्येक भाग जसा केव्हां केव्हां खालीं जातो व केव्हां केव्हां वर येतो तसें मनुष्यास कधीं कधीं चार दिवस दुःखाचे येतात व चार सुखाचे येतात.

२. हौस.

खुणेवरुनि या एकांतांतिल निश्चय तुज होईल;
खरा दूत हा माझ्या पतिचा, आहे तो हि खुशाल. २७४
विपरीत जनीं[1] वार्ता परिसुनि संशयांत न पडावें.
निश्वासातें मजवरिच्या ही किमपि हि न ढळूं द्यावें. २७५
कोणीं कोणीं म्हणती विरहें जातो स्नेह लयातें,
हरिणलोचने, परंतु न खरें वाटे मत मजला तें. २७६
प्रियवस्तूचा वियोग होतां न ढळे सत्य प्रीती.
उलटी वाढे अधिकाधिक ची ऐशी मम प्रचीती[2]." २७७
प्रथम वियोगें पीडित सखिला या परि आश्वासोनी
तिच्या पासुनी निरोप आणी खूण हि त्वा घेवोनी. २७८
परत झडकरी यावें तिकडुनि मजला सुखित कराया.
वाट तुझी मी पहात बसतों येथें ची घनराया. २७९
अंगिकारिलें तुवां कार्य कीं हें अपुल्या मित्राचें?
अथवा उत्तर नलगे देणें तुज ऐशा प्रश्नाचें. २८०
चातकांशि तूं उदक अर्पिशी कांहीं न बोलतां ही;
मित्र वांछिता करणें हें ची उत्तर न दुजें कांहीं. २८१
अनुचित तुज हें कृत्य कथाया आहे, मज हें ठावें.
परंतु हरला उपाय ज्याचा त्यानें काय करावें? २८२
मित्रत्वास्तव या दीनावर, करुणेस्तव वा आज
अंगिकारुनी तडीस न्यावें त्वां माझें हें काज. २८३
करावया मग विहार, जलदा, जावें अभिमत देशीं.
कधीं हि न घडो वियोग तुजला प्रियकर तुझ्या विजेशीं २८४

---

१. जनांतली.
२. अनुभव.

अन्योक्तिकलाप.

कोकिलान्योक्ति.

येथें समस्त बहिरे वसताति लोक.
कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक.
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक,
वर्णावरून तुजला गणतील काक. १

बैसोनी, सखया पिका, उगिच तूं मार्गप्रतीक्षा करी
जों आंब्रे फुलती, सुगंध सुटती, येई मधू जोंवरी;
तेव्हां सार्थकतेस येइल खरी ही गोड वाणी तुझी,
आतां ग्रीष्म असे, धुळी उडतसे, दे त्रास नेत्रास जी. २

---

१. अन्योक्ति हा एक अलंकार आहे. अन्य म्हणजे ज्यास किंवा ज्याविषयीं वास्तविक बोलावयाचें, त्यापेक्षां निराळा, आणि उक्ति म्हणजे भाषण; यावरून एकंदर अन्योक्तिशब्दाचा अर्थ असा होतो कीं, ज्याविषयीं किंवा ज्यास बोलावयाचें त्यापेक्षां निराळ्याविषयीं किंवा निराळ्यास बोलणें. जसें पुढील श्लोकांत बाहेरून कोकिलाशीं संभाषण केलें आहे. परंतु कवीच्या मनांतून तो अर्थ गुणी मनुष्याचे गुण न ओळखणारे व गुणी व मूर्ख यांस बाहेरील चिन्हांवरून सारखे समजणारे जे अरसिक मूर्ख लोक त्यांस लागू आहे. या अलंकारांत अप्रकृत अर्थाच्या मिषानें प्रकृत मनुष्याची वगैरे मोठ्या खुबीनें निंदा अथवा स्तुति करतां येते. या अन्योक्तीच्या पद्यांत साधारण अर्थाकडे तात्पर्य असल्यामुळें तीं प्रसंगोचित भाषणांतही फार उपयोगीं पडतात. या पद्यांतील तात्पर्यार्थ सुज्ञ वाचणारांस यत्किंचित् विचारानें कळण्यासारखा असल्यामुळें तो प्रत्येक ठिकाणीं उघड करून लिहिला नाहीं. सुभाषित शार्ङ्गधर म्हणून एक संस्कृत ग्रंथ आहे. त्यांत कालिदास, भवभूति, विल्हण, श्रीहर्ष, वगैरे अनेक कवींचे सुंदर व रसिक श्लोक एकत्र जमवले आहेत, त्या ग्रंथाच्या आधारानें हीं अन्योक्तिघटित पद्यें प्राय: रचिलीं आहेत. या पद्यांत वसंततिलका, शार्दूलविक्रीडित, पृथ्वी, शिखरिणी, स्रग्धरा इत्यादि अनेक गणवृत्तें आहेत व क्वचित् आर्या, साक्या, दिंड्या इत्यादि मात्रावृत्तेंही घातलीं आहेत.

२. वसंतर्तूत आंब्यास मोहर आला असतां त्या समयीं कोकिलांस सुस्वर शब्द फुटतो ही कविप्रसिद्धि सुज्ञ वाचणारांस विदित असेलच. त्या प्रसिद्धीकडे कोकिलान्योक्तीच्या पद्यांत लक्ष्य आहे.

ज्याचे शब्द सुधेसमान पडतां कानीं, मुनी ही मनीं
ध्याऊं लागति योषिदा[1]स्यकमलें बैसोनि योगासनीं
स्पर्धेतें करितां न लाजशि कसा, काका, तया कोकिला.
सांगें रे, अथवा स्वभाव अपुला नीचें कधीं टाकिला.? ३
ज्याचे पूर्वीं वसंतीं परिमलें[2]वहलीं आम्रवृक्षीं सुखाचे
गेले गुंजारवातें दिवस परिसतां मत्त भृंगांगनांचे,
कैसे त्या कोकिलातें अधम करिति हे कावळे चंचुघाता,
कोठें थारा मिळेना, गरिब पळतसे वांकडा काळ येतां. !४
काका, मौन धरूनि बैसशि जरी या आम्रवृक्षावरी,
तूंतें कोकिल मानतील जन हे सारे स्वचित्तीं तरी,
होती स्थानें[3]गुणें चि थोर बहुधा वस्तू; नृपाच्या शिरीं
पंका कोण न मानिती मनिं असे कीं कस्तुरी ही खरी? ५
या माळावरि वृक्ष एक हि नसे, बाळा खुळ्या कोकिला,
येथें मंजुळ शब्द काढुनि गळा कां शोषिशी आपुला?
जेथें बोल अमोल वाटति तुझे, तो देश, वा, वेगळा;
तेथें आम्र फुलोनि गंध विखरे चोहींकडे आगळा. ६
वसंत समयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो,
जयास अवलोकुनी सुरतरू हि चित्तीं थिजो,
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती;
परी पिक चि एकला मधुर वाणि लाधे कृती. ७

---

१. योषिदास्यें म्हणजे तरुण स्त्रियांचीं मुखें तींच कोणी कमळें. कोकिलस्वर कामवासनेस उत्तेजन करणारा आहे अशी कविप्रसिद्धि आहे. योगासनारूढ मुनिही समाधि विसरून स्त्रियांचें ध्यान करूं लागतात, यावरून कोकिल स्वराचें अतिशय मोहकत्व व माधुर्य सिद्ध होतें.

२. सुगंधानें पूर्ण. हें आम्रवृक्षाचें विशेषण.

३. स्थानाच्या गुणानें म्हणजे संबंधानेंच कितीएक वस्तू थोर होतात. जसें राजाच्या कपाळीं चिखल लागला असला तरी त्यास लोक कस्तुरी समजतील असें स्थानमाहात्म्य आहे.

अन्योक्तिकलाप.[1]

कोकिलान्योक्ति.

येथें समस्त बहिरे वसताति लोक.
कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक.
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक,
वर्णावरून तुजला गणतील काक. १

बैसोनी, सखया पिका, उगिच तूं मार्गप्रतीक्षा करी
जों आंबे[2] फुलती, सुगंध सुटती, येई मधू जोंवरी;
तेव्हां सार्थकतेस येइल खरी ही गोड वाणी तुझी,
आतां ग्रीष्म असे, धुळी उडतसे, दे त्रास नेत्रास जी. २

---

१. अन्योक्ति हा एक अलंकार आहे. अन्य म्हणजे ज्यास किंवा ज्याविषयीं वास्तविक बोलावयाचें, त्यापेक्षां निराळा, आणि उक्ति म्हणजे भाषण; यावरून एकंदर अन्योक्तिशब्दाचा अर्थ असा होतो कीं, ज्याविषयीं किंवा ज्यास बोलावयाचें त्यापेक्षां निराळ्याविषयीं किंवा निराळ्यास बोलणें. जसें पुढील श्लोकांत वाहेरून कोकिलाशीं संभाषण केलें आहे. परंतु कवीच्या मनांतून तो अर्थ गुणी मनुष्याचे गुण न ओळखणारे व गुणी व मूर्ख यांस बाहेरील चिन्हांवरून सारखे समजणारे जे अरसिक मूर्ख लोक त्यांस लागू आहे. या अलंकारांत अप्रकृत अर्थाच्या मिषानें प्रकृत मनुष्याची वगैरे मोठ्या खुबीनें निंदा अथवा स्तुति करतां येते. या अन्योक्तीच्या पद्यांत साधारण अर्थाकडे तात्पर्य असल्यामुळें तीं प्रसंगोचित भाषणांतही फार उपयोगीं पडतात. या पद्यांतील तात्पर्यार्थ सुज्ञ वाचणारांस यत्किंचित् विचारानें कळण्यासारखा असल्यामुळें तो प्रत्येक ठिकाणीं उघड करून लिहिला नाहीं. सुभाषित शार्ङ्गधर म्हणून एक संस्कृत ग्रंथ आहे. त्यांत कालिदास, भवभूति, विल्हण, श्रीहर्ष, वगैरे अनेक कवींचे सुंदर व रसिक श्लोक एकत्र जमवले आहेत, त्या ग्रंथाच्या आधारानें हीं अन्योक्तिघटित पद्यें प्रायः रचिलीं आहेत. या पद्यांत वसंततिलका, शार्दूलविक्रीडित, पृथ्वी, शिखरिणी, स्रग्धरा इत्यादि अनेक गणवृत्तें आहेत व क्वचित् आर्या, साक्या, दिंड्या इत्यादि मात्रावृत्तेंही घातलीं आहेत.

२. वसंतर्तूंत आंब्यास मोहर आला असतां त्या समयीं कोकिलांस सुस्वर शब्द फुटतो ही कविप्रसिद्धि सुज्ञ वाचणारांस विदित असेलच. त्या प्रसिद्धीकडे कोकिलान्योक्तीच्या पद्यांत लक्ष्य आहे.

ज्याचे शब्द सुधेसमान पडतां कानीं, मुनी ही मनीं
ध्याऊं लागति योषिदास्यकमळें[1] बैसोनि योगासनीं
स्पर्धेतें करितां न लाजशि कसा, काका, तया कोकिला.
सांगें रे, अथवा स्वभाव अपुला नीचें कधीं टाकिला.? ३
ज्याचे पूर्वी वसंतीं परिमलेंबहलीं[2] आम्रवृक्षीं सुखाचे
गेले गुंजारवातें दिवस परिसतां मत्त भृंगांगनांचे,
कैसे त्या कोकिलातें अधम करिति हे कावळे चंचुघाता,
कोठें थारा मिळेना, गरिब पळतसे वांकडा काळ येतां. !४
काका, मौन धरूनि बैसशि जरी या आम्रवृक्षावरी,
तूंतें कोकिल मानतील जन हे सारे स्वचित्तीं तरी,
होती स्थानगुणें[3] चि थोर बहुधा वस्तू; नृपाच्या शिरीं
पंका कोण न मानिती मनिं असे कीं कस्तुरी ही खरी? ५
या माळावरि वृक्ष एक हि नसे, बाळा खुळ्या कोकिला,
येथें मंजुळ शब्द काढुनि गळा कां शोषिशी आपुला?
जेथें बोल अमोल वाटति तुझे, तो देश, बा, वेगळा;
तेथें आम्र फुलोनि गंध विखरे चोहींकडे आगळा. ६
वसंत समयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो,
जयास अवलोकुनी सुरतरू हि चित्तीं थिजो,
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती;
परी पिक चि एकला मधुर वाणि लाधे कृती. ७

---

१. योषिदास्यें म्हणजे तरुण स्त्रियांचीं मुखें तींच कोणी कमळें. कोकिलस्वर कामवासनेस उत्तेजन करणारा आहे अशी कविप्रसिद्धि आहे. योगासनारूढ मुनिही समाधि विसरून स्त्रियांचें ध्यान करूं लागतात, यावरून कोकिल स्वराचें अतिशय मोहकत्व व माधुर्य सिद्ध होतें.

२. सुगंधानें पूर्ण. हें आम्रवृक्षाचें विशेषण.

३. स्थानाच्या गुणानें म्हणजे संबंधानेंच कितीएक वस्तू थोर होतात. जसें राजाच्या कपाळीं चिखल लागला असला तरी त्यास लोक कस्तुरी समजतील असें स्थानमाहात्म्य आहे.

पढोत शुक सारिका, शिखि वदोत केकाध्वनी,
करोत कलहंस ही बहुत गायनातें वनीं;
रसाल तरुच्या शिरीं कुसुमितीं वसोनी करी
न कोकिल सुधासम[1] स्वन वनांतरीं जोंवरी[2]. ८
कां, बा, सुस्वर शब्द काढिशि? पिका, राहे उगा; काळ हा
लोटे तों तरुकोटरीं लपुनियां कोठें तरीही रहा.
पानें तीव्र हिमें गळोनि दिसती झाडें जळाल्यापरी,
गर्जे कर्कश शब्द थोर करुनी काकावली[3] त्यांवरी. ९

आर्या.

शब्द तुझा मधुर परी वाटे हृदयीं वसे कपट फार
वाढविती[4] जे तुज त्यां सोडिशि होतां च कोकिळा थोर १०
वायसकुळांत वाढे परि कोकिल मधुर शब्द नित्य वदे.
दुर्जनसंगतिनें ही जात्या सज्जन परास दुःख न दे. ११

चातकान्योक्ति.

झाडें पालवती, लता उगवती वेलां फुलें शोभती,
मेघें वृष्टि करूनि तुष्टि दिधली सृष्टीस पुष्टी हि ती.

---

१. अमृतासारखा गोड. हें स्वनाचें विशेषण.

२. कोकिल आपला मधुर शब्द काढीत नाहीं तोंपर्यंत शुकादिक शब्द करोत. परंतु कोकिल शब्द करूं लागला असतां त्यापुढें त्यांचें वजन पडावयाचें नाहीं असा भावार्थ.

३. कावळ्यांची पंक्ति किंवा समुदाय.

४. कोकिळ कावळ्याच्या कोठ्यांत अंडीं घालतात व कावळे तीं अंडीं आपलीं समजून वाढवितात व तीं पिलीं मोठीं झाल्यावर निघून जातात व याच गोष्टीवरून कोकिलास संस्कृतांत परभृत (दुसऱ्यानें पोसलेला) असें नांव पडलें आहे.

रे रे चातक[1], काय पातक तुवां केलें न आम्हां कळे.
वारी वर्षुनि भारि एक कण ही त्याचा न तूतें मिळे. १२

आर्या.

धूर असे, मेघ न हा कां धांवशि, चातका, दिनावाणी
याच्या मागें? आणिल हा नेत्रां मात्र, बा, तुझ्या पाणी! १३

श्लोक.

नको धावुं, बा चातका, मेघ नाहीं,
धुराचा असे लोट हा नीट पाही,
न या सेवितां तूज पाणी मिळेल,
तुझ्या मात्र डोळ्यांतुनी तें गळेल. १४

ते अन्य मेघ, तव जे हरिती तृषेतें,
कां व्यर्थ आरडुनि शोषविशी जिभेतें?
हे, चातका, घन रिते शिशिरांत येती,
जे गर्जती, परि न वारिकणा हि देती. १५

नवीं पद्में जेथें विकसुनि सुगंधा विखरती,
तळीं ऐशीं तोयें सतत भरलीं फार असती,
तरी पर्जन्याचे जलकणचि कां चातक पितो?
गमे मातें मानी शिर नमविण्या लाज धरितो. १६

तान्हेनें बहु पीडला करितसे हा चातक प्रार्थना
वारंवार तुझी, असूनि जल ही कां बोलशी व्यर्थ नो[2]?

---

१. चातक नामक पक्षी आहेत. ते पाऊस पडूं लागला असतां आ करून बसतात व जे थेंब तोंडांत पडतील तें कायतें पाणी त्यांस मिळतें. दुसरें पाणी ते पीत नाहींत. ही जी जुनी दंतकथा आहे तीस अनुसरून चातकान्योक्तींतील कितीएक पद्में लावलीं पाहिजेत.

२. उगीच ना कां म्हणतोस?

मेघा, आण विचार हा मनिं, जरी उद्दाम वारा सुटे,
कोठें चातक वापडा ? जल हि हें कोठें? अणी मी कुठें?१७

मयूरान्योक्ति.

पक्षी या मलयावरी विहरतां लक्षावधी दीसती,
केकी एक च धन्य त्यांत इतर, क्षुद्रांपरी भासती,
जो शब्दें अपुल्या क्षणांत पळवी सर्पा[1] सदर्पा[2] महां,
जेणें चंदन सौख्यकारक जना होती; खरा थोर हा. १८

झाडें पेटुनि वाजती कडकडां, त्यांचा ध्वनी होतसे,
ज्वाला राहुनि राहुनी उठति या, विद्युल्लता ही नसे,
काळा धूर नभीं वहु पसरला, हा मेघ नोहे खरा,
[3]वर्षाकाळ न हा, दवानल असे, मोरा, पळे, रे, घरा.१९

रत्नांचा जणु ताटवा झळकतो, मोरा, पिसारा तुझा,
हर्षें नाचशि तैं गमे त्रिभुवनीं पक्षी न ऐसा दुजा,
मोठा सुंदर तूं खरा परि दया नाहीं च भिल्लांस यां,
हे घेतील तुझ्या जिवा, झडकरी सोडी अरण्यास या.२०

मयूरा तुला भूषवी हा पिसारा,
तुझा [4]यामुळें जाण लौकीक सारा,

---

१. चंदनाच्या वृक्षांस सर्प वेटाळून बसतात अशी प्रसिद्धि आहे व मोर सर्पांस मारतात अशी प्रसिद्धि आहे त्यांकडे या स्थलीं लक्ष्य आहे.

२. 'सदर्पा' व 'महां' हीं सर्पाचीं विशेषणें.

३. वर्षाकाळांत म्हणजे पावसाळ्यांत मोर हर्ष पावून नाचतात अशी प्रसिद्धि आहे. या पद्यांत वर्षाकाळ व वणवा यांचें सादृश्य वर्णून व त्या सादृश्यामुळें मोरास दुसऱ्यावर पहिल्याची भ्रांति होऊन तो हर्ष पावतो असें कल्पून कवि त्यास सावध करतो. शत्रूच्या कपटचिन्हांस भुलून त्यांवरून त्यास मित्र समजणाऱ्या अज्ञान व गाफिल मनुष्यास चातुर्यानें पुढील धोक्याचा इशारा देण्याचा अर्थ या अन्योक्तींत गर्भित होतो.

४. या पिसाऱ्यामुळें.

तया सांडतां हानि तूझी घडेल,
नृपाच्या किरीटांवरी तो चढेल[1]. २१

शुकान्योक्ति.

तुझी वाणी कोणी म्हणति गुण हा अद्भुत असे,
मला वाटे मोठा तुज जवळ हा दोष च वसे,
शुका, तीच्या योगें सतत पिंजऱ्यामाजि पडशी,
गड्या, स्वातंत्र्याच्या अनुपम सुखां सर्व मुकशी. २२

फळें मधुर खावया असति, नित्य मेवे तसे,
हिरेजडित सुंदरीं कनकपंजरीं ही वसे,
अहर्निश तथापि तो शुक मनांत दुःखें झुरे,
[2]स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखातें स्मरे. २३

बळकट पिंजरा ही तूज नाहीं वसाया,
फिरति बहुत बोके द्वाड भारी घरीं या,
परिसुनि तव वाणी पांमरां सौख्य नाहीं,
म्हणुनि दिवस कांहीं मौन सेवून राही. २४

बसुनि उपवनीं या जोंवरी कावळा हा
करित कटकटीनें लोककर्णांस दाहा,
बस निमुट, शुका तूं तोंवरी स्वस्थ कोठें;
कमिपण गुणवंता काय मौनांत मोठें[3] ? २५

देखोनी नारळीचा तरु शुक भुलला ऐक[4] त्याच्या फळाला,
साळीचें शेत मोठें झडकरि पिकलें सोडुनि तो निघाला,

---

१. राजाच्या मस्तकावर मोरचलें वारतात.

२. स्वतंत्रपणें रानांत फिरण्याच्या.

३. कमीपणाचें विशेषण.

४. शुकाचें विशेषण.

त्यानें त्या नारळांतें फिरुनि फिरुनियां फोडण्या यत्न केला,
आशेचाची न [1]तेणें परि बळकट ही चंचु[2]चा भंग झाला.२६

वकान्योक्ति.

उभा राहे एके चरणिं धरणीतें धरुनियां,
तपश्चर्या वाटे करित जणु डोळे मिटुनियां.
वका, ऐशा [3]ढोंगें तव अमति मासे च ठकती,
परि [4]ज्ञाते तूझें कपट लवलाहीं उमजती. २७

खद्योतान्योक्ति.

गेला लो[5]कांतरातें दिनकर सकला द्योतवी जो जगातें,
अस्तातें जाय तो ही हिमकिरण, जया सौख्यदा विश्व गातें,
मेघांनीं व्याप्त ऐशा गगनिं न च दिसे एक तारा हि कोठें,
रे खद्योता, अतां तूं चमक बहु, तुझें दैव, बा, फार मोठें. २८

सिंहान्योक्ति.

आर्या.

मी रोड, एकटा मी, आणी मज पाठबळ नसे कांहीं,
ही शंका स्वप्नीं ही, सिंहा, तुझिया मनीं वसत नाहीं. २९

---

१. त्या यत्नानें.

२. आशेचाच केवळ भंग झाला म्हणजे निराशा झाली असें नाहीं; तर चोंचीचा देखील भंग झाला म्हणजे ती मोडली. निश्चित अर्धा टाकून संशयित सगळीच्या मागें लागूं नये. असा अर्थ या अन्योक्तींत व्यंग्य आहे.

३. तृतीयेचें एक वचन.

४. मासे या अध्याहृत नामाचें विशेषण.

५. लोकांतरास गेला यांत दोन अर्थ आहेत; एक दुसऱ्या भुवनांत गेला, व दुसरा अर्थ मेला असा होतो; व दोनही अर्थ या ठिकाणीं विवक्षित आहेत. तसेंच दुसऱ्या चरणांतील "अस्तातें जाय" या शब्दांतही दोन अर्थ आहेत.

सांप्रत पुनःपुनः कां हे हत्ती मत्त गर्जती फार,
गेला सिंह वनांतरिं, वाटे, ज्याचा पराक्रम अपार. ३०

श्लोक.

खाण्यावांचुनि रोडला जरि, जरायोगें बहू वाळला,
रोगानें अतिपीडिला, जरि मरायातें हि कीं टेंकला,
[1]उन्मत्तद्विपगंडभेदन करायाची च इच्छा करी,
[2]मानी क्षुद्र जनावरांपरि तृणा स्पर्शे च ना केसरी. ३१

मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरतीं सिंह पाही स्वभावें,
काका, त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरी मांसखंडास खावें,
जो उन्मत्तां गजांच्या खरतरनखरीं फोडुनी मस्तकांतें
धाला रक्ता पिऊनी, न च मृत पशुंच्या इच्छितो तो कणांतें. ३२

भुंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्ती हि जीतें,
डोळां देखोनि होते पळत भयभरें सोडुनीयां धृतीतें,
जेथें मुक्ताफळांचा खच बहु पडला, त्या गुहेमाजि आतां
सिंहाच्या क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां. ३३

कृतीचीं आयाळें जडवुनि गळा पुष्ट करुनी,
वसे [3]श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी,
तरी जो ऐकोनी भिउनि पळती मत्त हि करी;
कसा त्या नादातें क्षणभरि हि तो पामर करी? ३४

---

१. मांजलेल्या हत्तीचीं गंडस्थलें फोडण्याची.
२. केसरीचें विशेषण.
३. कुत्रा.

गजान्योक्ति.

पूर्वी बालपणीं वनीं मुनिजनीं प्रेमें जया पोशिलें
देवोनी तृणधान्यमुष्टि जल ही पाजूनि कुंभांतलें,
झाला तो गज थोर आजि फिरती[1] भुंगे तया भोंवतीं,
त्यातें पाहुनि ते मुनी[2] डेचकती; संतोष ही पावती. ३५

कर्णी लोंबति चामरें, चमकती माळा गळां साजिऱ्या,
वेली रंगविल्या[3] हि शोभति शिरीं सोंडेवरी गोजिऱ्या,
ऐसा तो नटला तरी नृपकरी पायीं विडी वागवी,
कैशी त्यास मिळे स्वतंत्र वनिंच्या हत्तीपुढें थोरवी. ३६

दानपान[4] इच्छुनी जरि द्विरेफ पातले
कर्णताडनें गजें हकून त्यांस लावलें,
त्याचिया च मस्तकास हानि भूषणाचिही.
भृंग पंकजांवरी निघून जाति सर्व ही. ३७

न ताप निवला, तृषा न शमली, रजें माखलें
शरीर, अजुनी नसे कमल एक ही चाखलें,
न सोंड उचलूनियां कमलिनी गजें स्पर्शिली,
हकांक मधुपीं, पहा, अधिंच काय आरंभिली. ३८

---

१. मांजलेल्या हत्तीच्या गंडस्थलांतून मद वाहूं लागून त्याच्या वासानें त्यावर भुंगे घोंगावत असतात हें प्रसिद्धच आहे. यावरून भुंगे फिरणें हें तारुण्याचें सूचक होय.

२. त्याचा मोठा प्रचंड आकार पाहून स्वभावतः भितात व आपण त्यास लहानाचा मोठा केला व तो चांगल्या दशेस आला हें पाहून संतोषही पावतात.

३. हत्तीच्या गंडस्थळावर व सोंडेवर रंगाच्या वेलबुटी काढण्याची चाल प्रसिद्धच आहे.

४. मदोदक प्यावयास इच्छून.

ज्याची स्पर्धा कराया इतर गज कधीं शक्त नाहीं च झाले,
सांगावें काय? ज्याच्या मृगपति हि भयें रान सोडून गेले,
तो पंकामाजिं आजी गजवर फसला, युक्ति नाहीं निघाया.
आव्हेरीती, पहा, हे कलकल करुनी क्षुद्र कोल्हे तयाला. ३९

माझी शक्ति अपूर्व, बाग अवघा म्यां मोडुनी टाकला,
ऐसें मानुनि हर्ष फार तुजला चित्तीं खरा वाटला,
ग्रीष्मीं तीव्र रवी तपोनि करितां आंगीं तुझ्या काहली,
ती पीडा टळण्यास कोणति? तुवां युक्ती, गजा, योजिली? ४०

कंठीं मोठा वळकट असे पाश, पायांत बेडी,
बैसोनीयां शिरिं नर तुझ्या अंकुशें गंड फोडी,
जीपेक्षां कीं मरण बरवें भासतें, त्या दशेतें;
पावोनीयां अजुनि हि, गजा, दाविशी कां मदातें? ४१

साक्या.

जेथें शीतळ मधुर स्वच्छ प्राशियलें त्वां वारी,
सरस कमलिनीकांडें जेथें भक्षियलीं हीं भारी, ४२

ग्रीष्मीं मध्यान्हीं सूर्याच्या तीव्रांहीं किरणांहीं,
झाला ताप तुझा कीं शमला ज्यामध्यें स्नानांहीं, ४३

त्या च ढवळुनी सरोवराचें नाशिशि पाणी सारें!
तटें पाडशी जणु तव आंगीं भरलें पिशाचवारें! ४४

कृतघ्नतेचें नीच असें हें करिशी कैसें काज?
नाहिं वसत कीं चित्तीं तुझिया, हे गजराजा, लाज? ४५

हरिणान्योक्ति.

दिंड्या.

मत्त असती जे धनाच्या मदानें.
न दावीशी त्यां तोंड दीनवाणें,
आर्जवाचीं भाषणें मधुर खोटीं
करुनि तोषविशी न त्यां कधीं पोटीं, ४६

गर्ववचनें ही परिसशी न त्यांचीं,
धरुनि आशा त्यांचिया प्रसादाची,
घरा त्यांचीया करुनि वेरझारा
न घालविशी तूं स्वीय काळ सारा. ४७

भूक लागलिया कोमला तृणातें
भक्षुनीयां तूं पावसी सुखातें,
स्वस्थ निद्रेशी घेशि झोंप येतां,
चित्तिं नाहीं तव काडिमात्र चिंता. ४८

अशी सौख्याची स्थिति प्राप्त व्हाया
योजियेलें त्वां कोणत्या उपायां?
काय कोठें त्वां तपश्चरण केलें?
मृगा, योगें[1] ज्या भाग्य हें उदेलें. ४९

नवें कोमल उगवलें गवत दाट,
स्वच्छ सुंदर वाहतो त्यांत पाट,
मृगी ठायीं त्या एक देखियेली,
जिच्या आंगीं तारुण्य करितें[2] केली. ५०

---

१. ज्या योगें म्हणजे ज्या तपश्चरणाच्या योगानें.

२. तारुण्य जिच्या आंगांत खेळत आहे म्हणजे रसरसत आहे.

अशा पाहुनियां उत्तम स्थलांतें,
भूल पडली तैं मृगाच्या मनांतें,
व्याध चापीं योजुनी बाण राहे,
आड जाळीच्या न तो[1] त्यास पाहे. ५१

वनीं हिंडोनी शीण फार झाला,
घाम आंगाला तुझ्या दाट आला,
बैस येऊनि स्वस्थ आश्रमांत,
करी रोमंथा, नीज, वा, निवांत. ५२

दुष्ट भिल्लांचा इथें वास नाहीं,
मुनी वसले हे शांत, यांस पाहीं,
भूतमात्रीं हे दयेतें करीती,
मृगा, मनिंची, वा, सोड सर्व भीती. ५३

श्लोक.

जाळें तोडुनियां बळें हरिण तो टाळोनि दावाग्निला,
व्याधाचे चुकवूनि बाण हि महा वेगें पुढें चालिला.
तों वाईंत उडी फसूनि पडला आडामध्यें बापडा;
होती सर्वहि यत्न निष्फळ, जरी होई विधी वांकडा. ५४

वृक्षान्योक्ति.

श्लोक.

मार्गीं वाढुनि सांवली पसरिशी विस्तीर्ण कां तूं अशी !
कां होशी फलयुक्त ? होउनि तसा[2] कां वांकशी भूमिशी ?

१. तो मृग त्यास म्हणजे व्याधास.

२. तसा म्हणजे फलयुक्त.

तेणें ओढिति, तोडिती, जन तुला पाषाणही मारिती,
वृक्षा, सोस निमूट हाल अवघे, आतां न अन्या[1] गती. ५५

आर्या.

दाटी वाटसरांची, तीव्र उन्हाळा असा असे फार,
मार्गी एक च तरु हा कितिकांचा ताप तो करिल दूर? ५६

श्लोक.

दावाग्नी खवळोनियां तरुवरा जाळावया जैं बळे,
जाती सर्व पळोनि कोकिल, शिखी, रावे, तसे कावळे,
भक्षायास फळें चहोंकडुनियां एकत्र [2]जे जाहले;
येतां संकट काळ होय जवळीं ऐसा न कोणीं मिळे.५७

जे भक्षूनि फळें सदैव पिकलीं स्वादिष्ट आनंदले,
कोटीं बांधुनि त्यांत जे तुजवरी वर्षें बहु नांदले,
ते पक्षी करुण स्वरें विलपती, वृक्षा, तटीं बैसुनी,
पाडाया तुज थोर जोर करितां पूरास या देखुनी. ५८

तापानें पीडिले, त्यां निववशि; करिशी तृप्त त्यां जे भुकेले;
अर्थी देऊनियां त्वां अभिमत मनिंचें फार संतुष्ट केले;
ऐशी कीर्ती तुझी ही परिसुनि दुरुनी पातलों आश्रयातें,
कांटे झाडें अम्हा हीं अडवुनि धरिती कां? तैरो वार यांतें.५९

---

१. आतां दुसरा मार्ग नाहीं.
२. कोकिलादिक.
३. तरु शब्दाचें संबोधन.

आर्या.

वारा, वणवा, थंडी, वीज, अशीं तुज भयें बहुत असती;
वृक्षा, करि उपकारा; चंचल ही मृत्युलोकची वसती. ६०

चंदनान्योक्ति.

दृष्टीतें तुष्ट कांहीं करिति, परिमलें तोषवीती हि कांहीं,
देती छायेस कांहीं, सुखविति हि किती उत्तमांहीं फलांहीं,
ऐसे कोट्यावधी ही असति तरु, तरी ज्याचिया संगतीनें
होतीं झाडें सुगंधी, मम मति[1] वरि त्या चंदना आवडीनें. ६१

आहे एक सुगंध मात्र जवळी, तों त्यास राखावया
ऐसे घोर भुजंग पाळिशि, जना जे धांवती खावया,
येतीं[2] गोड फळें फुलें हि वरवीं दैवें तुला, चंदना,
त्यांच्या, बा, करितास काय न कळे संरक्षणा योजना! ६२

वनीं विलसती बहू विविध वृक्ष चोहींकडे,
तयांत मज चंदना सम न एक ही सांपडे;
जयास न दिलीं फळें न कुसुमें हि दैवें जरी,
शरीर झिजवूनि जो तरि परोपकारा करी. ६३

केतकीविषयीं अन्योक्ति.

दलां सर्वां कांटे असति मधुचा लेश हि नसे,
उडोनी नेत्रांतें रज बहुत पीडा करितसे,

१. माझी बुद्धि चंदनास वरते, म्हणजे मला चंदन सर्वांत आवडतो.
२. जर येत असतीं.

तुझ्या पुष्पीं ऐसे अवगुण असोनी भ्रमर हा
कसा एकया गंधें भुलुनि पडला केतकि पहा! ६४

आंब्याविषयीं अन्योक्ति.

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी,
गंधें युक्त फुलें, फळें हि असती ज्याचीं सुधेच्या परी,
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचे[1] मुखींचें, भला
आम्रा त्या पिक सेवितां[2] समसमां संयोग कीं जाहला! ६५

पावोनी तव आश्रया द्विजकुलें[3] लक्षावधीं पोसती,
सारे ही वनिंचे तरू तुज पुढें क्षुद्रा परी भासती,
ऐसा तूं गुणवंत, बा, असुनियां, आम्रा, पिकावायसा—
मध्यें जाणसि तारतम्य न मनीं; हा मोह, बा, कायसा? ६६

झाडें वनीं फुलति पालवती अनेक,
सर्वांत धन्य सहकार चि जाण एक.
ज्याचीं फुलें करुनि बाण[4], समर्थ झाला
जिंकावया रतिपती भुवनत्रयाला. ६७

छाया, फुलें, बघुनि आणि फळें जयाचीं,
चित्तें उचंबळति हर्षभरें जनांचीं,

---

१. वनशोभा हीच कोणी एक स्त्री तिच्या तोंडाला जो भूषण होय.

२. सारख्यासारख्यांची भेट झाली.

३. या शब्दांत श्लेष आहे. याचे दोन अर्थ होतात; ब्राह्मणांचीं कुळें म्हणजे कुटुंबें हा एक अर्थ व द्विजकुळें म्हणजे पक्ष्यांचे समुदाय, हा दुसरा अर्थ.

४. आंब्याच्या फुलांस म्हणजे मोहरास मदनाचे बाण म्हणण्याची कवींत प्रसिद्धि आहे. यांतील भावार्थ हाच कीं, वसंतकाळीं आंबे फुलले असतां त्यांच्या सुवासानें विषयी मनुष्याचे मनांत कामाविर्भाव होतो.

[stamp]

ज्वालाजिभेस[1] पसरुनि गिळावयाला,
दावानळा, वधशि त्या वरपादपाला[2] !

छाया शीतल, गोड पुष्कळ फळें देऊनि संतोषवी
जो पांथा, म्हणुनी मिळे जवळि ज्या दाटी जनांची नवी,
आम्रा काढुनि त्या कसा बसविला त्याचे ठिकाणीं अहा !
दैवें सोडुनियां दया अवडता[3] काकां कडू निंब हा ! ६९

वटान्योक्ति.

शाखा दूरवरी, वटा, पसरुनी दिग्मंडळा व्यापिशी,
पक्षी आश्रय देउनी जवळ तूं लक्षावधी पाळिशी,
गेलें मस्तक मेघ भेदुनि तुझें, दृष्टी न पोंचे वरी,
तूतें शंभर थोर सांवरिति हे बुंधे हि खांबा परी; ७०

ऐसा थोर खरा नसे च दुसरा त्वत्तुल्य साऱ्या वनीं,
वार्ता आयकिली तुला कथितसें, कोपा न आणी मनीं,
कोणीं क्षुद्र लता मळ्यांत असते, तुंबी जितें बोलती,
येती थोर फळें जिला, बहुत ती गर्वें तुला हासती[4]. ७१

बाभळीविषयीं अन्योक्ति.

काट्यांनीं भरलें शरीर अवघें, छाया नसे दाट ही,
नाहीं वास फुलांस, भूक न निवे ज्याच्या फळें अल्प ही,

---

१. ज्वाला हीच कोणी जीभ ती पसरून म्हणजे बाहेर काढून.

२. श्रेष्ठ वृक्ष, आंबा.

३. कावळ्यांस आवडणारा, हें कडू निंबाचें विशेषण.

४. वड मोठा असून त्यास फारच लहान फळें येतात, म्हणून भोंपळ्याची वेल त्याला हसते.

नाहीं एक हि पांथ येत जवळी तूझ्या, असो गोष्ट ही
अन्यांचीं न फळें मिळोत म्हणुनी होशी तयांतें वेही[1]. ७२

निवडुंगाविषयीं अन्योक्ति.

साक्या.

भुजंग वेष्टिति चंदनतरुतें, कंटक[2] केतकिला ही,
सुगंध आंगीं आहे म्हणुनी भीति तयांतें[3] कांहीं. ७३
रे निवडुंगा, नीचा इतके धरिशि कशाला कांटे?
रक्षणयोग्य[4] असें तुज पाशीं काय असे, तुज वाटे ७४

समुद्रान्योक्ति.

आर्या.

निर्मळ जळांतुनी या दावी खळ जलधि जवळचीं रत्नें,
चित्तीं आणुं नको परि अल्पें होतील साध्य तीं यत्नें; ७५
गाळांत तळीं लोळति रत्नें, धरिशी तृणें शिरीं नित्य,
तुज तारतम्य कुठलें? जडधी[5] हें नांव, रे, तुझें सत्य; ७६
गर्वें गर्जसि बहु परि, जिणें तुझें व्यर्थ भासतें मजला;
तव तीरीं तान्हेला जन सोधी कूप, टाकुनी तुजला. ७७

---

१. कुपण. बाभळीच्या कांट्यांचें कुपण करतात हें प्रसिद्धच आहे.

२. वेष्टिती या अध्याहृत क्रियापदाचा कर्ता.

३. चंदन वृक्ष व केतकी यांचे अंगीं सुगंध असल्यामुळें कांहीं भीति आहे.

४. राखण्यासारखें.

५. या शब्दीं श्लेष आहे. ड आणि ल या अक्षरांचा अभेद असल्यामुळें जडधी शब्दाचा एक अर्थ जड म्ह० मंद, धी म्ह० बुद्धि ज्याची, म्ह० मूर्ख असा होतो व दुसरा अर्थ जलधी म्हणजे जलाचें सांठवण म्ह० समुद्र असा होतो.

वारी[1] सकळ जगाची तृषा तया गर्जना घना साजे.
ज्याच्या जलास न शिवे कोणी ही, तो समुद्र कां गाजे? ७८

सूर्यान्योक्ति.

कोकां[2] शोकास त्यांच्या शमवुनि दयितासंगमें हर्षवी जो,
कारागारें[3] करांहीं[4] उघडुनि कमलें भृंग ही सोडवी जो,
जेणें अंधार सारा पळवुनि हरिलें सृष्टिच्या दृष्टिदोषा,
त्या मित्रांचा[5] वघूनी उदय कवण तो चित्तिं मानी न तोषा? ७९
देखूनी उदया तुझ्या द्विजकुळें गाती अती हर्षुनी,
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यंतरीं जाउनी,
देशी ताप परी जसा वरिवरी येशी नभीं, भास्करा,
अत्युच्चीं पदिं थोर ही बिघडतो हा बोल आहे खरा. ८०
थोडा बहू उजड पाडुनि अंधकारा
कांहीं कमी करिति दीप, शशांक, तारा;
नाशी प्रकाश अवघ्या हि तमा जयाचा
ऐसा जगीं, समज, एक च भानु साचा. ८१

---

१. क्रियापद. दूर करी.

२. कोक या नांवाचे पक्षी आहेत. त्यांसच चक्रवाक म्हणतात. हीं पांखरें नदी, तळीं इत्यादि जलाशयांच्या आश्रयानें असतात, व त्यांत नरमादींचें फार प्रेम असल्यानें हे पक्षी जोड्याने वहुतकरून फिरतात. या पक्ष्यांविषयीं प्राचीन कवींची समजूत अशी आहे कीं, संध्याकाळीं नरमादीची फुटाफूट होऊन एक एका तीरास व दुसरें दुसऱ्या तीरास अडकून सर्व रात्र तीं वियोगानें दुःख पावत असतात, व सूर्योदय झाला म्हणजे पुनः त्यांची भेट होते.

३. कमळें संध्याकाळीं मिटलीं असतां त्यांत भुंगे अडकून सकाळपर्यंत तसेच कोंडून राहतात, या प्रसिद्धीवरून कमलांस येथें कारागारें कल्पिलीं आहेत.

४. करशब्दीं या ठिकाणीं श्लेष आहे.

५. मित्र व उदय या शब्दांवर श्लेष आहे.

होता जोंवरि अंबरीं तपत तो चंडांशु तेजें निजें
झाला निष्प्रभ तारकाधिपति ही, बोला कशाला दुजें ?
राहूच्या वदनीं अजीं गवसतां तो भानु दैवें अहा !
कैसे क्षुद्र हि काजवे चमकती त्याच्या पुढें हे पहा ! ८२

आर्या.

असती बहु तेजस्वी नक्षत्रें, दीप, [1]अमृतमयगात्र
ज्याच्या उदयास्तांहीं होती दिनरात्रि, तो रवी मात्र. ८३

चंद्राविषयीं अन्योक्ति.

चंद्रा, सकल जनांहुनि तव ही विपरीत रीत काय अशी ?
क्षय होतां [2]वक्रत्वा वृद्धी होतां सुवृत्तता धरशी. ७९
वाढशि जसा जसा तूं, तसा तसा त्वत्कलंक उघड पडे.
चंद्रा योग्य च हें तुज, [3]जडस्वभावा सदां असें च घडे. ८४

श्लोक.

नक्षत्रें परिवार ज्यास, पति ही जो [4]ओषधींचा असे,
ज्यातें पाहुनि हर्षती जन, सुधा ज्याच्या शरीरीं वसे,
होई तेज कमी तया हि विधुचें येतां [5]रवीच्या गृहीं,
ज्या येई लघुता न अन्यसदनीं, ऐसा न कोणीं च ही. ८५

---

१. अमृतरूप आहे शरीर ज्याचें तो म्हणजे चंद्र. चंद्राचें शरीर अमृतमय असून देव त्याचें पान करितात. म्हणून बिंबास क्षयवृद्धी होते, अशी प्राचीन लोकांची समजूत होती.

२. या पद्यांत वक्रत्व व सुवृत्तता या शब्दांचे दोन दोन अर्थ आहेत, ते कोशांत पहावे.

३. ड आणि ल या अक्षरांचें ऐक्य असल्यानें या शब्दाचे जलस्वभाव म्ह० पाण्याचा व जडस्वभाव म्हणजे मूर्ख असे दोन अर्थ होतात. चंद्र जलमय आहे अशी प्राचीन लोकांची समजूत होती.

४. चंद्रास ओषधींचा म्हणजे झाडांचा राजा म्हणतात.

५. सूर्याच्या स्थानीं आला असतां म्हणजे सूर्य व चंद्र एका राशींत आले असतां.

आकाशांत शशांक पूर्ण उदया आला, तया पाहुनी
झालें तुष्ट चकोरमंडल सुधापाना कराया मनीं,
तापक्लेश उणा जनास नुकता होऊं असे लागला
तों दैवें इतुक्यांत मेघ अणुनी कैसा मधें घातला ! ८६

ज्या कांहीं तेज नाहीं, परम कृश हि जो, त्या बिजेच्या शशीला,
मोठ्या यत्नें पहाया[1] झटति, बघुनियां वंदिती लोक त्याला,
वाढे तेजें कलांहीं[2] पुढति बहु जरी, मान[3] तो त्या न राहे.
वस्तू वाटे नवी जों अवड बहु तिची, लोकरीती अशी हे. ८७

मेघाविषयीं अन्योक्ति.

येती रम्य फुलें फलें हि बरवीं वृक्षां जयां त्यां प्रती
घालूनी विपुला जला जन सदां अत्यादरें पाळिती.
शाकोटादिक जे निरर्थक तरू दीनां अनाथां तयां,
मेघा, रक्षिल कोण बा तुज विणें साऱ्या जगा माजि या ! ८८

दावाग्नी गहनीं वनीं भडकतां, ज्यां वाट जी सांपडे,
तीनें धावति जीव घेउनि पशू भांबावुनी बापडे,
ऐसा घोर अकांत हा उसळतां दुर्वार या संकटा
वारायास समर्थसा दिससि तूं आम्हां, घना, एकटा. ८९

गर्वें पर्वतमस्तकीं, जलधरा, धारा वृथा वर्षशी,
पीडा कष्ट करूनि नाविकजनां दुष्टापरी हर्षशी,
पाण्यावीण लता तरू सुकति हे, वृष्टी जरी यांवरी,
रे मेघा, करतास कीर्ति भुवनीं होती तुझी, बा, खरी. ९०

---

१. द्वितीयेच्या चंद्रास मोठ्या यत्नानें पाहून लोक त्यास नमस्कार करतात ही चाल प्रसिद्धच आहे.

२. या शब्दाचे दोन अर्थ आहेत, ते कोशांत पहावे.

३. तो म्हणजे पहिला मान पुढें त्यास राहत नाहीं.

हर्षें मोर समोर पाहुनि जया नाचावया लागले,
चित्तीं चातक तोषले बहु तृषा लागोनि जे शोषले,
तो वृष्ट्युन्मुख[१] मेघ होय, इतुक्यामाजीं अकस्मात हा
वारा उद्भवुनी कसा विखरता झाला, तयातें पहा ! ९१

आर्या.

सकल जलाशय टाकुनि वाट तुझी जो पहात हा बसला,
त्या चातकास गारा मारिशि, मेघा, न योग्य हें तुजला. ९२

साक्या.

तळीं वाळलीं सगळीं, झाले प्रवाह सूक्ष्म नद्यांचे,
गाळीं तळमळ करुनि लोळती जलचर तळीं तयांचे, ९३

गेलीं वाळुनि झाडें सारीं, न मिळे छाया कोठें,
पशु पक्षी ही व्याकुल होउनि दुःख पावती मोठें, ९४

पृथ्वी लोहापरि तापुनियां चटचट पोळति पाय,
प्रचंड उष्ण हि वायु सुटोनी करित जनास अपाय, ९५

कुपित शत्रुसा तीव्र शरांपरि किरणां दिनकर वर्षे,
लोकां अनुपम ताप देउनी जणु चित्तीं तो हर्षे, ९६

प्रळयकाळ जणु जवळ पातला, विश्व आतां जळणार,
ऐसें मानुनि मनांत करिती लोक शोक अनिवार, ९७

ग्रीष्में यापरि करुनि पीडा गांजियला जन सारा,
शरण पातला, घना, तुझ्याविण न दिसे दुसरा थारा. ९८

महासागरीं गिरिशिखरांवरि वर्षशि उगिच कशाला ?
जळापासुनी तव कांहीं ही नाहीं लाभ तयांला. ९९

---

१. वृष्टि करण्याच्या रंगांत आलेला.

पाहुनि योग्य प्रसंग पात्रीं अल्प हि करितां दान,
दाता लाधे अखंड कीर्ती यश आणी सन्मान. १००

हंसान्योक्ति.

श्लोक.

जीमाजीं कमळें नवीं विकसुनी, त्यांच्या परागें जला
येई फार सुगंध, भृंग करिती गुंजारवा मंजुला,
ऐशी सुंदर वापिका त्यजुनियां, हंसा, कुठें जावया
होशी उत्सुक, सांग, लाजशि असा कां फार बोलावया? १०१

थरकति अरविंदें मंद वातें, तयांचें
रज उडुनि सुगंधी[1] रंगवी अंग ज्यांचें,
विपुल मृदु मृणालें भक्षिलीं स्वस्थ जेणें,
अणुभर हि कधीं जो स्वप्निं ही दुःख नेणें, १०२

उडत उडत जातां हंस तो मानसींचा
मरु जनपद मार्गीं लागला त्यास साचा,
सरस कमल तंतू राहिले दूर भारी,
श्रम करुनि मिळेना बापड्या कूपवारी[2]. १०३

पानांमाजीं तरूच्या लपुनि वस कुठें, राजहंसा, कसा ही,
जाती वर्षर्तुचे[3] हे दिवस तंववरी सर्व कष्टांस साही[4],

---

१. रजाचें विशेषण.

२. विहिरीचें पाणी.

३. वर्षाऋतूचे म्हणजे पावसाळ्याचे. हंसांस पावसाळा आवडत नाहीं. त्या दिवसांत ते उत्तर दिशेस मानस सरोवराकडे जातात अशी प्रसिद्धि आहे.

४. सहन कर.

येऊनी शारदश्री[1] पुनरपि फुलतां पद्मवृंदें, तयांचा
भोक्ता नाहीं कुणी ही तुजविण दुसरा, जाण हा नेम साचा. १०४

होऊनी हंस येथें वक वसत असे, रे मराळा, कशाला
या ठायीं पातलाशी? निघुनि परत जा पाउलीं या घराला.
नाहीं कांहीं परीक्षा मतिरहित अशा येथल्या या जनांतें,
मानूनी ते तुलाची वक हसतिल कीं जाण या निश्चयातें. १०५

ज्याच्या तीरीं समंतान्मधुरफलभरें[2] वांकले वृक्ष भारी,
ज्या माजीं पद्मखंडें फुलुनि विखरती गंध चित्तापहारी,[3]
त्या जेणें मानसातें त्यजुनि वरियलें पंकिला पल्वलातें,
त्या हंसाच्या वकांनीं जरी पैंद[4] दिधलें मस्तकीं, योग्य त्या तें.
१०६

पुष्पांहीं पल्लवांहीं विविध तरुवरां सर्वदां भूषवी जो,
नानाधान्यें फळें हीं पिकवुनि सुखवी प्राणिमात्रा सदां जो,
हर्षे पाहूनि ज्यातें[5] जग, धरशि मनीं त्रास त्या अंबुदाचा,
हंसा, वर्णे[6] जरी तूं धवल, तरि गुणें कृष्ण आहेस साचा. १०७

विजा चमकती न जों नभिं, न मेघ जों वर्षती,
जलाशय सरोवरें कलुषता न जों पावती,
प्रफुल्ल नवपंकजीं[7] कमलिनीवनीं तोंवरी
विलास, कलहंसका, सकल ही मनींचे करी. १०८

---

१. शरदृतूची शोभा. शरदृतूंत म्हणजे आश्विनकार्तिकांच्या महिन्यांत हंस परत येतात.

२. मधुर फळांच्या भारानें.

३. चित्ताचें हरण करणारा, मधुर, हें गंधाचें विशेषण.

४. मस्तकीं पाय दिला, म्हणजे अपमान केला.

५. ज्यातें म्हणजे मेघातें.

६. रंगानें तूं पांढरा आहेस. म्हणजे बाहेरून तूं स्वच्छ दिसतोस, तरी गुणानें तूं काळाच आहेस, म्हणजे तुझे गुण वाईट आहेत.

७. फुललेलीं आहेत नवीन पंकजें ज्यांत तें. (कमलिनीवनाचें विशेषण.)

गेलें गांभीर्य सारें, सकल कमलिनी वाळुनी कोळ झाल्या,
हर्षे झुंडी बकांच्या मिळुनि जलचरां खावयालागिं आल्या,
हंसा, येथें कशाला वससि अजुनि तूं ? ऊठ, रे ऊठ वेगें,
नाहीं स्वच्छा शरीरा चिखल उडुनियां जोंवरी डाग लागे. १०९.

भ्रमरान्योक्ति.

आर्या.

पुष्पित लता सहस्रावधि अनुभविल्या तुवां रसज्ञवरें,
रे, त्यांत पद्मिनीपरि एकतरी देखिलीहि, सांग बरें. ११०

टाकुनि चंपककलिका, कण्हेरिच्या कां फुलास भुललास ?
अथवा नवल कशाचें ? रे तुजला हें च योग्य मधुपास. १११.

कंटक टोंचति परिही द्विरेफ न कदापि केतकी सोडी.
दोषांतें तो नगणी, ज्यातें दृढ लागली गुणीं गोडी. ११२.

श्लोक.

आंबे चंदन चंपकादिक तरू सारे च का वाळले ?
पद्मांनीं भरले जलाशय लया कीं सर्व ही पावले ?
झालीं निर्मद आणि शुष्क करिचीं कीं सांग गंडस्थलें ?
रे मूढा भ्रमरा, करीरकुसुम त्वां आज जें चांखलें. ११३

---

१. या पद्यांत पुष्पित, रसज्ञवर व पद्मिनी हे शब्द श्लिष्ट आहेत, त्यां-कडे चतुर वाचणारांनीं लक्ष्य पुरवावें.

२. मधुप शब्दीं श्लेष आहे. त्याचा एक अर्थ मध पिणारा व दुसरा अर्थ मद्य पिणारा, व मद्यप्यास तारतम्य ज्ञान नसतें यांत नवल नाहीं.

३. द्विरेफ म्हणजे भुंगा. द्विरेफ हा शब्द चमत्कारिक रीतीनें झाला आहे. द्विरेफ म्हणजे ज्यांत दोन रेफ आहेत तो, व भुंग्याचा वाचक जो भ्रमर शब्द यांत दोन रेफ असल्यामुळें भुंग्यासही द्विरेफ म्हणण्याची रीत पडली.

४. वळकट.

सुगंधें जी टाकी सकल हि दिशा व्यापुनि निजें,
अपूर्वा कांतीतें निरखुनि जयेच्या मन रिझे,
अशी होई [1]भोगक्षम कमलिनी तों भ्रमर हा
[2]विदेशातें जाई, विधि [3]अदय कैसा तरि पहा ! ११४

---

१. उपभोग घेण्याजोगी.
२. परदेशीं, दुसऱ्याकडे.
३. ज्यास दया नाहीं असा. (विधीचें विशेषण.)

विद्याप्रशंसा.

आर्या.

विद्येनें च मनुष्या आलें श्रेष्ठत्व या जगामाजीं.
न दिसे एक हि वस्तू विद्येनें ही असाध्य आहे जी. १
स्वाभाविकां गुणांहीं केवळ बघतां समस्त सृष्टींत,
प्राणिगणीं मनुजापरि पंगू एक हि न ये च दृष्टींत. २
सिंहव्याघ्रगजादिक असती मनुजाहुनी बळें अधिक,
भासे जयां पुढें हा बलहीन, क्षुद्र, जेविं कीं मशक. ३
देहाच्या सौंदर्यें, स्वैरगतीनें[1] हि पाहतां, दिसती
पक्षी लक्षावधि ही, जे श्रेष्ठ नराहुनी[2] बहुत असती. ४
राजा[3] भर्तृहरि म्हणे नर विद्याहीन पशु च जाणावा;.
परि मज वाटे तो पशुपेक्षां ही फार[4] नीच समजावा. ५
विद्याबलसम अढळे न दुजें बल कोणतें हि या लोकीं,
तीनें[5] निजप्रभावें वश केलें सकल विश्व, अवलोकीं. ६
क्षुद्रा पशुपक्ष्यांची काय कथा? पांच ही महाभूतें[6]
ज्ञानबळें आकळुनी केलें मनुजें स्वदाससम त्यांतें. ७

---

१. स्वैरगति म्हणजे पाहिजे तिकडे जाणें.

२. मोर वगैरे पक्ष्यांचीं शरीरें मनुष्याच्या पेक्षां स्वभावतः सुंदर आहेत व अंतरिक्षांतून त्यांस उडतां येत असल्यामुळें हावें तिकडे जाण्याचेही त्यांचें स्वाभाविक सामर्थ्य मनुष्यापेक्षां फार अधिक आहे.

३. भर्तृहरि म्हणून एक राजा होता, हा शककर्ता जो विक्रमराजा त्याचा वडीलभाऊ असें म्हणतात. त्यानें संस्कृत भाषेंत कितीएक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं नीतिशतक, वैराग्यशतक वगैरे कांहीं प्रसिद्ध आहेत. त्यांतील एका ग्रंथांत "ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः" असें त्यानें म्हटलें आहे.

४. पशूपेक्षां नीच कसा हें वरील आर्यांत दाखविलेंच आहे.

५. विद्येनें.

६. पांच महाभूतें म्हणजे पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आणि आकाश.

विसरुनि[1] परस्परांचा विरोध जल वन्हि[2] सेविती त्यातें
दासापरि वश होउनि करिती त्याच्या समस्त कृत्यांतें. ८
त्याचीं वस्त्रें विणिती[3], रथ[4] ओढिति, लोटिती हि नौकांतें[5],
बहु सांगणें कशाला? करिती तो सांगतो तयां [6]तें, तें. ९
मोठे मोठे तरुवर मोडी, फोडी हि जी शिलाराशी[7],
विद्युल्लता, नरें ती केली संदेशहारिका[8] दासी. १०
विद्येच्या सामर्थ्यें केला रवि [9]चित्रकार मनुजानें,
होउनि अंकित वायु हि तुष्ट करी त्यास सुस्वरें गानें[10]. ११
व्यासादिक आद्य मुनी, कवि अर्वाचीन सर्व थोर तसे
म्हणती एक मतें कीं धन विद्यासम नरास अन्य नसे. १२
देउनि, किंवा भोगुनि उणें न होतां सदैव वाढतसे
ऐसें एक च विद्याधन, अद्भुत गुण न हा दुज्यांत वसे. १३

---

१. जसें जबरदस्तानें एकाद्यांस गुलाम करून टाकलें असतां त्यांस परस्परांचा द्वेष असला तरी तो एकीकडे ठेवून त्या जबरदस्ताची चाकरी करावी लागते तसें.

२. या आर्येंत वाफेच्या यंत्राकडे लक्ष्य आहे. त्या यंत्रांतील चालक शक्ति अग्नि व जल यांच्या योगानें उत्पन्न झाली असते.

३. वाफेनें चालणारीं कापड विणण्याचीं यंत्रें.

४. आगगाड्या.

५. आगबोटी.

६. वाफेनें चालणारीं दुसरीं अनेक प्रकारचीं यंत्रें.

७. डोंगर.

८. निरोप नेणारी. (तारायंत्र).

९. फुतामफी म्हणून सूर्याच्या तेजाच्या योगानें चित्रें काढण्याची कला आहे, तिजकडे लक्ष्य देऊन येथें सूर्यास चित्रकार म्हणजे चितारी माणसानें केलें असें वर्णिलें आहे.

१०. तृतीया विभक्ति, गाण्यानें, 'अयोलियन हार्प' या नांवाचें एक तंतुवाद्य असतें, तें लावून खिडकींत टांगून ठेविलें असतां वाऱ्यानें सुस्वर वाजतें. त्याच्या संबंधानें वायूस या आर्येंत गायक कल्पिलें आहे.

न बलात्कारें राजा, न चोर कपटें, जया हरायास
होई समर्थ, ज्याच्या अल्प हि संरक्षणीं न आयास. १४

नानाविध रत्नांचीं कनकाचीं असति भूषणें फार,
परि विद्यासम एक हि शोभादायक नसे अलंकार. १५

या साऱ्या भुवनीं हितकर विद्ये सारखा सखा नाहीं,
अनुकूळ ती जयाला नित्य, तयाला उणें नसे कांहीं. १६

गुरुपरि उपदेश करी, संकटसमयीं उपायही सुचवी,
चिंतित फळ देउनियां कल्पतरूपरि मनोरथा पुरवी. १७

कांतेपरि एकांतीं स्वांतातें हर्षवूनियां रिझवी,
आनंदसागरीं मन बुडवुनि चिंताज्वरास ती विझवी. १८

जी करि मर्त्य नराला अजरामर, ती सुकीर्ति मिळवाया,
विद्या च साधन खरें, पुढें तिच्या अन्य साधनें वाया. १९

भूमंडळीं पसरलें यश रामयुधिष्ठिरादि राजांचें,
परि तें फळ वाल्मीकिव्यासांच्या प्रौढ वाणिचें साचें. २०

नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य हें वचन
सत्य असे तरि, विद्यादानाशीं तुल्य पुण्य आणिक न. २१

---

१. वाल्मीकि कवीनें रामायण केलें, व व्यासानें भारत केलें, म्हणूनच रामचंद्राची व धर्मराजाची अजरामर कीर्ति भूमंडळी राहिली असा अभिप्राय. विल्हण कवीनें असेंच म्हटलें आहे–

लंकापतेः संकुचितं यशो यत्,
यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः,
स सर्व एवाद्यकवेः प्रभावो,
न कोपनीयाः कवयः क्षितींद्रैः.

ऐश्वर्य, बल, धनादिक सौख्यें प्रसवे समस्त जीं कांहीं
ती विद्या जो देई, तेणें, वद, काय तें दिलें नाहीं? २२

यापरि सकल सुखें जीं देई, दुःखें समस्त जी वारी,
त्या विद्या देवीतें अनन्यभावें सदां भजा भारी. २३

---

१. विद्या ही कोणी देवी.

प्रश्नोत्तरावली.

कोण दरिद्री ज्याच्या हृदयीं तृष्णा सदां विशाल वसे.
श्रीमान् कोण म्हणावा? जो नर संतुष्टचित्त नित्य असे. १

असुनि जिवंत हि मेला कोण? असे जो सदां निरुद्योगी;
उत्साहरहित ज्याचें मन, किंवा जो असे सदां रोगी. २

कोण सदां दुःखी? जो झुरे मनीं पाहुनी परोत्कर्ष.
कोण सुखी? पावे जो हर्षित दुसऱ्यांस देखुनी हर्ष. ३

सुकृती[1] कोण? जयाचें परोपकारीं शरीर नित्य झिजे.
पापी कोण म्हणावा? जो पीडा देउनी परास रिझे. ४

कोण महाशूर? मना जो आकळुनी सदां स्ववश ठेवी.
भीरू कोण? भयानें मूढजनांच्या कुमार्ग जो सेवी. ५

कोणा अंध म्हणावें? न दिसे सन्मार्ग उघड ही ज्यास.
कोण बधिर? जो नाहीं परिसत केल्या हितोपदेशास. ६

रोगांत कोणता वद रोग भयंकर? मनांतली चिंता.
औषध काय अनुत्तम? भोजननिद्रादिकांत परमितता[2]. ७

---

१. पुण्यवान्.
२. नेमस्तपणा.

ऐश्वर्य, वल, धनादिक सौख्यें प्रसवे समस्त जीं कांहीं
ती विद्या जो देई, तेणें, वद, काय तें दिलें नाहीं? २२

यापरि सकल सुखें जीं देई, दुःखें समस्त जी वारी,
त्या विद्या देवीतें अनन्यभावें सदां भजा भारी. २३

---

१. विद्या ही कोणी देवी.

प्रश्नोत्तरावली.

कोण दरिद्री ज्याच्या हृदयीं तृष्णा सदां विशाल वसे.
श्रीमान् कोण म्हणावा? जो नर संतुष्टचित्त नित्य असे. १

असुनि जिवंत हि मेला कोण? असे जो सदां निरुद्योगी;
उत्साहरहित ज्याचें मन, किंवा जो असे सदां रोगी. २

कोण सदां दुःखी? जो झुरे मनीं पाहुनी परोत्कर्ष.
कोण सुखी? पावे जो हर्षित दुसऱ्यांस देखुनी हर्ष. ३

सुकृती[1] कोण? जयाचें परोपकारीं शरीर नित्य झिजे.
पापी कोण म्हणावा? जो पीडा देउनी परास रिझे. ४

कोण महाशूर? मना जो आकळुनी सदां स्ववश ठेवी.
भीरू कोण? भयानें मूढजनांच्या कुमार्ग जो सेवी. ५

कोणा अंध म्हणावें? न दिसे सन्मार्ग उघड ही ज्यास.
कोण बधिर? जो नाहीं परिसत केल्या हितोपदेशास. ६

रोगांत कोणता वद रोग भयंकर? मनांतली चिंता.
औषध काय अनुत्तम? भोजननिद्रादिकांत परमितता[2]. ७

---

१. पुण्यवान्.
२. नेमस्तपणा.

विरहिविलाप.[1]

अहा कैसा झाला अवचित विधी निष्ठुर असा !
प्रिया एकाएकीं अमरसदना गेलि सरसा.
मना, आतां कोणा कथिशिल जिवींच्या हितगुजा ?
सुखाच्या शब्दांनीं कवण निववू ताप हि तुझा ! १

घरातें मी येतां, दचकुनि उठोनी हसुनियां,
विशाला नेत्रांहीं अमृतरसवृष्टी करुनियां,
न कां चित्ता आजी मधुरवचनीं हर्ष करिशी ?
असे झाली माझ्या अगळिक करें कोणति अशी? २

बुजालें दुःखानें स्मरण विषयांचें अवघियां,
अनभ्यासें गेली मज सकळ विद्या त्यजुनियां,
जिचे डोळे काळे बघुनि मृगबाळें हि झुरती,
वसे चित्तीं देवी परि सतत ती मात्र सुदती. ३

निघोनीयां जातां अवचित सखी मुक्तिसदना,[2]
दयाशीला, वाटे, विसरलि दया ही सुवदना.

---

१. जगन्नाथराय या नामें महाप्रख्यात व रसिकशिरोमणि एक कवि होऊन गेला. त्याचा 'गंगालहरी' नामक ग्रंथ पुष्कळांस ठाऊक असेल. त्याच कवीनें केलेल्या 'भामाविलास' नामक ग्रंथाच्या आधारानें हीं पुढील अठरा पद्यें रचलीं आहेत. कोणीं एका पुरुषानें आपली अत्यंत आवडती व सुगुणसंपन्न स्त्री मरण पावली असतां तिचे गुण आठवून केलेला विलाप या पद्यांत वर्णिला आहे. सत्रा पद्यांचें शिखरिणी नामक वृत्त आहे, व शेवटच्या पद्याचें वृत्त वसंततिलका नामक आहे.

२. मुक्ति हीच कोणी एक सखी, म्हणजे मैत्रीण, तिच्या घरीं. येथें मुक्ति शब्द स्त्रीलिंगी असल्यावरून मुक्तीवर सखीचें रूपक केलें आहे.

कटाक्षांहीं नीलांबुजमदहरांहीं[1] मजवरी,
कृपालेशातें ही प्रकट म्हणुनी आज न करी. ४

पडायाच्या भीतीस्तव मम करातें धरुनियां,
विवाहीं[2] पाषाणीं चढलिस, सखे, तूं जपुनिया,
कशी ती तूं आजी चढशि मज सोडोनि गगनीं
करी ऐशी शंका हृदय शतधा येउनि मनीं. ५

तुझें[3] जाणें, प्राणेश्वरि, परिसुनी स्वर्गभुवनीं
अलापातें शंका त्यजुनि करिती कोकिल वनीं,
निमाली चिंता ही सकल कमलांची अजि अहा,
कशी आतां चंद्रा अतुल सुषमा लाधलि, पहा ! ६

सखे, विद्युल्लेखास्फुरणचपला[4] देउनि मला
सुरेंद्राच्या कांहीं दिवस उपभोगांस अतुला[5]
अहा ! मंत्रभ्रष्टक्षितिपतिस लक्ष्मी त्यजि जशी,
लया पुण्यें जातां त्यजुनि तशि गेलीस मजशी. ७

असोनी त्वां भूमीवर चढविलें ज्या सुरपदीं
प्रिया, नाथा, ऐशा अतिमधुर संबोधनपदीं,

---

१. निळ्या कमलांचा गर्व हरणारे, म्हणजे त्यांहीपेक्षां सुंदर. हें कटाक्षांचें विशेषण.

२. लग्नांत नवऱ्या मुलीला सहाणेवर उभी करण्याचा एक संस्कार आहे. ती गोष्ट मनांत आणून विलाप करणारा स्त्रीस म्हणतो कीं, अगे, लग्नांत सहाणेवर चढतांना देखील माझा हात तुला धरावा लागला, असें असतां तूं एकटी आकाशांत कशी चढून गेली असशील हें मनांत येऊन हृदय फुटून त्याचे शंभर तुकडे होतात.

३. या ठिकाणीं त्या स्त्रीचा स्वर कोकिलाच्या स्वरापेक्षांही मधुर होता व तिचें मुख कमलें व चंद्र यांपेक्षांही सुंदर होतें असा अर्थ गर्भित केला आहे.

४. विजेच्या चमकण्यासारखे चंचल. हें उपभोगांचें विशेषण.

५. हेंही उपभोगांचेंच विशेषण.

तया मातें कैशी धरणितलधूलींत, सखये,
दिवस्था[१] होऊनी ढकलिशि; दया कां तुज नये? ८

अपूर्वा लावण्या, अनुपम सुशीला, सुविनया,
अपारा चातुर्या, अगणित कलांतें हि, सुनया,
गुणां ऐशा कोणा निरविशि, सखे, आणि मजला?
नसे थारा त्यांतें, मज हि, दुसरा ज्ञातें[२] तुजला; ९

प्रभापावित्र्यांहीं स्वसम तुज पाहून दहना
अला वाटे हेवा मनिं बहुत त्या कृष्णवदना,
तयानें त्या रोषें, मज गमतसे जाळिलि तुला;
दया त्या कैची? जो स्वजननि[३] हि खाऊं न चुकला १०

सुधास्पर्शीं जेवीं निवति नयनें जीस बघुनी,
जिचा कंठीं वाटे कर कमलहारापरि मनीं,
करी जी उल्हासा अतुल कविता सुंदर जशी,
तुला नाहीं कोठें मनुजभुवनीं योग्य तिजशी. ११

न पाही स्वप्नीं ही पतिविण कधीं जी नर दुजा
स्पृहायुक्तें चित्तें, जितकमलनालोत्तमभुजा,[४]

---

१. 'पृथ्वीवर होतीस तेव्हां मला स्वर्गी चढवून आतां स्वर्गात स्वतः गेली असतां मला भूमितळीं लोळावयास लावतेस' असा विरोधालंकार या पद्यांत आहे.

२. अध्याहृत सर्वनाम हें (म्हणजे ही गोष्ट) याचें विशेषण.

३. अग्नीची आई अरणी, तीस तो जाळतो हें प्रसिद्धच आहे. तेव्हां मातृवध करणाऱ्यांस दया कोठून असणार?

४. कमलाच्या देंटास जिंकणारे आहेत उत्तम भुज जिचे, म्हणजे जिचे भुज कमलनालापेक्षांही नाजूक व गोंडस आहेत. हें जी या सर्वनामाचें विशेषण.

सुशीला तूं ऐशी पर[1] पुरुष जो निर्गुण, तया
कशी पाहूं जाशी, हरिणनयने, सत्वर[2]तया? १२
गुणांनीं[3] जी पूर्णा, अणुसम नसे दोष हि जिला
अलंकारीं साजे, रस वसतसे जींत पहिला,
मृदू जीचे वर्ण श्रवणसुख देती परिसतां,
वसे ती पद्माक्षी जशि हृदयिं माझी सुकविता. १३
न जाणो दुर्दैवें अगळिक असे काय घडली,
जिच्या योगें ऐशी तव मनिं अढी थोर पडली,
म्हणोनी सोडोनी मज रुसुन गेलीस सदनीं
सखी मुक्तीच्या तूं असुनि विमला कीर्ति हि जनीं. १४
सुधातुल्यें हास्यें करुनि अभिषेकास मजला,
कटाक्षांनीं वर्षे जणु मजवरी नील कमलां,

---

१. परपुरुष व निर्गुण या दोन शब्दांत श्लेष आहे. परपुरुष म्हणजे पतीहून निराळा पुरुष, म्हणजे जार; व दुसरा अर्थ परपुरुष म्हणजे उत्तम पुरुष, म्हणजे ईश्वर. तसेंच निर्गुण म्हणजे मूर्ख असा एक अर्थ, व ईश्वर पक्षीं निर्गुण म्हणजे सत्त्व, रज, तम, हे गुण ज्यास नाहींत असा अर्थ घ्यावयाचा. यावरून "तूं सुशीला म्हणजे पतिव्रता असतां निर्गुण परपुरुषाकडे कशी जातेस?" असा श्लेषमूलक विरोधाभासालंकार या पद्यांत आहे.

२. सत्वरतया हें सत्वरता या संस्कृत शब्दाच्या त्या भाषेप्रमाणें तृतीयेचें रूप आहे. त्याचा अर्थ सत्वरपणानें असा समजावा. संस्कृत विभक्तींची रूपें प्राकृत कवितेंत घालण्याची मोरोपंतादि जुन्या कवींची चाल आहे.

३. या पद्यांत श्लेषमूलक उपमालंकार आहे. यांतील विशेषणें किंवा विशेषणरूप गौण वाक्यें दोन अर्थांची असून तीं स्त्रीकडे व कवितेकडे लागतात. स्त्रीपक्षीं गुण म्हणजे पातिव्रत्य, उदारत्व, मायाळूपणा इत्यादि होत; व कवितापक्षीं अर्थगांभीर्य, शब्दमाधुर्य इत्यादि गुण होत. तसेंच स्त्रीपक्षीं दोष म्हणजे दुर्गुण, क्रूरपण, कपट, इत्यादि; व कवितापक्षीं असंबद्ध किंवा दुर्बोध अर्थ, कठोर शब्द इत्यादि दोष होत. स्त्रीपक्षीं अलंकार म्हणजे दागिने; व कवितापक्षीं उपमा, रूपक वगैरे अलंकार समजावयाचे. पहिला रस म्हणजे शृंगार, हा अर्थ स्त्री व कविता या दोहींकडे सारखाच लागतो. जिचे वर्ण कर्णास सुख देणारे म्हणजे स्त्रीपक्षीं जिचें भाषण मधुर व कवितापक्षीं कवितेंतील वर्णरचना गोड असा अर्थ समजावा.

मृगाक्षी मांगल्यप्रदविधिविधात्री[1] सुवदना
न सोडी चित्तातें क्षणभरि हि ती कुंदरदना. १५

बसोनी पर्यंकीं दयितगुण गातां निजमुखें
दिनें नाहीं झालीं बहु निरखुनीयां तुज, सखे,
न कां आजी देशी प्रतिवचनही एक मजला?
असा कां माझ्याशीं अवचित अबोला धरियला? १६

स्वरूपें[2] काव्याच्या अजवरि, सखे, जे प्रकटले,
विलास प्रीतीचे सरस अमृतातुल्य घडले,
तयांचा दुर्दैवें अवचित असा नाश घडतां,
पुढें आतां कैशी मधुर मम होईल कविता? १७

तीं भाषणें मधुर जीं अमृतासमान,
लावण्य तें रतिहि देत जयास मान,
तें शील ज्यांस तुलना न मिळेचि कोठें,
कोणास हर्ष गुण हे स्तवितां न वाटे? १८

---

१. मंगलप्रद विधींची म्हणजे कृत्यांची विधात्री म्हणजे करणारी—पहिल्या दोन चरणांत वर्णिलेला अभिषेक व कमलवृष्टि हीं मंगलप्रद कृत्यें समजावयाचीं.

२. या स्थळीं कवि आपल्या प्रियकर स्त्रीस असें म्हणतो कीं माझ्या कवितेंत जो रस येई त्याचें कारण तुझे प्रीतिविलास होते म्हणजे तुझ्या प्रीतिविलासांचा अनुभव घेऊन त्यांचें मी वर्णन करीं तेणेंकरून माझी कविता रसिक होई. सांप्रत ते विलास नाहींतसे झाले यास्तव कविता यापुढें मधुर कशी होईल?

पद्यरत्नावलींतील कठिण शब्दांचा अर्थ.

अ

अकस्मात्, अव्य. एकाएकीं.

अगळिक, स्त्री. ना. अपराध, चूक

अगणित, वि. ज्यास गणना नाहीं तें, असंख्य.

अंगना, स्त्री. ना. स्त्री.

अचेतन, वि. निर्जीव.

अढी, स्त्री. ना. वांकडेपणा, गांठ.

अणु, पुं. ना. थोडा अंश, लेश.

अतुल, वि. ज्यास तुलना नाहीं तें.

अंतर, न. ना. आंतला भाग. २ अन्य; जसें, लोकांतर म्ह. दुसरा लोक, वनांतर म्ह. दुसरें वन इ०.

अर्थी, पुं. ना. याचक, मागणारा.

अद्भुत, वि. चमत्कारिक.

अद्रि, पुं. ना. पर्वत.

अधम, वि. नीच, हलका, दुष्ट.

अंध, वि. अंधळा.

अनभ्यास, पुं. ना. अभ्यासाचा अभाव.

अनुपम, वि. ज्यास उपमा नाहीं तें.

अनुरक्त, वि. प्रेम करणारी.

अनंग, पुं. ना. मदन, काम.

अन्य, वि. निराळें.

अपार, वि. ज्यास पार नाहीं तें.

अपाय, पु. ना. उपद्रव.

अंबुज, न. ना. कमळ (अंबु म्ह. पाणी आणि ज म्ह. झालेलें).

अबोला, पुं. ना. न बोलण्याचा नेम.

अंबर, न. ना. आकाश.

अंबुद, पुं. ना. मेघ.

अभिमत, न. ना. वांछित वस्तु.

अमति, वि. अज्ञान, अजाण.

अमूप, वि. पुष्कळ.

अमोल, वि. ज्यास मोल नाहीं तो, उत्तम.

अरण्य, न. ना. रान.

अरविंद, न. ना. कमल.

अलक, पुं. ना. केंस.

अवचित, अव्य. एकाएकीं.

असाध्य, वि. अप्राप्य, न मिळण्याजोगा.

अहर्निश, अव्य. रात्रंदिवस.

आ.

आगळा, वि. उत्तम. अधिक.

आतिथ्य, न. ना. पाहुणचार.

आर्द्र, वि. ओलें. २ कनवाळू.

आम्र, पुं. ना. आंब्याचें झाड.

आश्रम, पुं. ना. राहावयाची जागा (ऋषि वगैरेची).

आस्य, न. ना. तोंड.

आव्हेरणें, क्रि. न मोजणें, तुच्छ मानणें.

इ.

इतर, वि. दुसरा.

उ.

उत्सुक, वि. उत्कंठित, उतावीळ.

उदय, पुं. ना. उगवणें. २ भरभराट.

उदेलें, वि. उदयास आलें.

उद्यान, न. ना. बाग.

उद्दाम, वि. जोराचा, दांडगा, मोठा.

उन्मत्त, वि. माजलेला.

उपवन, न. ना. बाग.

उद्भवणें, क्रि. उत्पन्न होणें.

उल्हास, पु. ना. आनंद, हर्ष.

ओ.

ओषधी, स्त्री. ना. वनस्पति, झाडें.

क.

कंकण, न. ना. कांकण.

कच, पु. ना. डोईचे केंस.

कज्जल, न. ना. काजळ.

कटाक्ष, पु. ना. दृष्टि—नजर—डोळे फेंकणें.

कंटक, पु. ना. कांटा.

कंठ, पु. ना. गळा, मान.

कण, पु. ना. अणु, अति थोडा अंश.

कृतघ्नता, स्त्री. ना. अनुपकारीपणा.

कृति, वि. धन्य, भाग्यवान्.

कदली, स्त्री. ना. केळ.

कनक, न. ना. सोनें.

कमलनाल, पु. ना. कमलाचा देंठ.

कमलिनी, स्त्री. ना. कमलाचा वेल.

कर, पु. ना. हात. २ किरण. ३ सोंड. ४ खंडणी.

कर्पूर, पुं. ना. कापूर.

करीर, पुं. ना. एका जातीचें क्षुद्र झाड आहे.

कर्ण, पुं. ना. कान.

करी, पु. ना. हत्ती.

करुणस्वर, पुं. ना. दया आणणारा स्वर.

कलहंस, पु. ना. एका जातीचा हंस पक्षी.

कलकल, पुं. ना. गलबला.

कला, स्त्री. ना. विद्या. २ चंद्राचा सोळावा भाग.

कलुषता, स्त्री. ना. गढुळपणा.

कलिका, स्त्री. ना. फुलाची कळी.

कवण, सर्वना. कोण.

कृश, वि. रोड, क्षीण.

कृष्णवदन, वि. काळ्या तोंडाचा. २ अग्नि.

का.

काक, पुं. ना. कावळा.

काज, न. ना. काम, कृत्य.

कांड, न. ना. देंठ, कांडें.

कांत, पुं. ना. नवरा.

कांता, स्त्री. ना. सुंदर स्त्री.
कामी, वि. विषयी.
कामिनी, स्त्री. ना. स्त्री, बायको.
काया, स्त्री. ना. शरीर, देह.
कारागार, न. ना. बंदीखाना.
काहली, स्त्री. ना. आग, उष्मा, दाह.

कि.

किरीट, पुं. ना. मुकुट.

कु.

कुच, पुं. ना. स्तन.
कुंज, पुं. ना. भोंतालीं झाडें लावून मध्यें टेवलेली जागा. जाळी. जाळें.
कुटज, पुं. ना. कुडयाचें झाड.
कुंदरदना, स्त्री. वि. कुंदाच्या कळ्यासारखे जिचे दांत आहेत ती.
कूप, पुं. विहीर.
कुपित, वि. रागावलेला.
कुंभ, पुं. ना. भांडें.
कुरंग, पुं. ना. हरिण, मृग.

कु.

कुशलमयी, वि. खुशाल असल्याची.
कुसुम, न. ना. फूल.
कुसुमित, वि. फुललेला.

के.

केका, स्त्री. ना. मोराचा शब्द.
केकी, पुं. ना. मोर.
केतकी, स्त्री. ना. केवडयाचें झाड.
केली, स्त्री. ना. क्रीडा.
क्लेश, पुं. ना. पीडा.
केसरी, पुं. ना. सिंह.

को.

कोक, पुं. ना. चक्रवाक नामक पक्षी.
कोकिल, पुं. ना. कोकिल नामक पक्षी.
कोटर, न. ना. (झाडांतली वगैरे) ढोल.
कोठें, न. ना. घरटें, खोपा.

ख.

खच, पुं. ना. जाड व मोठा थर.
खंडणें, क्रि. तोडणें, निराश करणें.
खंड, पुं. ना. तुकडा. २ समुदाय.
खद्योत, पुं. ना. काजवा.
खरतर, वि. फार धारेचा, तीव्र.
खवळणें, क्रि. रागावणें.
खुळा, वि. अज्ञान.

ग.

गज, पुं. ना. हत्ती.
गर्जित, न. ना. गर्जना, गडगडाट.
गंड, न. ना. गंडस्थल.
गणणें, क्रि. मोजणें, समजणें.
गमणें, क्रि. वाटणें, भासणें.
गृह, न. ना. घर, स्थान.
गवाक्ष, न. ना. खिडकी.
ग्रस्त, वि. गिळलेला.२ पिडलेला.
गहन, वि. दाट, गर्दीचें.

गा.

गांभीर्य, न. ना. खोलपणा.

गि.

गिरि, पुं. ना. पर्वत, डोंगर.

ग्री.

ग्रीष्म, पुं. ना. उन्हाळा.

गु.

गुच्छ, पुं. ना. झुबका, गेंद.

गुंजारव, पु. ना. भुंग्याचा शब्द.

गुहा, स्त्री. ना. पर्वताची दरी.

गोजिरा, वि. सुंदर.

घ.

घात, पु. ना. ताडण.

घन, पु. ना. मेघ, ढग.

च.

चंचु, स्त्री. ना. चोंच.

चंडांशु, पु. ना. सूर्य.

चंदन, पु. ना. चंदनाचें झाड.

चंद्रिका, स्त्री. ना. चांदणें.

चपळ, वि. चंचळ, थोडा वेळ राहणारा.

चंपक, पु. ना. चांफा.

चमरी, स्त्री. ना. वनगाई, ज्याच्या शेंपटीच्या केंसांच्या चवऱ्या होतात तें जनावर.

चरण, पु. ना. पाय.

चा.

चातक, पु. ना. एके जातीचा पक्षी.

चाप, न. ना. धनुष्य, तीर मारण्याचा कांबटा.

चामर, न. ना. चवरी.

चु.

च्यूत, पु. ना. आंब्याचा वृक्ष.

चैल, न. ना. वस्त्र, पांघरूण.

छ.

छाया, स्त्री. ना. सावली.

ज.

जननी, स्त्री. ना. आई, माता.

जनपद, पु. ना. देश.

जरा, स्त्री. ना. म्हातारपण.

जलधर, पु. ना. मेघ.

जलाशय, पु. ना. पाण्याचा सांठा (तळीं, डोह वगैरे).

जलचर, वि. पाण्यांत राहणारा प्राणी (मासे वगैरे).

जा.

जात्या, अव्य. जातीनें, स्वतः.

जाळी, स्त्री. ना. वेलींची दाटी.

ज्वाला, स्त्री. ना. जाळ.

जि.

जित, वि. जिंकलेला.

जीवन, न. ना. पाणी. २ प्राण.

जै.

जैं, अव्यय. जेव्हां.

त.

तपणें, क्रि. प्रकाशणें.

तम, न. ना. अंधार.

तरु, पु. ना. वृक्ष, झाड.

तृण, न. ना. गवत.

तृषा, स्त्री. ना. तहान.

तव, (संस्कृत सर्वनाम) तुझा, तुझी. इ०.

ता.

ताटवा, पु. ना. ताटी.

ताप, पु. ना. पीडा, दुःख, संताप.

तारकाधिपति, पु. ना. चंद्र.

तारतम्य, न. ना. तफावत, भेद.

तारुण्य, न. ना. तरुणपणा.

त्र्यंबक, पु. ना. शिव.

ती.

तीव्र, वि. कडक.

तीक्ष्ण, वि. तिखट धारेचा.

तु.

तुंबी, स्त्री. ना. भोपळ्याचा वेल.

तुला, स्त्री. ना. सादृश्य, तुलना.

तै.

तैं, अव्यय. तेव्हां.

तो.

तोय, न. ना. पाणी.

त्यजणें, क्रि. सोडणें.

त्रिदश, पु. ना. देव.

थ.

थारा, पु. ना. आश्रय, आधार.

थिजणें, क्रि. गोठणें. २ आश्चर्यानें वगैरे थक्क होणें.

थोरवी, स्त्री. ना. थोरपणा.

द.

दयाशील, वि. दयाळू, दया जीच्या स्वभावांत आहे, ती.

दयित, वि. आवडता, प्रिय. ना. पति.

दर्प, पु. ना. गर्व.

दल, न. ना. पान, पांकळी.

दवानळ, पु. ना. वणवा, रानांतली आग.

दहन, पु. ना. अग्नि, विस्तव.

दा.

दान, न. ना. माजलेल्या हत्तीच्या गंडस्थलांतून वाहणारा मद.

दास, पु. ना. गुलाम, चाकर.

दाहा, पु. ना. संताप, पीडा.

दि.

दिग्मंडळ, न. ना. दिशांचें मंडळ.

दिङ्नाग, पु. ना. दिग्गज.

दिन, न. ना. दिवस.

दिनकर, पु. ना. सूर्य.

दिनमणि, पु. ना. सूर्य.

दिवस्था, स्त्री. वि. स्वर्गलोकीं असणारी.

द्वि.

द्विज, पु. ना. ब्राह्मण. २ पक्षी.

द्विप, पु. ना. हत्ती.

द्विरेफ, पु. ना. भुंगा.

दु.

दुकूल, न. ना. वस्त्र.२ उंची वस्त्र.

दुजा, वि. दुसरा.

दुंदुभि, पु. ना. नगारा, चौघडा.

दुःसह, वि. सोसावयास कठीण.

दोष, पु. ना. तोटा करणारी अगर

दुःख करणारी गोष्ट. (हा शब्द गुणशब्दाचा प्रतियोगी आहे.)

द्योतविणें, क्रि. प्रकाशित करणें.

ध.

धनद, पु. ना. कुबेर, यक्षांचा राजा.

धरणी, स्त्री. ना. पृथ्वी, जमीन.

धवल, वि. पांढरा.

ध्वनि, पु. ना. शब्द.

धृति, स्त्री. ना. धैर्य.

धूप, पु. ना. धूर.

न.

नखर, न. ना. नख.

नभ, न. ना. आकाश.

नमन, न. ना. नमस्कार. २ लवणें.

नयन, न. ना. डोळा.

नर, पु. ना. मनुष्य.

नृप, न. ना. राजा.

नव, वि. नवें.

नवनीत, न. ना. लोणी.

नश्वर, वि. नाश पावणारें.

नायक, पु. ना. स्वामी, अध्यक्ष.

नाविक, पु. ना. नावाडी.

निज, वि. आपलें, स्वकीय.

निचुल, पु. ना. एका जातीचा वेत.

निमाला, वि. विझाला; नाहींसा झाला.

[illegible]णें, क्रि. स्वाधीन करणें.

[illegible]णें, क्रि. पाहणें.

[illegible], पु. ना. झरा, ओढा.

निरर्थक, वि. अनुपयोगी, व्यर्थ.

निवार्य, वि. निवारण करण्याजोगा.

निवांत, क्रि. वि. स्वस्थ, निर्घोर.

निष्प्रभ, वि. निस्तेज.

निष्फळ, वि. व्यर्थ.

नीच, वि. हलका, दुष्ट.

नीहार, न. ना. दव, धुकें, दहिंवर.

नेत्र, पु. ना. डोळा.

नोहे, क्रि. नाहीं.

नौका, स्त्री. ना. नाव, गलबत.

प.

पंक, पु. ना. चिखल.

पंकज, न. ना. कमल.

पंकिल, वि. चिखलाचा.

पंगु, वि. अशक्त, दुर्बल.

पंजर, पु. ना. पिंजरा.

पद, न. ना. स्थान. २ शब्द. ३ पाय.

पद्म, न. ना. कमल.

पद्माक्षी, स्त्री. वि. कमलासारखे जिचे डोळे आहेत ती.

प्रकट, वि. उघड. (प्रकट करणें, दाखवणें.)

प्रणय, पु. ना. प्रेम, प्रीति.

प्रतिवचन, न. ना. प्रत्युत्तर.

प्रतीक्षा, स्त्री. ना. पाहणें.

प्रफुल्ल, वि. फुललेला.

प्रसवणें, क्रि. उत्पन्न करणें, विणें.

प्रसाद, पु. ना. कृपा, मेहेरबानी.

परपुरुष, पु. ना. जार. २ ईश्वर.
पर, पु. ना. दुसरा, इतर.
पर्यंक, पु. ना. पलंग.
पर्जन्य, पु. ना. पाऊस.
पराग, पु. ना. फुलांतील सुवासिक कोंडा.
परिसणें, क्रि. ऐकणें, श्रवण करणें.
परिमल, पु. ना. सुवास.
परिसर, पु. ना. जवळचा प्रदेश.
पल्लव, पु. ना. पाला. २ पदर.
पल्वल, न. ना. डबकें.
पशु, पु. ना. जनावर.
पांडुर, वि. पांढरा.
पातला, क्रि. आला.
पांथ, पु. ना. वाटसरू.
पान, न. ना. पिणें.
पामर, पु. ना. अडाणी, मूर्ख.
प्राणेश्वरी, स्त्री. ना. प्राणांची धनीन, अत्यंत आवडती.
प्राशणें, क्रि. पिणें.
प्रासाद, पु. ना. मंदिर, मोठी हवेली.
पालवणें, क्रि. पानें फुटणें.
पावित्र्य, न. ना. पवित्रपणा.
पाषाण, पु. ना. दगड.
पिक, पु. ना. कोकिल.
पीन, वि. पुष्ट, मोठा.
पुच्छ, न. ना. शेंपूट.
प्रेषणें, क्रि. पाठविणें.

ब.

बक, पु. ना. बगळा.
बधिर, वि. बहिरा.
बहल, वि. पूर्ण, पुष्कळ.
बाण, पु. ना. तीर.
बाह्य, वि. बाहेरचा.
बीज, स्त्री. ना. द्वितीया तिथि.
बोल, पु. ना. शब्द, भाषण.

भ.

भंग, पु. ना. फुटणें, नाश.
भृंग, पु. ना. भुंगा.
भृकुटि, स्त्री. ना. भोंवई.
भानु, पु. ना. सूर्य.
भांबावणें, क्रि. घाबरणें.
भाल, न. ना. मस्तक, माथा.
भावुक, नवि. भाविक, निष्ठावान.
भास्कर, पु. ना. सूर्य.
भीरु, वि. भितरा.
भुजंग, पु. ना. साप.
भुवन, न. ना. लोक.
भू, स्त्री. ना. पृथ्वी.
भूतमात्रीं, सर्व प्राण्यांवर.
भूमि, स्त्री. ना. जमीन, भुई.
भूषवणें, क्रि. शोभवणें, नटवणें.
भेदन, न. ना. फोडणें.

म.

मज्जन, न. ना. बुडी, स्नान.
मंजुळ, वि. गोड, मधुर.
मंडळ, न. ना. समुदाय.
मत्त, वि. मद्यानें किंवा तारुण्यादिकाच्या योगानें धुंद झालेला.
मतंगज, पु. ना. हत्ती.

दुःख करणारी गोष्ट. (हा शब्द गुणशब्दाचा प्रतियोगी आहे.)
द्योतविणें, क्रि. प्रकाशित करणें.

ध.

धनद, पु. ना. कुबेर, यक्षांचा राजा.
धरणी, स्त्री. ना. पृथ्वी, जमीन.
धवल, वि. पांढरा.
ध्वनि, पु. ना. शब्द.
धृति, स्त्री. ना. धैर्य.
धूप, पु. ना. धूर.

न.

नखर, न. ना. नख.
नभ, न. ना. आकाश.
नमन, न. ना. नमस्कार. २ लवणें.
नयन, न. ना. डोळा.
नर, पु. ना. मनुष्य.
नृप, न. ना. राजा.
नव, वि. नवें.
नवनीत, न. ना. लोणी.
नश्वर, वि. नाश पावणारें.
नायक, पु. ना. स्वामी, अध्यक्ष.
नाविक, पु. ना. नावाडी.
निज, वि. आपलें, स्वकीय.
निचुल, पु. ना. एका जातीचा वेत.
निमाला, वि. विझाला; नाहींसा झाला.
निरवगणें, क्रि. स्वाधीन करणें.
निरखणें, क्रि. पाहणें.
निर्झर, पु. ना. झरा, ओढा.
निरर्थक, वि. अनुपयोगी, व्यर्थ.
निवार्य, वि. निवारण करण्याजोगा.
निवांत, क्रि. वि. स्वस्थ, निर्घोर.
निष्प्रभ, वि. निस्तेज.
निष्फळ, वि. व्यर्थ.
नीच, वि. हलका, दुष्ट.
नीहार, न. ना. दव, धुकें, दहिंवर.
नेत्र, पु. ना. डोळा.
नोहे, क्रि. नाहीं.
नौका, स्त्री. ना. नाव, गलबत.

प.

पंक, पु. ना. चिखल.
पंकज, न. ना. कमल.
पंकिल, वि. चिखलाचा.
पंगु, वि. अशक्त, दुर्बल.
पंजर, पु. ना. पिंजरा.
पद, न. ना. स्थान. २ शब्द. ३ पाय.
पद्म, न. ना. कमल.
पद्माक्षी, स्त्री. वि. कमलासारखे जिचे डोळे आहेत ती.
प्रकट, वि. उघड. (प्रकट करणें, दाखवणें.)
प्रणय, पु. ना. प्रेम, प्रीति.
प्रतिवचन, न. ना. प्रत्युत्तर.
प्रतीक्षा, स्त्री. ना. पाहणें.
प्रफुल्ल, वि. फुललेला.
प्रसवणें, क्रि. उत्पन्न करणें, विणें.
प्रसाद, पु. ना. कृपा, मेहेरबानी.

परपुरुष, पु. ना. जार. २ ईश्वर.
पर, पु. ना. दुसरा, इतर.
पर्यंक, पु. ना. पलंग.
पर्जन्य, पु. ना. पाऊस.
पराग, पु. ना. फुलांतील सुवासिक कोंडा.
परिसणें, क्रि. ऐकणें, श्रवण करणें.
परिमल, पु. ना. सुवास.
परिसर, पु. ना. जवळचा प्रदेश.
पल्लव, पु. ना. पाला. २ पदर.
पल्वल, न. ना. डबकें.
पशु, पु. ना. जनावर.
पांडुर, वि. पांढरा.
पातला, क्रि. आला.
पांथ, पु. ना. वाटसरू.
पान, न. ना. पिणें.
पामर, पु. ना. अडाणी, मूर्ख.
प्राणेश्वरी, स्त्री. ना. प्राणांची धनीन, अत्यंत आवडती.
प्राशणें, क्रि. पिणें.
प्रासाद, पु. ना. मंदिर, मोठी हवेली.
पालवणें, क्रि. पानें फुटणें.
पावित्र्य, न. ना. पवित्रपणा.
पाषाण, पु. ना. दगड.
पिक, पु. ना. कोकिल.
पीन, वि. पुष्ट, मोठा.
पुच्छ, न. ना. शेंपूट.
प्रेषणें, क्रि. पाठविणें.

ब.

बक, पु. ना. बगळा.
बधिर, वि. बहिरा.
बहल, वि. पूर्ण, पुष्कळ.
बाण, पु. ना. तीर.
बाह्य, वि. बाहेरचा.
बीज, स्त्री. ना. द्वितीया तिथि.
बोल, पु. ना. शब्द, भाषण.

भ.

भंग, पु. ना. फुटणें, नाश.
भृंग, पु. ना. भुंगा.
भृकुटि, स्त्री. ना. भोंवई.
भानु, पु. ना. सूर्य.
भांबावणें, क्रि. घाबरणें.
भाल, न. ना. मस्तक, माथा.
भावुक, नवि. भाविक, निष्ठावान.
भास्कर, पु. ना. सूर्य.
भीरु, वि. भितरा.
भुजंग, पु. ना. साप.
भुवन, न. ना. लोक.
भू, स्त्री. ना. पृथ्वी.
भूतमात्रीं, सर्व प्राण्यांवर.
भूमि, स्त्री. ना. जमीन, भुई.
भूषवणें, क्रि. शोभवणें, नटवणें.
भेदन, न. ना. फोडणें.

म.

मज्जन, न. ना. बुडी, स्नान.
मंजुळ, वि. गोड, मधुर.
मंडळ, न. ना. समुदाय.
मत्त, वि. मद्यानें किंवा तारुण्यादिकाच्या योगानें धुंद झालेला.
मतंगज, पु. ना. हत्ती.

मति, स्त्री. ना. बुद्धि.
मत्स्य, पु. ना. मासा.
मद, पु. ना. गर्व. २ हत्तीच्या गंडस्थलांतून वाहणारें पाणी.
मदहर, वि. गर्व उतरणारा.
मधु, पु. ना. वसंतऋतु.
मधु, न. ना. मध. २ मद्य.
मधुप, पु. ना. भुंगा.
मनुज, पु. ना. मनुष्य.
मम, (संस्कृत सर्वनाम) माझा, माझी इ०.
मयूर, पु. ना. मोर.
मृग, पु. ना. हरिण.
मृगपति, पु. ना. सिंह.
मृणाल, न. ना. कमलाच्या देठांतले तंतु.
मृदु, वि. मऊ, कोमल, विनययुक्त.
मर्त्य, वि. ज्यास मरण आहे तो.
माखणें, क्रि. चोपडणें.
मराल, पु. ना. हंस.
मरु, पु. ना. मारवाड देशाचें नांव.
मलय, पु. ना. एका पर्वताचें नांव. हा पर्वत कर्नाटकांत आहे.
मशक, पु. ना. चिलीट, क्षुद्रजंतु.
महा, वि. मोठा.
मही, स्त्री. ना. पृथ्वी.
मानखंडणा, स्त्री. ना. अपमान.
मानस, न. ना. मन. २ एक विशेष सरोवराचें नांव.
मानी, वि. अभिमानी.
मारुत, पु. ना. वारा.
माळ, पु. ना. नापीक जमीन.
मित्र, पु. ना. सूर्य. २ स्नेही.
मुग्ध, वि. सुंदर. २ अज्ञान, अल्पवयी.
मुक्ताफल, न. ना. मोतीं.
मुक्ता, स्त्री. ना. मोतीं.
मुनी, पु. ना. ऋषि.
मुष्टि, स्त्री. ना. मूठ.
मेवा, पु. ना. गोड पदार्थ.
मोह, पु. ना. भ्रांति. अज्ञान.
मौन, न. ना. न बोलणें.

य.

यष्टी, स्त्री. ना. दांडी, काठी.
युधिष्ठिर, पु. ना. धर्मराजा. (पांडवांतला वडील भाऊ.)
योगासन, न. ना. योगधारण करतांना घातलेलें आसन.
योजना, स्त्री. ना. तजवीज, उपाय.
योषित्, स्त्री. ना. स्त्री.

र.

रज, न. ना. धूळ, धुरळा. २ पराग.
रक्त, वि. तांबडा, लाल.
रति, स्त्री. ना. मदनाची स्त्री.
रतिपति, पु. ना. मदन.
रम्य, वि. सुंदर.
रवि, पु. ना. सूर्य.
रसज्ञ, वि. मार्मिक, रसिक.
रसाल, पु. ना. आंब्याचें झाड.

रिता, वि. रिकामा.
रूक्ष, वि. रुखा, शुष्क, ज्यांत मऊपण नाहीं असा.
रोमंथ, पु. ना. रोवत, रवथ.

ल.

लकुच, न. ना. ओंटाचें फळ.
लघुता, स्त्री. ना. हलकेपणा.
लता, स्त्री. ना. लहान झाड, वेल.
लय, पु. ना. नाश.
ललना, स्त्री. ना. सुंदर स्त्री.
लवलाही, अव्य. लवकर, जलद.
लहरी, स्त्री. ना. लाटा.
लक्षण, न. ना. खूण, चिन्ह.
लाधणें, क्रि. लाभणें, प्राप्त होणें.
लीला, स्त्री. ना. कृत्य, विलास.
लेश. पु. ना. थोडा अंश.

व

वक्रत्व, न. ना. वाकडेपणा. २ कुरेबाजपणा.
वट, पु. ना. वडाचा वृक्ष.
वदन, न. ना. तोंड, मुख.
वन, न. ना. रान.
वनिता, स्त्री. ना. स्त्री, बायको.
वन्हि, पु. ना. अग्नि.
वर, वि. श्रेष्ठ. (हा अर्थ, हा शब्द समासांत असतां होतो. जसें, गजवर म्हणजे श्रेष्ठ हत्ती. नरवर, म्ह० श्रेष्ठ मनुष्य. इ०).
वरणें, क्रि. स्वीकारणें, पसंत करणें.
वृथा, अव्य. व्यर्थ, उगीच
वृंद, न. ना. समुदाय.
वृष, पु. ना. बैल.
वर्ण, पु. ना. रंग.
वर्षाकाळ, पु. ना. पावसाळा.
वलय, न. ना. कडें, कांकण.
वश, वि. स्वाधीन, अंकित, ताबेदार.
वसणें, क्रि. राहणें, वास करणें.
वसुंधा, स्त्री. ना. पृथ्वी.
वसुमती, स्त्री. ना. पृथ्वी.
वही, स्त्री. ना. कुपण.
वांकडा, वि. प्रतिकूळ.
वात, पु. ना. वायु, वारा.
व्याध, पु. ना. पारधी.
वापिका, स्त्री. ना. पुष्करणी; ज्यांत उतरावयास पायऱ्या आहेत असा हौद.
वाम, वि. डावा
वायस, पु. ना. कावळा.
वारणें, क्रि. दूर करणें.
वारंवार, अव्यय. पुनःपुनः.
वारि, न. ना. पाणी.
वार्ता, स्त्री. ना. वर्तमान, खबर.
वालुका, स्त्री. ना. वाळू, रेती.
विकसणें, वि. फुलणें.
विखरणें, क्रि. पसरणें.
विद्युल्लेखा, स्त्री. ना. वीज.
विधात्री, स्त्री. ना. करणारी.
विधि, पु. ना. दैव, नशीब. २ संस्कार.
विधु, पु. ना. चंद्र.
विपन्न, वि. दुःखी, कष्टी.

मति, स्त्री. ना. बुद्धि.
मत्स्य, पु. ना. मासा.
मद, पु. ना. गर्व. २ हत्तीच्या गंडस्थलांतून वाहणारें पाणी.
मदहर, वि. गर्व उतरणारा.
मधु, पु. ना. वसंतऋतु.
मधु, न. ना. मध. २ मद्य.
मधुप, पु. ना. भुंगा.
मनुज, पु. ना. मनुष्य.
मम, (संस्कृत सर्वनाम) माझा, माझी इ०.
मयूर, पु. ना. मोर.
मृग, पु. ना. हरिण.
मृगपति, पु. ना. सिंह.
मृणाल, न. ना. कमलाच्या देठांतले तंतु.
मृदु, वि. मऊ, कोमल, विनययुक्त.
मर्त्य, वि. ज्यास मरण आहे तो.
माखणें, क्रि. चोपडणें.
मराल, पु. ना. हंस.
मरु, पु. ना. मारवाड देशाचें नांव.
मलय, पु. ना. एका पर्वताचें नांव. हा पर्वत कर्नाटकांत आहे.
मशक, पु. ना. चिलीट, क्षुद्रजंतु.
महा, वि. मोठा.
मही, स्त्री. ना. पृथ्वी.
मानखंडणा, स्त्री. ना. अपमान.
मानस, न. ना. मन. २ एक विशेष सरोवराचें नांव.
मानी, वि. अभिमानी.
मारुत, पु. ना. वारा.
माळ, पु. ना. नापीक जमीन.
मित्र, पु. ना. सूर्य. २ स्नेही.
मुग्ध, वि. सुंदर. २ अज्ञान, अल्पवयी.
मुक्ताफल, न. ना. मोतीं.
मुक्ता, स्त्री. ना. मोतीं.
मुनी, पु. ना. ऋषि.
मुष्टि, स्त्री. ना. मूठ.
मेवा, पु. ना. गोड पदार्थ.
मोह, पु. ना. भ्रांति. अज्ञान.
मौन, न. ना. न बोलणें.

य.

यष्टी, स्त्री. ना. दांडी, काठी.
युधिष्ठिर, पु. ना. धर्मराजा. (पांडवांतला वडील भाऊ.)
योगासन, न. ना. योगधारण करतांना घातलेलें आसन.
योजना, स्त्री. ना. तजवीज, उपाय.
योषित्, स्त्री. ना. स्त्री.

र.

रज, न. ना. धूळ, धुरळा. २ पराग.
रक्त, वि. तांबडा, लाल.
रति, स्त्री. ना. मदनाची स्त्री.
रतिपति, पु. ना. मदन.
रम्य, वि. सुंदर.
रवि, पु. ना. सूर्य.
रसज्ञ, वि. मार्मिक, रसिक.
रसाल, पु. ना. आंब्याचें झाड.

रिता, वि. रिकामा.
रूक्ष, वि. रुखा, शुष्क, ज्यांत मऊपण नाहीं असा.
रोमंथ, पु. ना. रोवत, रवथ.

ल.

लकुच, न. ना. ओंटाचें फळ.
लघुता, स्त्री. ना. हलकेपणा.
लता, स्त्री. ना. लहान झाड, वेल.
लय, पु. ना. नाश.
ललना, स्त्री. ना. सुंदर स्त्री.
लवलाहीं, अव्य. लवकर, जलद.
लहरी, स्त्री. ना. लाटा.
लक्षण, न. ना. खूण, चिन्ह.
लाधणें, क्रि. लाभणें, प्राप्त होणें.
लीला, स्त्री. ना. कृत्य, विलास.
लेश. पु. ना. थोडा अंश.

व

वक्रत्व, न. ना. वाकडेपणा. २ कुरेबाजपणा.
वट, पु. ना. वडाचा वृक्ष.
वदन, न. ना. तोंड, मुख.
वन, न. ना. रान.
वनिता, स्त्री. ना. स्त्री, बायको.
वन्हि, पु. ना. अग्नि.
वर, वि. श्रेष्ठ. (हा अर्थ, हा शब्द समासांत असतां होतो. जसें, गजवर म्हणजे श्रेष्ठ हत्ती. नरवर, म्ह० श्रेष्ठ मनुष्य. इ०).
वरणें, क्रि. स्वीकारणें, पसंत करणें.
वृथा, अव्य. व्यर्थ, उगीच.
वृंद, न. ना. समुदाय.
वृष, पु. ना. बैल.
वर्ण, पु. ना. रंग.
वर्षाकाळ, पु. ना. पावसाळा.
वलय, न. ना. कडें, कांकण.
वश, वि. स्वाधीन, अंकित, ताबेदार.
वसणें, क्रि. राहणें, वास करणें.
वसुंधा, स्त्री. ना. पृथ्वी.
वसुमती, स्त्री. ना. पृथ्वी.
वही, स्त्री. ना. कुपण.
वांकडा, वि. प्रतिकूळ.
वात, पु. ना. वायु, वारा.
व्याध, पु. ना. पारधी.
वापिका, स्त्री. ना. पुष्करणी; ज्यांत उतरावयास पायऱ्या आहेत असा हौद.
वाम, वि. डावा
वायस, पु. ना. कावळा.
वारणें, क्रि. दूर करणें.
वारंवार, अव्यय. पुन:पुन:.
वारि, न. ना. पाणी.
वार्ता, स्त्री. ना. वर्तमान, खबर.
वालुका, स्त्री. ना. वाळू, रेती.
विकसणें, वि. फुलणें.
विखरणें, क्रि. पसरणें.
विद्युल्लेखा, स्त्री. ना. वीज.
विधात्री, स्त्री. ना. करणारी.
विधि, पु. ना. दैव, नशीब. २ संस्कार.
विधु, पु. ना. चंद्र.
विपन्न, वि. दुःखी, कष्टी.

विपरीत, वि. उलटी.
विपुल, वि. पुष्कळ.
विमला, स्त्री. वि. निर्मळ, स्वच्छ.
विरह, पु. ना. वियोग.
विरोध, पु. ना. एका ठिकाणीं, एका समयीं राहण्याची अयोग्यता. (जसें पाणी आणि विस्तव, उजेड आणि अंधार, पाप आणि पुण्य इत्यादिकांचा विरोध आहे.)
विलसणें, क्रि. शोभणें.
विलास, पु. ना. क्रीडा, मौज, ख्याल.
विवर, न. ना. भोंक.
विवाह, पु. ना. लग्न.
विविध, वि. अनेक प्रकारचा.
विवेक, पु. ना. विवेचन करण्याची शक्ति.
विषय, पु. ना. पदार्थ, वस्तु.
विहंग, पु. ना. पक्षी, पांखरूं.
विहरणें, क्रि. क्रीडा करणें, मौजा मारणें.
वेरझारा, स्त्री. ना. खेपा, हेलपाटे.
वेष्टिणें, क्रि. वेढणें.

श.

शक्र, पु. ना. इंद्र.
शंका, स्त्री. ना. संशय, भय, कल्पना.
शृंग, न. ना. शिंग. २ शिखर.
शक्त, वि. समर्थ.
शतधा करणें, क्रि. शंभर तुकडे करणें.
शमणें, क्रि. विझणें, निवणें, नाहींसें होणें.
शर, पु. ना. बाण, तीर.
श्वा, पु. ना. कुत्रा.
शशांक, पु. ना. चंद्र.
शाकोट, पु. ना. एका जातीचें झाड.
शाखा, स्त्री. ना. फांदी, खांदी.
शांत, वि. क्षमाशील, दयाळू.
शार्दूल, पु. ना. वाघ.
शिखी, पु. ना. मोर.
शिर, न. ना. मस्तक, शेंडा, माथा.
शिशिर, पु. ना. साहावा ऋतु, (माघ व फाल्गुन.)
शीण, पु. ना. श्रम, भागोटा.
शील, न. ना. स्वभाव, आचरण.
शुक, पु. ना. राघू.
शुष्क, वि. वाळलेला.

स.

सतत, अव्य. नेहमीं.
सदन, न. ना. घर.
सदर्प, वि. गर्विष्ठ.
संदेश, पु. ना. निरोप.
संनिध, वि. जवळ, समीप.
स्पर्धा स्त्री. ना. बरोबरी, ईर्षा.
स्पृहा, स्त्री. ना. इच्छा.
सम, वि. सारखा.
समान, वि. सारखें.

सरस, वि. रसिक. २ ओला.
सरसा, स्त्री. ना. रसिक, रंगेली.
सरोवर, न. ना. तळें.
स्वन, पु. ना. शब्द.
स्वसम, वि. आपल्यासारखा, सारखी. इ०.
सहकार, पु. ना. आंब्याचा वृक्ष.
साजिरा, वि. सुंदर.
सारिका, स्त्री. ना. मैना.
स्वांत, न. ना. मन, अंतःकरण.
स्वातंत्र्य, न. ना. स्वतंत्रपणा, हवें तें करण्याची मोकळीक.
स्वादिष्ट, वि. गोड.
स्वीय, वि. आपला, स्वतःचा.
सुकृत, न. ना. पुण्य.
सुकृती, वि. पुण्यवान.
सुदती, स्त्री. वि. चांगले जिचे दांत ती.
सुधा, स्त्री. ना. अमृत.
सुर, पु. ना. देव.
सुरतरु, पु. ना. कल्पवृक्ष.
सुरवधू, स्त्री. ना. देवांगना.
सुवृत्तता, स्त्री. ना. सुस्वभाव. २ वाटोळेपणा.
सुरा, स्त्री. ना. मद्य, दारू.
सुरेंद्र, पु. ना. देवांचा राजा, इंद्र.
सुवदना, स्त्री. वि. सुंदर जिचें मुख, ती.
सुशील, न. ना. चांगलें आचरण, चांगला स्वभाव.
सुशीला, स्त्री. वि. सदाचरणाची स्त्री.
सुषुमा, स्त्री. ना. शोभा, कांति.
सूक्ष्म, वि. बारीक, अरुंद.
सोपान, न. ना. जिन्याच्या पायऱ्या.
सोहळा, पु. ना. कौतिक.
सौख्यद, वि. सुख देणारा.
सौध, पु. ना. पांढरें मंदिर, गच्ची.

ह.

हकांक, स्त्री. ना. गोंगाट.
हितकर, वि. हित करणारा.
हिम, न. ना. हीव, थंडी, बर्फ.
हिमकिरण, पु. ना. चंद्र.
हिमगिरि, पु. ना. हिमालय.
हीनतेज, वि. निस्तेज.
हेवा, पु. ना. मत्सर, असूया.

क्ष.

क्षितिपति, पु. ना. राजा, पृथ्वीचा धनी.
क्षुद्र, वि. हलका, भिकार.

ज्ञ.

ज्ञात, वि. ठाऊक, माहीत.

मराठी कवितेंतील व्याकरणाचे विशेष.

आपण जीस एक भाषा ह्मणतों तींतही पोटचे भेद पुष्कळ असतात. वय, स्त्रीत्व, पुरुषत्व, जाती, धंदा इत्यादि प्रकारांनीं भाषा भिन्न होते. मुलांच्या व थोरांच्या भाषेंत, बायकांच्या व पुरुषांच्या भाषेंत, निरनिराळ्या धंद्यांच्या व निरनिराळ्या जातींच्या भाषेंत सर्वकाळ तफावत असते. याचप्रमाणें लिहिण्याची भाषा व बोलण्याची भाषा यांत बरेंच अंतर असतें. तसेंच लिहिण्याच्या भाषेंतही गद्यात्मक ग्रंथांच्या भाषेहून पद्यात्मक ग्रंथाची म्हणजे कवितेची भाषा पुष्कळ निराळी असते.

कवितेंतील भाषा व गद्यात्मक ग्रंथांतील भाषा यांत जो भेद आहे, तो वर सांगितलेल्या दुसऱ्या भेदांपेक्षां फार मोठा आहे. कितीएक शब्द जे गद्यात्मक भाषेंत येतात ते कवितेंत प्रायः येत नाहींत; व जे कितीएक शब्द कवितेंत असतात, ते गद्यात्मक भाषेंत असत नाहींत. गरज, हिम्मत, जलद, जरूर, सबब वगैरे फारशी किंवा आरबी भाषेंतून आलेले शब्द मराठी जुन्या व प्रतिष्ठित कवितेंत प्रायः असत नाहींत. तसेंच लवलाहीं, दुजा, बाणणें, जैं, तैं, वीण इत्यादि जुने प्राकृत शब्द व रवि, पद्म, भृंग सुधा इत्यादि कठीण संस्कृत शब्द गद्यात्मक लेखांत घालण्याची रीत नाहीं.

कितीएक शब्दांविषयीं असें आहे कीं, ते पद्य ग्रंथांत व गद्य ग्रंथांत वास्तविकपणें एकच असतात खरे. तरी त्यांचीं रूपें पद्य ग्रंथांत पुष्कळ बदलतात. ही बदलणूक कितीएक प्रकारांनीं घडते. गद्य ग्रंथांत जे शब्द नेहमीं दीर्घ इकार घटित किंवा दीर्घ उकार घटित असतात, त्यांतील ते इकार

किंवा उकार कवितेंत कधीं कधीं ऱ्हस्वही होतात. जसें करून, त्यजून, गेली, केली, नाजूक, साजूक, गेलीस, बसलीस, वगैरे शब्दांतील इकार व उकार कवितेंत छंदाच्या अगर यमकाच्या अनुरोधानें दीर्घ किंवा ऱ्हस्व लिहितात. दिसणें, उठणें, फुलणें, वगैरे शब्दांतील उकार दीर्घ करण्याची रीतही कितीएक मराठी काव्यांत आढळते; तसेंच मोकळे म्हणजे ज्यांच्या पूर्वीं व्यंजन जोडलें नाहीं असे अकार किंवा आकार छंदादिकांच्या अनुरोधानें दीर्घ अगर ऱ्हस्व होतात. जसें, आढळणें, अगळीक, आला, आठवणें, आणणें इत्यादि शब्दांतील अकार कवितेंत प्रसंगान्वयें ऱ्हस्व किंवा दीर्घ असतात. आतां स्वरांची बदलणूक मुख्यत्वेंकरून प्राकृत शब्दांस किंवा अत्यंत प्रचारांत आल्यामुळें प्राकृतप्राय झालेल्या संस्कृत शब्दांसच लागू आहे; शुद्ध संस्कृत शब्दांस लागू नाहीं. जसें, अनुभव, उष्ण, पुष्प, सुगंध, शीत, दीन, दीर्घ, अनुमान, आकार इत्यादि शब्दांतील उकार, इकार किंवा अकार यांची बदलणूक अभियुक्त कवि करीत नाहींत. तसेंच मी, तूं, ती, ही, जी इत्यादि नेहमीं दीर्घ असणारे प्राकृत शब्दही प्रतिष्ठित काव्यांत प्रायः ऱ्हस्व केलेले आढळत नाहींत.

संस्कृत शब्दांतीलही दीर्घ व ऱ्हस्व इकार व उकार शब्दांच्या शेवटीं असतांनां बदलतात. जसें, वायु, भानु, धेनु, गिरि, कवि, गति, मति इत्यादि शुद्ध संस्कृत शब्दांतील अंत्य स्वर ऱ्हस्व असूनही ते कवितेंत पुष्कळ ठिकाणीं दीर्घ होतात; व हेच शब्द सविभक्तिक झाले असतां किंवा त्यांस शब्दयोगी अव्ययें जोडलीं असतां गद्य ग्रंथांत त्यांतील अंत्य स्वर नियमानें दीर्घ होतात, तरी ते स्वर ऱ्हस्व करून वयुला, कविनें, धेनुचा, गिरिवरि, गतिस इत्यादि रूपें

करण्याचा प्राचीन व प्रतिष्ठित मराठी कवींचा संप्रदाय आहे. तसेंच संस्कृत शब्दांचा अंत्य स्वर दीर्घ असला तरी त्या शब्दास विभक्ति किंवा शब्दयोगी अव्यय जोडलें असतां तो स्वर कधीं कधीं ऱ्हस्व करतात.

गद्य ग्रंथांतील व पद्य ग्रंथांतील शब्दांचीं रूपें बदलण्याचें असें एक कारण आहे कीं, ज्या कितीएक शब्दांच्या अंतीं गद्यांत अकार असतो त्याच्या अंतीं कवितेंत इकार लावतात व हा इकार छंदादिकाच्या अनुरोधानें कोठें ऱ्हस्व व कोठें दीर्घ असतो. जसें, आज, त्यास, जर, करून, च इत्यादि शब्दांचीं रूपें कवितेंत आजि, त्यासि, जरि, करूनि, चि, अशीं होतात.

झाल्या, केल्या, त्याच्या, माझ्या, तुझ्या इत्यादि शब्दांचें संयोगकृत कठोरत्व कमी करण्याकरतां किंवा छंदाच्या अनुरोधानें या शब्दांचीं कवितेंत झालिया, केलिया, त्याचिया, माझिया, तुझिया अशीं रूपें करतात. परंतु त्या आणि ज्या हीं सर्वनाम शब्दांचीं सामान्य रूपें कवितेंत वर सांगितलेल्या सामान्य नियमाप्रमाणें तिया आणि जिया अशीं न होतां तया आणि जया अशीं होतात. तसेंच जीस, जीनें, तीस, तीनें, इत्यादि स्त्रीलिंगी सर्वनामांचीं रूपें कवितेंत विकल्पेंकरून जयेस, जयेनें, तयेस, तयेनें अशीं होतात.

उकार ऱ्हस्व किंवा दीर्घ, व ओकार यांची एकमेकांशीं अदलाबदली होऊन करून, पाहून, करू, पाहू, इत्यादि शब्दांचीं रूपें कधीं कधीं करोन, पाहोन, अशीं होतात. व दोन्हीं प्रकारचीं रूपें कवितेंत योजण्याचा संप्रदाय आहे. विशेष जुन्या मराठी कवितेंत अकारांत पुल्लिंगी शब्दांच्या प्रथमेचें रूप उकारांत लिहिण्याचा संप्रदाय आहे. जसें, ना[illegible],

सागर, संकल्प, मनोरथ इत्यादि शब्दांच्या प्रथमेचीं रूपें नाशु, सागरु, संकल्पु, मनोरथु अशीं आढळतात. यांची उत्पत्ति वरील नियमावरून झालीसें वाटतें. प्राकृत भाषांची मूळभूत जी महाराष्ट्री भाषा; जिला बालभाषा असें म्हणतात, तींत अकारांत पुल्लिंगीं संस्कृत शब्दांच्या प्रथमेचें रूप ओकारांत होण्याचा नियम आहे. म्हणजे देह, नर, गज, अश्व इत्यादि शब्दांच्या प्रथमेचीं रूपें महाराष्ट्रींत देहो, नरो, गजो, अश्वो, अशीं होतात व त्यांपैकींच कांहीं रूपें जुन्या कवितांत दृष्टीस पडतात. व त्या ओकाराचा उकार होऊन विनाशु, सागरु वगैरे वरील रूपें झालीं असावीं असें दिसतें. हा उकार क्रियापदासही लागलेला कांहीं प्राचीन कवींच्या ग्रंथांत आढळतो. जसें "जेवीं स्वप्न आणि मनोरथु । विसरवितु निजदेहा." "असे मिरवतु ऐरावती." "स्वयें श्रीकृष्ण सांगतु." (एकनाथी भागवत अध्याय २२.) वास्तविक पाहतां करतो, बोलतो, विसरतो इत्यादि शब्द खरीं क्रियापदें नव्हेत तर कुर्वन्, ब्रुवन्, विस्मरन् इत्यादि वर्तमानवाचक क्रियाघटित विशेषणांचे अपभ्रंश आहेत असें जें मत आहे त्या मतास हीं उकारांत रूपें व करित, बोलत इत्यादि अकारांत रूपें साधक होतात असें वाटतें.

नामें.

मराठी कवितेंत व साधारण लेखांत येत नाहींत अशा संस्कृत शब्दांचा प्रयोग करण्याचा संप्रदाय आहे म्हणून वर लिहिलेंच आहे. व त्याच भाषेंतल्या रीतीप्रमाणें पद्माक्षी, कुंदरदना, सांवळा, प्रिय इत्यादि विशेषणांचा नामाप्रमाणें कवितेंत प्रयोग करतात.

विभक्तीचा लोप करून त्या विभक्तीनें दाखवायाचा संबंध केवळ सामान्य रूपानेंच कधीं कधीं कवितेंत दाखवि-

तात. जसें "रूपास भुलला," "त्यास देई" या जागीं कवितेंत "रूपा भुलला." "त्या देई" असे प्रयोग होतात. आतां हा प्रकार मुख्यत्वेंकरून अकारांत व आकारांत शब्दांस व द्वितीया व चतुर्थी या विभक्तींच्या संबंधानें होतो व तसल्याच शब्दांस व त्याच विभक्तींच्या संबंधानें तो मागील कवितेंत योजला आहे. तरी विशेष जुन्या कवितेंत इतर स्वरांत शब्दांस व इतर विभक्तींविषयींही तो लागू केल्याचीं उदाहरणें सांपडतील.

अकारांत शब्दांच्या तृतीयेचें एक वचन कवितेंत ऐं प्रत्यय लावून व सर्व शब्दांच्या तृतीयेचें बहुवचन हीं प्रत्यय लावून बहुत वेळ करतात. आतां "नामें प्रसिद्ध" "त्याच्या हातें करविलें" इत्यादि थोड्या उदाहरणांत गद्य ग्रंथांतही हें ऐंकारांत तृतीयेचें रूप आढळतें. परंतु त्याचा पुष्कळ प्रयोग म्हटला म्हणजे कवितेंत होय. हीं प्रत्ययांत तृतीयेच्या बहुवचनाचा प्रयोग केवळ कवितेंत असतो. हाहीं प्रत्यय संस्कृतांतील तृतीया बहुवचनाचा प्रत्यय जो भिः त्याचा, बालभाषेच्या व्याकरणाच्या नियमाप्रमाणें अपभ्रंश होय. त्या नियमानें महाप्राण व्यंजनाचा हकार होतो. जसें, दधि, कथन, लेखन, इत्यादि संस्कृत शब्दांचीं मराठींत दहीं, कहाणी, लिहिणें अशीं रूपें होतात व त्याच नियमानें भिकाराचीही झाली आहे.

संस्कृतांतील सप्तमीच्या एकवचनाचा सामान्य प्रत्यय जो इकार तो अकारांत शब्दांस लागून जुन्या मराठींत वनीं, रामीं, सदनीं, इत्यादि रूपें होतात. आतां हीं रूपें घरीं, हातीं इत्यादि कांहीं थोड्या शब्दांत गद्यात्मक भाषेंतही सांपडतात खरीं, तथापि त्यांचा पुष्कळ प्रयोग कवितेंत असतो.

विशेषणें.

संस्कृतांत नामाप्रमाणें विशेषणासही जसा लिंग, वचन व विभक्ति यांच्या योगानें विकार होतो, तसा विकार गद्यात्मक मराठींत आकारांत विशेषणांस मात्र होतो, इतरांस होत नाहीं. काळा घोडा, काळी गाय, काळें फूल, काळें घोडें, काळ्या घोड्यास इत्यादि प्रयोगांत काळा या आकारांत विशेषणास लिंगवचनविभक्तिप्रयुक्त विकार घडतात; तसें सुंदर, गुलाबी, कनवाळू, इत्यादि इतर विशेषणांस घडत नाहींत. परंतु कवितेंत संस्कृत विशेषणांस त्या भाषेंतील आ व ई हे स्त्रीलिंगी प्रत्यय लावून प्रिया, कोमला, गुणवती, रूपवती इत्यादि रूपें कधीं कधीं योजितात. तसेंच विशेषणास विभक्ति किंवा शब्दयोगी अव्यय लागलें असतां त्याचें विशेषण अकारांत असलें तरीं कधीं कधीं त्या विशेषणास सामान्यरूप होतें व कधीं कधीं विभक्तिप्रत्यय सुद्धां लागतो. जसें "विशाला नेत्रांहीं," "सुंदरीं वदनीं" इत्यादि रूपें कवितेंत आढळतात.

सर्वनामें.

कविता ग्रंथांत सर्वनामांचींही रूपें गद्यात्मक ग्रंथांतल्यापेक्षां कधीं कधीं निराळीं आढळतात. जसें, त्यास, त्यानें इत्यादिकांच्या जागीं तयास, तयानें; तीस, तीनें वगैरेच्या बद्दल तियेस, तियेनें किंवा तयेस, तयेनें इत्यादि रूपें होतात. याचप्रमाणें ती ही या सर्वनामांच्या जागीं ते, हे अशीं रूपें घालण्याची रीत आहे. तो या पुरुषवाचक सर्वनामाचीं जशीं रूपें होतात, तशीं जो या संबंधी सर्वनामाचींही जयास जयेस इत्यादि रूपें समजावीं. त्वां, म्यां बद्दल कधीं तुवां, मियां अशीं रूपें होतात. कोण याचें कधीं कधीं कवण असें रूप होतें.

क्रियापदें.

मराठी गद्यात्मक ग्रंथांतल्या व कवितेंतल्या क्रियापदांत

तर पुष्कळच भेद आहे. कवितेंतल्या क्रियापदांचीं रूपें केवळ निराळीं असतात इतकेंच नाहीं, तर क्रियापदांचें एकच रूप गद्यात्मक ग्रंथांत व कवितेंत भिन्न भिन्न काळीं असतें. गद्यात्मक ग्रंथांत ज्या काळीं जो प्रयोग मुळींच होत नाहीं, किंवा क्वचित् आढळतो, तो कवितेंत पुष्कळ वेळ आढळतो. करी, टाकी, जाई, खेळे, बसे, हंसे, इत्यादि ज्या रूपांचा गद्यात्मक ग्रंथांत रीतिभूत काळीं प्रयोग होतो, त्या रूपांचा कवितेंत प्रायः वर्तमानकाळीं प्रयोग असतो.

नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी,
हरी जो पापातें उचलुनि कृपासिंधु लहरी.
वामन.

गमो मधुर हें विषस्तवन सेवितां माजवी
करी मलिन सद्यशोमुख हलाहला लाजवी.
मोरोपंत.

या वरील पद्यांत नसे, हरी, माजवी, करी, लाजवी हीं रूपें वर्तमानकाळीं आहेत हें उघडच आहे. याप्रमाणें दुसरीं हजारों उदाहरणें वाचणारांस आढळतील.

या करी वगैरे रूपांचा प्रयोग कवितेंत शुद्ध भूतकाळींही पुष्कळ ठिकाणीं होतो. जसें,

मंत्र जप करुनि तो कवि येरे वत्सा कचा असें वाहे,
भेदुनि वृकोदरें पल सर्व निघे त्यांत लेशहि न राहे.
कच येतां बहु हर्षे धन्य म्हणे मीच कन्यका मातें
वांचविला त्याचि दिला हा देइल कोण अन्य कामातें.

या आर्यांत वाहे, निघे, राहे, हर्षे, म्हणे हीं क्रियापदें शुद्ध भूतकाळीं आहेत, रीतिभूतकाळीं नाहींत.

गद्यात्मक ग्रंथांत रीतिभूतकाळीं जीं रूपें योजतात तीं कवितेंत वर्तमानकाळीं योजितांना ज्या रूपांच्या शेवटीं अकार असतो त्यांच्या शेवटीं दीर्घ किंवा ऱ्हस्व इकार यो-

जतात. जसें, करिती किंवा करिति (तृ० पु० ब० व०), करिशी किंवा करिशि (द्वि० पु० ए० व०).

गद्यात्मक ग्रंथांत कर्मणि व भावी रूपांचा वर्तमानकाळीं प्रयोग विध्यर्थी मात्र होतो; जसें "त्यानें काम करावें, त्यानें जावें इ०;" स्वार्थी होत नाहीं. परंतु कवितेंत स्वार्थी वर्तमानकाळीं संस्कृताप्रमाणें कर्मणि व भावी रूपें होतात. जसें,

> जें ध्यानावीण ध्याइजे, जें चित्तावीण चिंतिजे,
> जें जाणिवे वीण जाणिजे, तें परब्रह्म. (विवेकसिंधु.)
> परि मनीं धरूनि दुभतें चारिजे जरी गाईतें,
> गा पेंव करूनि आइतें, पेरूं जाइजे. (ज्ञानेश्वरी.)

या ओंव्यांत ध्याइजे, चिंतिजे, जाइजे, इत्यादि कर्मणि व भावी रूपें स्वार्थी व वर्तमानकाळीं योजिलीं आहेत, हीं रूपें कधीं कधीं विध्यर्थींही योजितात खरीं; तरी वरील उदाहरणांत त्यांचा प्रयोग विध्यर्थी नाहीं, केवळ स्वार्थी आहे हें उघड आहे, "जें ध्यानावीण ध्याइजे" इत्यादि वाक्यांत जें ध्यानावांचून ध्यावें असा विध्यर्थघटित अर्थ नीट लागत नाहीं; तर ध्यानावांचून जें ध्याइलें जातें असा कर्मणि प्रयोगांतलाच अर्थ नीट जुळतो हें सुज्ञ वाचणारांच्या सहज ध्यानांत येईल. हीं करिजे, नेइजे, होइजे इत्यादि रूपें संस्कृतांतील क्रियते, नीयते, भूयते इत्यादि कर्मणि व भावी रूपांचे अपभ्रंश आहेत व कर्मणि प्रत्यय जो यकार त्यास प्राकृत भाषेच्या नियमाप्रमाणें जकार होऊन हीं झालीं आहेत हें उघड आहे. पाहिजे, म्हणजे, इत्यादि थोडींशीं याच प्रकारचीं रूपें व्यवहारिक भाषेंत उरलेलीं अद्यापि दृष्टीस पडतात. या रूपांचा अर्थ हल्लीं बदलला आहे खरा, तथापि मूळच्या अर्थाचा संबंध बारीकपणानें पाहिलें असतां कांहींसा दृष्टीस पडतो. जसें, "माधुर्य म्हणजे मधुरपणा" या वा-

र्‍यांत "मधुरपणा माधुर्य म्हटला जातो" असा अर्थ अद्यापि संभवतो. आतां पाहिजे या शब्दाच्या अर्थांत अधिक भेद पडून तो मूळ अर्थापासून पुष्कळ दूर गेला आहे. तरी त्याच्याही हल्लींच्या अर्थांत व मूळच्या अर्थांत संबंध दाखवितां येईल. पहा धातूचा कधीं कधीं इच्छिणें असा अर्थ होतो; जसें "तो जाऊं पहातो. येऊं पहातो" इत्यादि. तसेंच या कर्मणि रूपाचा विध्यर्थींही पुष्कळ वेळ प्रयोग होतो म्हणून वर लिहिलेंच आहे. तेव्हां पाहिजे याचा अर्थ इच्छावें अथवा इच्छित आहे असा झाला. पुढें इच्छित असा अर्थ घेऊन त्याच्या संबंधानें कर्तृवाचक पदास संबंधसामान्यदर्शक चतुर्थी होऊन "त्यास पाणी पाहिजे" म्हणजे "त्यानें पाणी इच्छित आहे" असा प्रयोग झाला असावा. असो. हा विचार प्रासंगिक आहे, मुख्य नव्हे याकरतां वाढवीत नाहीं.

सांगिजे, होइजे या रूपांस वर्तमानकाळीं बहुवचनीं ती हा प्रत्यय होऊन सांगिजेती, होईजेती अशीं रूपें होतात. तसेंच त्या रूपांस पुल्लिंगीं व स्त्रीलिंगीं वगैरे वर्तमानकाळवाचक तो, ती, तें हे प्रत्यय व भूतकाळदर्शक पुल्लिंगीं व स्त्रीलिंगीं वगैरे ला, ली, हे प्रत्यय लागून कधीं कधीं करिजेतो, करिजेते, करिजेतें, करिजेला, करिजेली, करिजेलें अशीं रूपें होतात. कधीं कधीं कर्मणि प्रत्यय जो यकार त्यास ज़कार न होतां यकारच राहून करियेला किंवा करियला, बोलियेला किंवा बोलियला अशींही भूतकाळीं रूपें होतात. केव्हां केव्हां या कर्मणि क्रियापदाच्या वर्तमानकाळच्या रूपास भविष्यकाळदर्शक ल प्रत्यय लागून करिजेल, सांगिजेल अशींही रूपें होतात.

कर्तरि क्रियापदाचें विध्यर्थी द्वितीय पुरुषाचें एक वचन व स्वार्थी वर्तमानकाळीं तृतीय पुरुषाचें एक वचन हीं कवितें-

त कधीं कधीं सारखीं होतात. करी, घेई, लागे, वगैरे रूपें कर्तरि क्रियापदाचीं स्वार्थी वर्तमानकाळीं तृतीय पुरुषाचीं होतात म्हणून वर सांगितलेंच आहे. हींच रूपें

घेई घेई माझे वाचे, गोड नाम राघोबाचें.

करी मस्तक ठेंगणा; लागे संताच्या चरणा.

तुकाराम.

या अभंगांत विध्यर्थी द्वितीय पुरुषीं एकवचनीं योजलीं आहेत व या प्रकारचीं प्राकृत कवितेंत दुसरीं पुष्कळ उदाहरणें शोधणारांस सांपडतील.

घे, ने, ये, हो, इत्यादि एकारांत व ओकारांत धातूंचीं कर्तरि विध्यर्थी द्वितीयपुरुषीं एकवचनीं रूपें कवितेंत कधीं कधीं स्वार्थी तृतीयपुरुषीं एकवचनीं वर्तमानकाळीं व कधीं कधीं भूतकाळीं योजतात. उदाहरणें.

रणीं आणि दानीं तुझीया कुळींरे.

न दे पाठि कोणीच राया बळींरे.

वामन.

म्हणे हरी प्रेरुनि ने जयातें, मी कां निवारूं सकळां तयांतें.

वामन.

या श्लोकांत दे व ने हीं रूपें देतो व नेतो या अर्थी योजलीं आहेत; व

पुढें वनीं धुंडिति सर्व पाणी,

मागूनि ये दूरुनि चक्रपाणी.

वामन.

या श्लोकांत ये हें रूप येता झाला अशा भूतकाळाच्या अर्थी योजिलें आहे हें उघड आहे.

अव्ययें.

कवितेंत कितीएक अव्ययांचीं रूपें गद्यात्मक ग्रंथांतल्यापेक्षां निराळीं दृष्टीस पडतात.

सामान्य नियम असा दिसतो कीं, जीं क्रियाविशेषण-रूप अव्ययें किंवा शब्दयोगी अव्ययें अकारांत असतात, तीं कवितेंत कधीं कधीं इकारांत करितात; मग हा इकार छंद व प्रास यांच्या अनुरोधानें कधीं ऱ्हस्व व कधीं दीर्घ असतो. जसें (क्रियाविशेषणें) करुनि किंवा करुनी, बोलुनि किंवा बोलुनी, सोडुनि किंवा सोडुनी इत्यादि. (शब्दयोगी अव्ययें) पासुनि किंवा पासुनी, आंतुनि किंवा आंतुनी, जवळि किंवा जवळी, चि किंवा चीं, प्रति किंवा प्रती, इ०.

ऊनप्रत्ययांत क्रियाविशेषणांस व शब्दयोगी अव्ययांस मागें सांगितल्याप्रमाणें इकार झाल्यावर कधीं कधीं पुढें आणखी या प्रत्यय लागतो. जसें, जाऊनियां, पावूनियां, घेऊनियां, पासूनियां, आंतूनियां, वांचूनियां, इ०.

कवितेंत प्राकृत सर्वनाम शब्दांस प्रकारार्थी वी प्रत्यय होऊन क्रियाविशेषण अव्ययें होतात. जसें, तेंवी तसा, जेवी जसा, एवी असा, केवी कसा, इ०. या प्रकारचें एरवी एवढें मात्र रूप गद्यात्मक भाषेंत राहिलें आहे. हें रूप इतर या संस्कृत सर्वनामाचा एर असा अपभ्रंश होऊन त्यास वी प्रत्यय लागून सिद्ध झालें आहे. एर व एरू हीं रूपें जुन्या प्राकृत कविताग्रंथांत प्रसिद्ध आहेत.

याप्रमाणें कवितेंतल्या शब्दरूपांत व्याकरणरीत्या होणारे जे फेरफार सुचले, ते वर लिहिले आहेत. आतां या निबंधांत कवितेंत येणाऱ्या सर्व फेरफारांचा संग्रह झाला नाहीं. व जे लिहिले आहेत त्यांचेंही पाहिजे तसें पूर्ण निरूपण झालें नाहीं. तथापि या गोष्टीविषयींचा हा यत्न पहिलाच आहे. यामुळें त्या न्यूनतेबद्दल सुज्ञ वाचणारे क्षमा करतील अशी आशा आहे.